


ं. वाचनालय, ठाणें
५७६२
RBK-0105762

तंत्र भारताचे पहिले राष्ट्रपति

# डॉ. राजेंद्रप्रसाद

म. ग्रं.
विपर
दा. क्र.

स्वतंत्र भारताचे पहिले राष्ट्रपति

# डॉ. राजेंद्र प्रसाद

यांच्या जीवनाचें ओझरतें दर्शन

☆

लेखक
रा. प्र. कानिटकर

☆

स्वतंत्र शाळा प्रकाशन, पुणें २

स्वतंत्र भारताचे पहिले राष्ट्रपति

# डॉ. राजेंद्र प्रसाद

यांच्या जीवनाचें ओझरतें दर्शन

संग्रहालय, पुणें
अनुक्रम 3113 20
विभाग का.वा.
क्रमांक 9080
नों. दि. 3/13/69

लेखक

रा. प्र. कानिटकर

IRBK-0105762
IRBK-0105762

चित्रशाळा प्रकाशन, पुणें २

किंमत दीड रुपया

सुधारून अद्ययावत्
वाढविलेली नवी आवृत्ति
जानेवारी १९५६

सर्व हक्क प्रकाशकाधीन

मुद्रक व प्रकाशक
दामोदर त्र्यंबक जोशी
बी. ए. (टिळक)
व्यवस्थापक, चित्रशाळा प्रेस
१०२६ सदाशिव, पुणें २.

# अ नु क्र म णि का


| | | |
|---|---|---|
| | प्रस्तावना | ४ |
| | राष्ट्रपतींचा संदेश | ६ |
| १ | आयुष्याची पूर्वतयारी | ९ |
| २ | कर्तृत्वाची सुरुवात - - - | २५ |
| ३ | वकिलीचा व्यवसाय - - | ४४ |
| ४ | राजेंद्रबाबू व कॉंग्रेस - - | ५४ |
| ५ | कायदेमंडळाचें राजकारण - - | ७० |
| ६ | बेचाळीसचा लढा - - - | ७७ |
| ७ | हिंदुस्थान स्वतंत्र झाला ! - - | ८९ |
| ८ | विविध क्षेत्रांतील कामगिरी - - | ९४ |
| ९ | सेवाव्रत - - - - | १०५ |
| १० | राष्ट्रपति - - - - | १२० |
| ११ | राजेंद्रबाबूंचे उद्बोधक विचार - | १२७ |
| १२ | बाबूजींचें विविध दर्शन - - | १३६ |
| | राजेंद्रबाबूंचा जीवनपट - - - | १४१ |

# प्रस्तावना

स्वतंत्र सार्वभौम प्रजासत्ताक भारताचे पहिले राष्ट्रपति डॉ. राजेंद्रप्रसाद यांचें हें ओझरतें जीवनदर्शन मराठी वाचकांना सादर करतांना मोठा आनंद वाटतो. आजच्या हिंदुस्थानांतील सर्वश्रेष्ठ राष्ट्रप्रमुखाचें चरित्र लिहिण्याची संधि मिळणें ही जशी भाग्याची तशीच अभिमानाचीहि गोष्ट आहे. हिंदी स्वातंत्र्याच्या इतिहासांत गेलीं ३३ वर्षें डॉ. राजेंद्रबाबूंचें नांव अखंडितपणें झळकत असल्यामुळें वाचकांना त्यांची नव्यानें ओळख करून देण्याची जरूरी नाहीं. वयाच्या ३३ व्या वर्षी त्यांच्या चंपारण्यांतील सत्याग्रही जीवनाला प्रारंभ झाला आणि आज ६६ व्या वर्षी स्वतंत्र भारताचे पहिले अध्यक्ष किंवा राष्ट्रपति होण्याचा अद्वितीय बहुमान त्यांना मिळाला आहे. राजेंद्रबाबूंना हें महनीय स्थान सहजगत्या किंवा योगायोगानें मिळालेलें नाहीं. त्यासाठीं त्यांनीं अविरत तपश्चर्या, खडतर देशभक्ति, अविश्रान्त लोकसेवा व अखंड कर्मयोग यांची जी साधना केली व त्याचबरोबर निष्ठावंत सत्याग्रहाचें जें व्रत अव्यभिचारीपणानें आचरलें, त्याचें हें फळ त्यांना आज लाभत आहे.

पं. जवाहरलाल नेहरू हे महात्मा गांधींचे राजकीय वारस असले तर डॉ. राजेंद्रप्रसाद हे गांधीजींचे आध्यात्मिक वारसदार आहेत. गांधीजींचे सत्य, अहिंसा, धार्मिक वृत्ति, विधायक प्रवृत्ति, स्वार्थत्याग, सेवापरायणता, खादीभक्ति, संघटनाशक्ति, इत्यादि जे अनेक गुणविशेष होते ते राजेंद्रबाबूंमध्यें संक्रान्त झाले आहेत असें यथार्थपणें म्हणण्यास प्रत्यवाय नाहीं. जागतिक शांतता किंवा विश्वधर्म यासंबंधीं जगाला मार्गदर्शन करणारा संदेश देण्यास आज राजेंद्रबाबूंशिवाय दुसरा कोण अधिकारी पुरुष आहे ?

डॉ. राजेंद्रप्रसादांच्या जीवन-चरित्राचें सार 'सेवा' या एका शब्दांत सांगतां येईल. त्यांच्या चरित्राला अनेक पैलू असले तरी प्रत्येक पैलू सेवेच्या तेजानें दीप्तिमान झाला आहे. त्यांच्या जीवनचारित्रांतला कोणताहि प्रसंग पाहा, त्याला देशसेवेचें, लोकसेवेचें किंवा अनाथसेवेचें अधिष्ठान नाहीं असें

आढळणार नाहीं. त्यांचें हृदय इतकें थोर, विशाल व सहानुभूतीनें भरलेलें आहे कीं त्यांना 'साधु' म्हणणें अधिक समुचित होईल. गांधीजी महात्मा होते, पं. मालवीय धर्मात्मा होते,. तर बाबूराजेंद्रप्रसाद दयात्मा आहेत. त्यांच्या या वृत्तीमुळेंच, ते जरी विद्वान् पंडित व राज्यशास्त्रज्ञ असले तरी गांधीजीप्रमाणें ते 'अनिच्छन्नपि वार्ष्णेय बलादिव नियोजितः' या न्यायानुसार अनिच्छेनें राजकारणांत दाखल झाले. राजकारण हा त्यांच्या स्वभावाचा स्थायी धर्म नाहीं.

राजेंद्रबाबूंच्या लोकप्रियतेचें रहस्य त्यांच्या तीन गुणांत सामावलेलें आहे. ते मूर्तिमंत सौजन्यशील आहेत, अजातशत्रु आहेत, आणि प्रसिद्धि-विन्मुख आहेत. कॉंग्रेसमधील गांधीवादी विधायक राजकारणाचे व सर्वोदयाचे ते एकमेव प्रतीक आहेत. त्यामुळें महात्मा गांधींच्या नंतर राष्ट्राचें कर्णधार होण्यास, राष्ट्रपति होण्यास ते सर्वतोपरी पात्र आहेत हें सांगण्याची जरूरी नाहीं.

प्रस्तुत पुस्तकाची पहिली आवृत्ति, बाबू राजेंद्रप्रसाद १९३४ सालीं मुंबई कॉंग्रेसचे अध्यक्ष झाले त्या वेळीं निघाली होती. या नव्या आवृत्तीला इतर हिंदी व इंग्रजी पुस्तकाप्रमाणेंच राजेंद्रबाबूंच्या 'आत्मकथे' चाहि बराच उपयोग झाला आहे, हें अवश्य नमूद केलें पाहिजे. या चारित्र्याच्या कामीं ज्यांचें साहाय्य झालें त्यांचेहि आभार मानणें जरूर आहे.

महाशिवरात्र १८७१
१५-२-१९५०

रा. प्र. कानिटकर

# राष्ट्रपतींचा संदेश

" जगांतील सर्व राष्ट्रांशीं शांततामय व स्नेहाचे संबंध ठेवून जागतिक शांतता-रक्षणास साहाय्य करणें हें माझ्या सरकारचें दृढ धोरण आहे. इतर कोणत्याहि राष्ट्राबरोबर भारतीय प्रजासत्ताकाचें पूर्वापार वैर नाहीं. आणि जागतिक शांतता प्रस्थापित करणें व कोणत्याहि राष्ट्राशीं शत्रुत्व निर्माण होईल अशा प्रकारचे लागेबांधे जोडण्याचें टाळणें हें माझ्या सरकारचें धोरणच पुढें चालू राहील.

भारत हें सार्वभौम प्रजासत्ताक राष्ट्र आहे. पण राष्ट्रकुलांतील राष्ट्रांबरोबरचा संबंध पुढें तसाच ठेवण्याचें भारतानें ठरविलें आहे. घटना कायदा व इतिहास या दृष्टीनें ही घटना अगदीं अद्वितीय अशी आहे. त्यामुळें आम्ही स्वातंत्र्याला कोणत्याहि प्रकारच्या मर्यादा घालीत नसून राष्ट्रकुलांत प्रतिनिधिभूत असलेल्या राष्ट्रांशीं स्नेहभाव व सहकार्य पुढें चालू ठेवण्याची आमची इच्छा त्यायोगें व्यक्त होते...परराष्ट्रांबरोबरचे माझ्या सरकारचे संबंध स्नेहभावाचे असून बऱ्याच राष्ट्रांशीं माझ्या सरकारनें राजनैतिक प्रतिनिधींची देवाण घेवाण केली आहे. चीनच्या नवीन सरकारला आम्हीं नुकतीच मान्यता दिलेली आहे. युरोपांतील राष्ट्रें, अमेरिका व ऑस्ट्रेलिया यांच्याशीं भारत स्नेहसंबंध प्रस्थापित करीत आहे. इंडोनेशियाच्या स्वतंत्र व संयुक्त संस्थानांची स्थापना ही ऐतिहासिक महत्त्वाची घटना होय...

आमच्या शेजारीं राष्ट्राबरोबरचे स्नेहसंबंध जितके चांगले असावयास पाहिजेत तितके चांगले नाहींत आणि उभयतांत कित्येक वादग्रस्त प्रश्न आहेत हें सांगण्यास मला खेद होतो. उभयतांतील वादग्रस्त प्रश्न लढाईनें न सोडवितां वाटाघाटी, मध्यस्थ, लवाद अगर आंतरराष्ट्रीय मध्यस्थ या मार्गानें सोडवूं अशी प्रतिज्ञावजा घोषणा उभयतांनीं करावी अशी सूचना आम्हीं पाकिस्तानला केली आहे. ज्या भावनेनें ही सूचना करण्यांत आली आहे त्या भावनेनें पाकिस्तान ती स्वीकारील व दोन देशांतील तेढ नष्ट करण्यास साहाय्य करील असा मला विश्वास वाटतो....

देशांतील आर्थिक परिस्थिति हा माझ्या सरकारच्या चिंतेचा गंभीर विषय होय. दीर्घकालीन पारतंत्र्य व महायुद्धाचा भार यामुळें देशाची आर्थिक परिस्थिति खिळखिळी झाली. अत्यावश्यक वस्तूंचा तुटवडा पडला व भाववाढ झाली. लोकांचें जीवनमान सुधारणें हें माझ्या सरकारचें मुख्य उद्दिष्ट होय. फाळणीनंतर आलेल्या महान् संकटांमुळें व त्यांच्या आर्थिक भारामुळें आमच्या अपेक्षेप्रमाणें प्रगति झाली नाहीं. संरक्षणविषयक खर्चाचा भार फार मोठा आहे. अंतर्बाह्य शांतता राखण्याचें सरकारचें काम आहे. आंतून व बाहेरून देशाला संकटांत टाकण्याचे प्रयत्न होत असतां सैन्यभार कमी करण्याचा धोका पत्करणें शक्य नव्हतें. स्वातंत्र्यविषयक आद्य कर्तव्य म्हणजे स्वातंत्र्याचें रक्षण करणें हेंच होय व अशा बाबतींत कोणत्याच देशाला धोका पत्करतां येणार नाहीं. देशाचें संरक्षण हें माझ्या सरकारचें आद्य कर्तव्य होय. तरीहि लष्करी खर्च कमी करण्याची त्यास उत्सुकता आहे. शांततेविषयींच्या तळमळीचें प्रतीक म्हणून या खर्चांतहि काटकसर करण्याचा आमचा विचार आहे.

युद्धाच्या आपत्तींतून सांवरल्या न गेलेल्या, एकामागून एक पेंचप्रसंग निर्माण होत असलेल्या व भीति, संशय आणि कटुता यांनीं व्यापलेल्या अस्वस्थ जगांत आपण राहात आहों. आपल्या समोर महान् व कष्टप्रद कार्यें उभीं असून धैर्य, सहकार्य व श्रम यांच्यायोगें आपण त्यांना तोंड दिलें पाहिजे.

जागतिक शांतता-रक्षणास सर्वतोपरी साहाय्य करण्याकरितां सर्व राष्ट्रांशीं शांततेचे व स्नेहाचे संबंध ठेवणें हें माझ्या सरकारचें ठाम धोरण आहे. कोणत्याहि स्वरूपांतील साम्राज्यसत्ता व वांशिक भेदभाव यांना आमचा संपूर्ण विरोध आहे.''

— डॉ. राजेंद्रप्रसाद

[ ३१-१-१९५० ]

“ देशसेवेपलीकडे माझी दुसरी कोणतीच महत्त्वाकांक्षा नाहीं. माझ्या आयुष्यांत जर कोणतें सर्वोच्च व एकमेव ध्येय असेल तर देशसेवा एवढेंच आहे. ”

* * *

“ ज्या राष्ट्राला आपल्या अन्नवस्त्रासाठीं परक्यावर अवलंबून राहावें लागतें त्याचीं शंभर वर्षें भरण्यास वेळ लागत नाहीं. ”

* * *

“ गांधीजींनीं आपलें उभें आयुष्य रामराज्याचें ध्येय साधण्यासाठीं वेंचलें. कॉंग्रेस कार्यकर्त्यांनीं लक्षांत ठेवलें पाहिजे कीं, तें ध्येय साध्य होईपर्यंत आपलें कर्तव्य संपलेलें नाहीं. ” (२-११-४९).

* * *

“ जगांत विश्वासाचें व सहकार्याचें वातावरण निर्माण व्हावें अशी आमची सदिच्छा आहे. आमचें नवे प्रजासत्ताक राष्ट्रजनक महात्मा गांधी यांनीं घालून दिलेल्या चतुःसूत्रीवर चालणार आहे. सहिष्णुता, आत्मौपम्य वृत्ति, अहिंसा व आक्रमणाचा प्रतिकार हीं आमचीं मुख्य धोरणें राहणार आहेत. ”(२६-१-१९५०)

— डॉ. राजेंद्रप्रसाद

# १ : आयुष्याची पूर्वतयारी

हिंदी राष्ट्राच्या आधुनिक राष्ट्रनिर्मात्यांत डॉ. राजेंद्रप्रसाद यांचें स्थान फार उच्च आहे. भगवान् बुद्धाच्या पुण्यपावन भूमींत त्यांचा जन्म झाला असून सेवा, सौजन्य, श्रद्धा, आतिथ्य, इत्यादि अनेक आदर्श विहारी गुणांचा त्यांच्या ठिकाणीं संगम झाला आहे. त्यांचें कायस्थ घराणें सात आठ पिढ्यांपूर्वीं बिहार येथें स्थायिक झालें. बंगाल, बिहार व संयुक्त प्रांत या प्रांतांत कायस्थांची अनेक संपन्न व प्रसिद्ध घराणीं आहेत. त्यांपैकींच एका कुलीन घराण्यांत शके १८०७ च्या मार्गशीर्ष पौर्णिमेला सारन जिल्ह्यांत जीरादेई येथें डॉ. राजेंद्रप्रसाद यांचा जन्म झाला. त्यांना ३ डिसेंबर १९४९ रोजीं ६५ वें वर्ष लागलें. बिहार प्रांतानें डॉ. राजेंद्रबाबूंच्या रूपानें हिंदी राष्ट्राला एक मौल्यवान देणगी दिली आहे यांत शंका नाहीं.

## कुलवृत्तान्त

राजेंद्रबाबूंचें घराणें बिहार प्रांतांत महशूर आहे. त्यांच्या घराण्याचें नांव कोणाला ऐकून ठाऊक नाहीं, अशी व्यक्ति क्वचितच आढळून येईल. महात्मा गांधींच्या पूर्वजांप्रमाणें बाबुजींच्या पूर्वजांनींहि कुठल्या ना कुठल्या संस्थानांत दिवाणगिरीचीं कामें केलीं आहेत. असें सांगतात

कीं, त्यांचे एक फार प्राचीन पूर्वज फत्तेपूर शिक्रीनजीक राहात असत व ते फत्तेपूर शिक्रीच्या राजाची दिवाणगिरीहि करीत असत. सुमारें दोनशें वर्षांपूर्वींची ही गोष्ट आहे, कांहीं काळानंतर हे पूर्वज फत्तेपूर शिक्रीहून निघून संयुक्त प्रांतांतील अमोढा या गांवीं दाखल झाले. पुन्हा त्या घराण्यापैकीं बाबू हुलमन पांडेय हे अमोढा सोडून बलिया येथें गेले व तेथें राज्य करीत असलेल्या हरदी राजाचे दिवाण झाले. पुष्कळ वर्षांनंतर त्यांच्या पांचव्या पिढींत जन्माला आलेले बाबू चित्तूदास यांनीं बलियाचा त्याग केला, व ते सारन जिल्ह्यांतील जीरादेई या गांवीं आले व तेथेंच घर बांधून स्थायिक झाले. त्यांच्या मुलांबाळांनीं तेथें कांहीं जमीन खरेदी केली व ती वाढवतां वाढवतां ते एक मोठे जमीनदार होऊन बसले. बाबू चित्तूदासच्या पांचव्या पिढींत दिवाण चौधुरलाल या नांवाची एक लोकप्रिय व्यक्ति होऊन गेली. सारन जिल्ह्यांतलें हथुआचे राजे महाराज छत्रधारी साही व महाराज इन्द्रप्रताप साही या दोघांच्याहि राजवटींत बाबू चौधुरलाल यांनींच दिवाणगिरी संभाळली. होती. त्यांच्या कर्तबगारीमुळेंच केवळ हथुआ राजाचें उत्पन्न वाढून त्याचा खजिना एकसारखा भरतच गेला. महाराजहि चौधुरलालांची स्वामिनिष्ठा, इमानीपणा व कर्तृत्व पाहून त्यांच्यावर अलोट खूष होते. राजदरबारांत त्यांचा मानसन्मानहि विशेष असे. महाराज इन्द्रप्रताप यांच्या मृत्यूनंतर चौधुरलाल गोरखपूर जिल्यांतील तमकुही राजाचे दिवाण म्हणून काम करूं लागले. बाबू चौधुरलाल हे बाबू राजेंद्रप्रसाद यांचे आजे जे बाबू मिश्रीलाल त्यांचे सख्खे बंधु होत. बाबू मिश्रीलाल वयाच्या एकविसाव्या वर्षींच वारले. त्या वेळीं त्यांचे चिरंजीव म्हणजे बाबू राजेंद्रप्रसाद यांचे वडील, बाबू महादेव सहाय हे फक्त दीड वर्षाचे होते. त्यामुळेंच त्यांच्या पालनपोषणाचा भार दिवाण चौधुरलालजींवरच पडणें साहजिक होतें. बाबू महादेव सहाय हे एक साधुपुरुषच होते असें म्हटल्यास चालेल. दीनदुबळ्यांचीं व अनाथअपंगांची सेवा करण्यांत

( हिभाग ... १
( ...


त्यांना मोठा आनंद वाटे व आपलें सर्व आयुष्य त्यांनी परोपकारांतच झिजविलें. त्यांना आयुर्वेद व युनानी औषधपद्धतींची चांगलीच माहिती होती व ते दोन्ही प्रकारच्या वैद्यविद्येंत सारखेच निष्णात होते. या विद्येचा भरपूर उपयोग करून घेण्यांत व अनाथांना फुकट औषधोपचार करण्यांत त्यांना मोठा आनंद वाटे. आपल्या स्वतःच्या खर्चानें निरानिराळ्या प्रकारचीं औषधें तयार करून तें गोरगरिबांना वांटीत असत. वैद्यकी हा कांहीं त्यांचा धंदा नव्हता. परोपकाराच्या आवडीमुळें त्यांनीं हा वैद्यकीचा पेशा स्वीकारला होता. वडिलांप्रमाणें राजेंद्रबाबूंची आईहि मोठी साध्वी होती. तिचें हृदय थोर, मन विशाल व स्वभाव अत्यंत सज्जन होता. तिचेच हे अमोल स्वभावगुण राजेंद्रबाबूंच्या ठिकाणीं संक्रान्त झाले आहेत असें म्हणण्यास हरकत नाहीं. परोपकार व लोकसेवा हीं दोन महाव्रतें राजेंद्रबाबूंनीं जीं आपल्या आयुष्यांत घेतलीं त्यांना त्यांच्या मातेचीच बहुधा प्रेरणा असावी. राजेंद्रबाबूंची आई म्हणजे एक स्फूर्तिदेवता होती.

राजेंद्रबाबू मिळून एकंदर पांच भावंडें. तीन बहिणींपैकीं दोन निवर्तल्या असून सध्यां एक हयात आहे. भाऊ एकच. त्याचें नांव बाबू महेंद्रप्रसाद. ते १९३४ च्या जून महिन्यांत आपल्या वयाच्या ६० व्या वर्षी वारले. ते कौन्सिल ऑफ स्टेटचे सभासद होते. सर्व भावंडांत राजेंद्रबाबू हें शेंडेफळ. महेंद्रबाबू व राजेंद्रबाबू या दोघांचें प्राथमिक शिक्षण वडिलांच्या देखरेखीखालीं सुरू झालें.

## शिक्षण

बाबूजींच्या गांवीं त्या वेळीं आजच्याप्रमाणें शाळेची सोय नसल्यामुळें खाजगी रीतीनें एखादे हिंदु गुरुजी अगर मुसलमान मौलवी मुलांना शिकवीत असत. अर्थात् हें शिक्षण म्हणजे परंपरेनें चालत आलेलें ठराविक असें. पंडितजी अगर मौलवी कोणीहि असो, विद्या-

र्थ्यांना मनापासून व आपलेपणानें शिकविण्यांत कोणीहि कुचराई करीत नसे. पंडितजी रूपावळी–समासचक्रापासून सुरुवात करून काव्य-व्याकरणापर्यंत संस्कृतचें बरेंच शिक्षण देत, तर मौलवी उर्दू–फारशींत चांगली गति होईल इतपत शिकवीत असत. राजेंद्रबाबूंचें शिक्षण पहिलीं कांहीं वर्षें अशाच गुरुजींच्या हाताखालीं होऊन त्यांनीं फारशी-मध्यें बरेंच प्रावीण्य संपादन केलें. इंग्रजीचा त्या वेळीं गंध नव्हता. नाहींतर दहाव्या वर्षींच राजेंद्रबाबूंची तयारी मॅट्रिकइतकी सहज झाली असती. ते पहिल्यापासूनच बुद्धीनें चलाख असल्यामुळें कोणत्याहि विषयाचें आकलन करण्यास त्यांना यत्किंचितहि वेळ लागत नसे अगर प्रयास पडत नसत.

राजेंद्रबाबूंना लहानपणीं अशी संवय होती कीं, संध्याकाळ होते न होते तोंच झोंपी जावें व पहांटे लवकर उठावें. ही संवय ते वकिली करूं लागले तोंपर्यंतहि कायम होती. या संवयीसंबंधीं त्यांनीं आपल्या आत्मचरित्रांत पुढील मनोरंजक हकीकत दिली आहे : " मला अशी आठवण आहे कीं संध्याकाळीं झोंप लागल्यावर रात्रीं कोणीतरी मला उठवून जेवूं घालीत असे. कित्येकदां तर असें होई कीं, माझे डोळे मिटलेले असत व माझी काकी माझें तोंड उघडून मला भात भरवीत असे व झोंपेंतच मी घास गिळीत असे, असें सांगतात. पांचव्या इयत्तेंत असेपर्यंत झोंपेंत जेवण्याची मला संवय होती. आमचा एक ब्राह्मण आचारी होता. त्याला माझी ही संवय माहीत होती. मी पाटण्यास शिकत असतां तो मला झोंपेंतहि भरविण्याचें काम करीत असे. मी वकिली सुरू करीपर्यंत माझी ही संवय सुटली नाहीं. संध्याकाळीं वकिलीचे कागदपत्र घेऊन वाचूं लागलों कीं मला डुलक्या येऊं लागत. त्या वेळीं फार तर ७॥ वाजलेले असत. १९१४ सालीं मी एल्एल्. एम्. च्या परीक्षेचा अभ्यास करीत होतों तेव्हां एक महत्त्वपूर्ण घटना घडून आली. मी त्या वेळीं कलकत्ता हायकोर्टांत वकिली करीत होतों.

शिवाय तेथील लॉ कॉलेजांत प्रोफेसरहि होतों. त्यामुळें सकाळचा वेळ कॉलेजची तयारी करण्यांत व बाकीचा सबंध दिवस कोर्टांत जात असल्यामुळें मला अभ्यासाला वेळ मिळत नसे. त्यामुळें रात्रींच्या वेळीं अभ्यास करण्याशिवाय मला गत्यंतर नव्हतें. पण संध्याकाळीं पुस्तक हातांत घेतलें कीं ताबडतोब झोंपेनें मला घेरलें जाई. म्हणून मीं एक दिवस असा विचार केला कीं कांहींहि करून झोंप येऊं द्यावयाची नाहीं व कमींत कमी ९ वाजेपर्यंत अभ्यास करावयाचा. त्याप्रमाणें मी निश्चयानें बसलों. झोंप येऊं लागल्याबरोबर एकदम उठून उभा राहिलों, पण तरीहि झोंपेचा अंमल कमी होईना म्हणून खोलींतल्या खोलींत फेऱ्या घालूं लागलों. किती वेळ माझा हा क्रम चालला होता कोण जाणे, पण एकदम माझ्या हातांतून पुस्तक गळून पडलें आणि त्याच्या पाठोपाठ मी धाडकन् फरशीवर आदळलों. त्या वेळीं माझें डोकेंच फुटावयाचें, पण थोड्यावर भागलें. व तेव्हांपासून मीं असा निश्चय केला कीं वेळ मिळेल त्याप्रमाणें बसल्या बसल्या जो होईल तो अभ्यास करावयाचा."

इ. स. १८९३ सालीं वयाच्या नवव्या वर्षीं छपरा येथील हायस्कूलमध्यें त्यांचें नांव दाखल करण्यांत आलें. तेथें त्यांचें संस्कृत व इंग्रजी शिक्षण सुरू झालें. शाळेंत आल्याबरोबर त्यांनीं इतकी तीव्र बुद्धि दाखविली कीं, हेडमास्तरांनीं त्यांना दुसऱ्याच वर्षीं एकदम तिसऱ्या इयत्तेंत बसविलें. पुढें १८९५ सालच्या ऑगस्ट महिन्यांत ते आपल्या बंधूकडे पाटण्यास गेले व तेथें टी. के. घोष यांच्या शाळेंत त्यांनीं आपलें नांव नोंदविलें. तेथें दोन वर्षें काढल्यानंतर महेंद्रबाबूंनीं डॉक्टर होण्यासाठीं कलकत्त्याचा मार्ग स्वीकारला. त्यामुळें पुन्हा राजेंद्रबाबूंवर पाटणा सोडण्याचा प्रसंग आला. ते परत हथुआला गेले; व तिथल्या हायस्कुलांत जाऊं लागले. पण तिथलें एकंदर शिक्षण त्यांना मनासारखें न वाटल्यामुळें त्यांचा विरस झाला व ते आजारी पडले. १८९८ मध्यें छपरा

येथील हायस्कूलमध्यें येऊन त्यांनीं मॅट्रिक पर्यंत अभ्यास केला, पण मॅट्रिकच्या ऐन परीक्षेच्या वेळीं ते पुन्हा आजारी पडले. त्यांच्या काखेंत गांठ आल्यामुळें त्यांना प्लेग झाला अशी शंका वाटूं लागली व तावडतोब त्यांना घरीं नेण्यांत आलें. या शाळेंत असतांना प्रत्येक वर्षाच्या परीक्षेंत ते पहिला नंबर मिळवून सर्वांकडून वहावा करून घेत. प्रत्येक वर्षीं त्यांना शाळेंत शिष्यवृत्तीहि मिळत असे. अखेर १९०२ सालच्या मार्च महिन्यांत राजेंद्रबाबू कलकत्ता युनिव्हर्सिटीच्या मॅट्रिकच्या परीक्षेला बसून वीस हजार विद्यार्थ्यांत पहिले आले. इतक्या विद्यार्थ्यांत कलकत्त्याबाहेरचा एका खेड्यांत राहणारा विद्यार्थी पहिला येतो, हीं आश्चर्य वाटण्यासारखीच गोष्ट होती. कारण कलकत्त्यासारख्या शिक्षणाच्या केंद्रस्थानीं राहणाऱ्या विद्यार्थ्यांपैकीं कोणालाहि हा अपूर्व मान न मिळतां छपरा हायस्कूलसारख्या आडबाजूच्या वांट्याला हा मान यावा ही गोष्ट राजेंद्रबाबूंच्या अपूर्व बुद्धिशालित्वाची द्योतक नाहीं काय ? या परीक्षेंत त्यांनीं अनेक बक्षिसें व शिष्यवृत्त्या मिळविल्या.

## विवाह

राजेंद्रबाबूंचा विवाह त्या वेळच्या चालीरीतीप्रमाणें फार लहानपणीं झाला. त्या वेळीं त्यांचें वय पुरतें १२ सुद्धां नव्हतें. ते पांचवी शिकत होते व विवाह म्हणजे काय याचा अर्थ कळण्यापूर्वींच ते चतुर्भुज झाले. त्यांचें लग्न जीरादेईपासून २० कोसांवर दलनछपरा येथें मोठ्या थाटामाटांत पार पडलें. वधूपक्षाकडून त्यांना दोन हजार रुपये वरदक्षिणा मिळाली होती व पालखींतून वराची मिरवणूक निघाली होती. इतकेंच नव्हे तर पुढें दोन हत्तीहि झुलत होते. लग्नाचा सोहोळा फार मोठा असल्यामुळें नवरदेवांना पालखींतच झोंप लागली. विवाहाचा मुहूर्त रात्रीचा होता व मोठ्या कष्टानेंच नवरदेव ऐन लग्नाच्या वेळीं जागे झाले. या लग्नाशीं आपला काय संबंध अशा भावनेनेंच ते वागत

होते. राजेंद्रबाबूंच्या घरीं त्या वेळीं पडदापद्धति फार कडक असल्यामुळें त्यांचा घरांतल्या वडील स्त्रियांशींहि फारसा संबंध आला नाहीं. ते जवळ जवळ सारखे बाहेरच असत. त्यामुळें विद्यार्थिदशेंत जरी त्यांचा विवाह झाला तरी तो त्यांच्या अभ्यासाच्या आड आला नाहीं, कारण त्यांची बायको मुलगीच असल्यामुळें बहुतकरून माहेरींच असे व सासरी आली तरी पतिपत्नींना एकमेकांचें दर्शनहि होत नसे त्यामुळें त्यांचा अभ्यासक्रम निर्विघ्नपणें पार पडला.

## प्रेसिडेन्सी कॉलेज

मॅट्रिक झाल्याबरोबर त्यांनीं १९०२ च्या जुलै महिन्यांत कलकत्त्याच्या प्रेसिडेन्सी कॉलेजांत आपलें नांव दाखल केलें. हें कॉलेज त्या वेळीं कलकत्त्यांत अत्यंत सुप्रसिद्ध असून तेथें सुप्रसिद्ध वनस्पतिशास्त्रज्ञ जगदीशचंद्र बोस व रसायनशास्त्रज्ञ आचार्य प्रफुल्लचंद्र रे हे प्रोफेसर होते. या जगद्विख्यात शास्त्रज्ञांच्या हाताखालीं राजेंद्रबाबूंना अभ्यास करण्याचा सुयोग आला. प्रीव्हियसमध्यें असतांना ते एका हिंदु हॉस्टेलमध्यें राहात असत. या वर्षीं ते बरेच आजारी पडल्यामुळें त्यांचे पुष्कळ दिवस बुडाले, तथापि परीक्षेंत त्यांचा पहिला नंबर कायमच राहिला. ते पहिल्या वर्गांत पहिले आले. त्यांना महिना ५० रुपयापर्यंतच्या निरनिराळ्या शिष्यवृत्त्या मिळाल्या व इंग्रजी विषयाच्या नैपुण्याबद्दल पारितोषिकाहि त्यांनीं संपादन केलें. बी. ए. ला त्यांनीं वाङ्मयाबरोबर शास्त्रीय विषयहि घेतले. त्यांना कोणता विषय आवडत नसे, असें नाहीं. गणित असो, रसायनशास्त्र असो, काव्य असो, अर्थशास्त्र असो, प्रत्येक विषयांत त्यांची सारखीच गति चालत असे. तथापि प्रत्येकाच्या विशेष आवडीचा व जिव्हाळ्याचा जसा एकेक विषय असतोच, त्याप्रमाणें वाङ्मयाकडे त्यांचा मनापासून ओढा आहे. ज्यू. बी. ए. च्या परीक्षेंत शास्त्रीय विषयांत त्यांना मनाजोगे मार्क

न मिळाल्यामुळें ते पहिले आले नाहींत. त्यायोगें त्यांना थोडें वाईट वाटलें व त्यांनीं बी. ए. ऑनर्सला फक्त वाङ्मय हा विषय कायम केला. कारण शास्त्रीय विषयाकडे त्यांचें पहिल्यापासूनच जरूर तेवढें लक्ष नव्हतें. शास्त्रीय विषयांतल्या ह्या कमी प्रतीच्या यशामुळें त्यांचा परीक्षांवरचा विश्वास बराच कमी झाला व ज्या अहमहमिकेनें व ईर्षेनें त्यांनीं मॅट्रिकचा अभ्यास केला ती ईर्षा बी. ए. ला कायम राहिली नाहीं. त्यामुळें बी. ए. च्या परीक्षेंत ते सन्मानासह पहिल्या वर्गांत पास झाले तरी ते सबंध विद्यापीठांत पहिले आले नाहींत. बाबूजींनीं बी. ए. ला इंग्रजीशिवाय अर्थशास्त्र व राजनीति हे विषय घेतले होते. राजेंद्रबाबू इतिहास विषय घेऊन पुन्हा बी. ए. झाले व पहिल्या वर्गांत आले. १९०६ च्या मार्च महिन्यांत त्यांनीं बी. ए. ची परीक्षा दिली. परीक्षेंत उत्कृष्ट यश संपादन केल्यामुळें त्यांना कलकत्ता युनिव्हर्सिटीची दरमहा ४० रुपयांची शिष्यवृत्ति मिळाली. आणखी दोन शिष्यवृत्त्याहि त्यांनीं संपादन केल्या.

बी. ए. झाल्याबरोबर राजेंद्रबाबूंनीं एम्. ए. होण्याचें ठरविलें. त्या काळीं बी. ए. चा अभ्यास चालू असतांनाच एल्एल्. बी. च्या टर्म भरण्याची परवानगी असल्यामुळें पुष्कळजण बी. ए. बरोबरच एल्एल्. बी. च्याही टर्म भरीत. पण बी. ए. झाल्याशिवाय ह्या परीक्षेला बसतां येत नसे. एम्. ए. ला बी. ए. प्रमाणें टर्मची भानगड नव्हती. घरीं अभ्यास करून एक दीड वर्षांत कोणालाहि एम्. ए. होतां येत असे. राजेंद्रबाबूंनीं एम्. ए. चा अभ्यास करतांनाच एल्एल्. बी. च्या टर्म भरावयास प्रारंभ केला.

## एक भविष्य

राजेंद्रबाबूंसंबंधीं एका भविष्यवाद्यानें केलेलें एक भविष्य तंतोतंत बरोबर कसें ठरलें त्यासंबंधीची हकीकत मोठी मनोरंजक आहे. ती

हकीकत त्यांच्या एका चरित्रकारानें जशी दिली आहे तशीच येथें उद्धृत करणें अधिक इष्ट होईल. चरित्रकार लिहितो : ' बी. ए. झाल्यावर बॅरिस्टर होण्यासाठीं इंग्लंडला जाण्याचा विचार बाबूजींच्या मनांत आला. त्यांनीं जरी एम्. ए. च्या वर्गात नांव दाखल केलें होतें, तरी इंग्लंडचा विचार त्यांच्या मनांत घर करून राहिला होताच. इंग्लंडला जाण्यासाठीं व तेथें राहण्यासाठीं लागणाऱ्या खर्चाची तजवीज करण्याच्या ते हळू हळू खटपटीला लागले.

विद्यार्थिदशेंत असतांना त्यांनीं बिहारमध्यें चांगलेंच नांव मिळविलें होतें. विद्यार्थ्यांच्या जगांत त्यांनीं श्रेष्ठ स्थान अलंकृत केलें होतें व आपल्या अलौकिक हुषारीनें त्यांनीं बिहारचा लौकिक बंगालमध्यें पसरवला होता. तेव्हां अशा बुद्धिमान् विद्यार्थ्याला परदेशी शिक्षणासाठीं कोण मदत करणार नाहीं ? त्यांना जरूर तें साहाय्य तेव्हांच मिळालें व त्यांनीं इंग्लंडला जाण्याची तयारी चालविली. पण त्यांनीं घरीं आपल्या वडिलांना कांहींच कळविलें नाहीं. मात्र १९०६ च्या ऑक्टोबर महिन्यांत त्यांनीं आपले श्रेष्ठ बंधु बाबू महेंद्रप्रसाद यांस आपला हा हेतु कळविला. राजेंद्रबाबूंना सार्वजनिक वर्गणीनें इंग्लंडला जाणें मुळींच पसंत नव्हतें. योग्य व्याजानें कर्जाऊ रक्कम घेऊन इंग्लंडला जाण्याचा त्यांचा बेत होता. आपल्या कर्जाचें ओझें वडिलांच्या डोक्यावर पडणें त्यांना मुळींच पसंत नव्हतें. शिवाय वडिलांस न कळवितां पैशाची तजवीज करण्याची महेंद्रबाबूंचीहि तयारी होती. मात्र राजेंद्रबाबूंनीं बॅरिस्टर न होतां, आय्. सी. एस्. व्हावें अशी त्यांची इच्छा होती. राजेंद्रबाबूंनीं इंग्लंडला प्रयाण करण्याचा पक्का निश्चय करून कपडे शिवावयासहि टाकले. इतक्यांत या सुमारास एक मनोरंजक हकीकत घडली. ते त्या वेळीं कलकत्त्याला राहात होते. ते आपला सोबती सुखदेवप्रसाद वर्मा यांच्याबरोबर गप्पागोष्टी करीत असतांना त्यांच्या खोलींत एक ज्योतिषीबुवा आले. राजेंद्रबाबूंनीं सहज

गंमतीनें ज्योतिष्याला विचारलें कीं, मी इंग्लंडला केव्हां जाणार? राजेंद्रबाबूंचा हात पाहतांक्षणींच त्यानें सांगितलें कीं, सध्यां कांहीं तुम्ही इंग्लंडला जात नाहीं. तुम्हांला जायला अद्यापि बराच अवधि आहे. बाबू सुखदेव वर्मा यांचा हात पाहून ज्योतिषी म्हणाले कीं, हे मात्र लवकरच इंग्लंडला जातील. ज्योतिषीबुवांचें हें भविष्यकथन ऐकून दोघेहि मोठमोठ्यानें हसूं लागले. तेथें जमलेले इतर सहाध्यायीहि बुवांची थट्टा करूं लागले. कारण राजेंद्रबाबूंची इंग्लंडला जाण्याची पूर्ण तयारी होऊन चुकली होती. त्यांचे कपडेलत्तेहि तयार होऊन आले होते. आणि त्याच्या उलट सुखदेवबाबूंची स्थिति होती. इंग्लंडला जाण्याचा विचारसुद्धां त्यांच्या मनांत नव्हता. पण आश्चर्याची गोष्ट कीं, ज्योतिष्याचें हें भविष्य अचूक बरोबर ठरून राजेंद्रबाबूंचें जाणें राहिलें व सुखदेवबाबू इंग्लंडला गेले. हे सुखदेवबाबू पुढें पाटणा येथें हायकोर्ट जज्ज झाले.

राजेंद्रबाबू इंग्लंडला जात आहेत ही बातमी ऐकून त्यांच्या घरीं एकच कल्लोळ उडाला. त्यांच्या आईवडिलांसहि फार दुःख झालें. राजेंद्रबाबूंच्या इंग्लंडच्या प्रवासाची ज्यांनीं सिद्धता केली होती, त्यांत बिहारचे प्रसिद्ध पुढारी बाबू व्रजकिशोरप्रसाद हे प्रमुख होते. राजेंद्रबाबूंना त्यांचीच सर्वस्वीं मदत होती, असें म्हटल्यास चालेल. इंग्लंडला जाण्यापूर्वी व्रजकिशोरबाबूबरोबर राजेंद्रप्रसाद पैशाची तजवीज करण्यासाठीं अलाहाबादला गेले होते. राजेंद्रबाबूंच्या घरच्या मंडळींना वाटलें कीं, ते इंग्लंडलाच निघाले आहेत. तेव्हां तावडतोब त्यांची आई व इतर कांहीं मंडळी प्रयागला आली. पण त्याच सुमारास राजेंद्रबाबू कलकत्त्याला परत गेले हें ऐकतांच ती मंडळी परत घरीं गेली. राजेंद्रबाबूंनीं इंग्लंडला जावें, हें त्यांच्या मातापित्यांस मुळींच पसंत नव्हतें. राजेंद्रबाबूंचे वडील वृद्ध झाले होते. व आजारीपणामुळें बरेच दिवस अंथरुणास खिळले होते. दिवसेंदिवस त्यांची प्रकृति बिघडतच चालली

होती. अशा कठीण प्रसंगीं त्यांना पुत्रवियोग असह्य वाटल्यास आश्चर्य नव्हतें. आईलाहि आपला मुलगा आपल्यापासून दूर व्हावा, असें साहजिकच वाटत नव्हतें. अखेर आपल्या वडिलांची प्रकृति सुधारेल या आशेवर राजेंद्रबाबू कांहीं दिवस थांबले, पण एकदां बिघडलेली प्रकृति उत्तरोत्तर खालावतच जाऊन १९०७ च्या मार्च महिन्यांत ते परलोकवासी झाले. यामुळें राजेंद्रबाबूंचें इंग्लंडला जाणें अशक्य झालें, हें सांगावयास नकोच. आपल्या दुःखी मातेचें सांत्वन करून तिला धीर देणें, हेंच त्या वेळीं त्यांचें कर्तव्य होतें आणि तें त्यांनीं पुत्रधर्माला जागून यथायोग्यपणें पार पाडलें.

राजेंद्रबाबू इंग्लंडला जात नाहींत, हें नक्की ठरल्यावर बाबू सुखदेव प्रसाद वर्मा यांच्या मनांत इंग्लंडला जाण्याचा विचार आला. राजेंद्र-बाबूंनीं इंग्लंडच्या शिक्षणासाठीं जें कर्ज काढलें होतें, तें सुखदेवबाबूंना दिलें. सुखदेवबाबूंच्या वडिलांनीं हें कर्ज नंतर फेडून टाकलें. राजेंद्र-बाबूंनीं जे कपडेलत्ते तयार करून ठेवले होते, तेहि सुखदेवबाबूंच्या स्वाधीन केले. इंग्लंडची तयारी फुकट गेली नाहीं. याप्रमाणें ज्योतिषीबुवांचें भविष्य खरें ठरून राजेंद्रबाबू इथेंच राहिले व सुखदेवबाबू इंग्लंडला रवाना झाले. ज्योतिषीबुवांच्या सांगण्याप्रमाणें पुढें कांहीं वर्षांनीं म्हणजे सन १९२८ सालीं राजेंद्रबाबू एका खटल्याच्या कामासाठीं इंग्लंडला गेले.

इंग्लंडला जाणें राहिल्यामुळें राजेंद्रबाबूंनीं एम्. ए. च्या अभ्यासाकडे विशेष लक्ष पुरविलें, पण गेलीं दोन वर्षें त्यांना सार्वजनिक कामाचा ध्यास लागल्यामुळें त्यांचें अभ्यासाकडे म्हणावें तसें चित्त लागलें नाहीं. शिवाय नुकतेंच वडील वारले असल्यामुळें त्यांचें मनहि तितकें स्वस्थ नव्हतें. अखेर १९०७ च्या डिसेंबर महिन्यांत ते एम्. ए. ला बसले व दुसऱ्या वर्गांत उत्तीर्ण झाले. त्यांच्या आतापर्यंतच्या लौकिकाप्रमाणें ते पहिल्या वर्गांत पहिले आले नाहींत. एम्. ए. झाल्यावर ते लागलींच एल्एल्. बी. झाले नाहींत. जरी त्या वेळेस ते एल्एल्. बी. च्या टर्म

भरीत होते, तरी पैसे मिळविणें हें सर्वांत अधिक महत्त्वाचें कर्तव्य असल्यामुळें एम्. ए. झाल्याबरोबर त्यांनीं अध्ययनाला तात्पुरता पूर्ण विराम दिला व कांहीं उद्योगधंदा पाहण्याचें ठरविलें.

## विद्यार्थि–जीवन

राजेंद्रबाबूंचें विद्यार्थि–जीवन आदर्शभूत होतें यांत शंका नाहीं. बाबूजींना जरी अलौकिक बुद्धिमत्तेची नैसर्गिक देणगी लाभली होती, तरी 'कष्टेवीण फळ नाहीं' हेंहि त्यांनीं पुरेपूर ओळखलें होतें आणि त्याप्रमाणें प्रत्येक परीक्षेच्या वेळीं ते कसून अभ्यास करीत असत. 'आपण हुशार आहों, आपण कसेंहि पास होऊं' अशा घमेंडींत ते कधींच गेले नाहींत. उलट त्यांच्या इतका सत्त्वशील व विनयसंपन्न विद्यार्थी सांपडणें अशक्य होतें. शिवाय कांहीं घोक्या विद्यार्थ्यांप्रमाणें नेमलेल्या विषयापुरतीच कधींहि त्यांची दृष्टि नव्हती. हरएक विषयाचें ज्ञान आपल्याला असावें, या बुद्धीनें त्यांनीं प्रत्येक विषयावरचीं पुस्तकें सुट्टींत व फावल्या वेळीं वाचून काढलीं होतीं. वाङ्मय हा जरी त्यांचा मुख्य विषय होता तरी इतिहास, अर्थशास्त्र, राजकारण, रसायनशास्त्र, गणित या विषयांचा त्यांनीं विद्यार्थिबुद्धीनें व्यासंग केला होता. हिंदी व इंग्रजी या दोन विषयांत तर त्यांनीं नैपुण्य–पदवीच संपादिली होती. विद्यार्थिदशेंत विद्यार्थ्यांनीं केवळ अभ्यासच केला पाहिजे, आदर्श नागरिक होण्याला उपयोगी पडेल अशा शिक्षणाकडे लक्ष देतां कामा नये, भावी आयुष्याची पूर्वतयारी या नात्यानें कॉलेजांतील आयुष्यक्रमाकडे पाहतां कामा नये, अशी राजेंद्रबाबूंची एकांगी दृष्टि नसल्यामुळें कॉलेजांतील अभ्यासक्रमाबरोबर ते हळू हळू सार्वजनिक कामाचेंहि शिक्षण घेऊं लागले होते. भावी आयुष्याची पूर्व तयारी त्यांनीं याच वेळीं केली होती. इतकेंच नव्हे तर आपल्या भावी मोठेपणाचा पायाहि त्यांनीं कॉलेजांतच घातला होता.

राजेंद्रबाबूंची वागण्याची व अभ्यासाची पद्धत अगदीं पहिल्यापासून मोठ्या टापटिपीची आहे. त्यांना अव्यवस्था मुळींच खपत नाहीं. शाळेंत किंवा कॉलेजांत, कुठेंहि असो, त्यांची शिस्त किंवा नियमितपणा क्वचितच ढळला असेल. वेळच्या वेळीं पद्धतशीर अभ्यास करावा व खेळावयाच्या वेळीं मनमुराद खेळावें असा त्यांचा शिरस्ता होता. सगळ्या खेळांत फुटबॉल त्यांना अतिशय प्रिय असे. छपरा येथील हायस्कूलमध्यें असतांना ते शाळेच्या फुटबॉल टीमचे कॅप्टन होते, पण पुढें त्यांचें खेळाकडे बरेंच दुर्लक्ष झालें. खेळापेक्षां विद्या त्यांना महत्त्वाची वाटूं लागली. कुठल्याहि खेळाच्या शर्यतींत किंवा चढाओढींत त्यांनीं कधीं भाग घेतला नाहीं.

शाळेंत व कॉलेजांत असतांना राजेंद्रबाबूंची राहणी अगदीं साधी असे. बाबूजी कॉलेजिअन आहेत. फर्स्टक्लास बी. ए. आहेत, अशी त्यांच्याबद्दल कोणाची कल्पनाहि झाली नसती. त्यांचा स्वभाव पहिल्यापासून विनयशील, अभ्यासू व भाविक होता. 'सुशील व सज्जन' येवढ्या दोनच शब्दांत त्यांचें वर्णन करतां येईल. ते आज जितके साधेसुधे आहेत, तितकेच ते कॉलेजांत असतांनाहि होते. त्यांना तपकीर, सिगारेट किंवा दुसरें कसलेंच व्यसन नव्हतें. किंवा आजहि नाहीं. फॅशन म्हणजे काय ही गोष्ट त्यांना आज जशी माहीत नाहीं, तशी त्या वेळींहि नव्हती. स्वभावानें शांत, प्रकृतीनें मृदु व विचारानें उच्च हे राजेंद्रबाबूंचे गुणधर्म त्यांच्या विद्यार्थिदशेंतच प्रगट झाले होते. शाळेंत असतांनाच, त्यांनीं लिहिण्याचा व बोलण्याचा सराव करण्यास सुरुवात केली होती. आपल्या कांहीं मित्रांच्या साहाय्यानें त्यांनीं छपरा येथील शाळेंत असतांना एक वक्तृत्वसभा स्थापन केली होती व तेथें निरनिराळ्या विषयांवर भाषणें होत असत. शिक्षकवर्गहि त्यांना वक्तृत्वाचे पाठ देत असे.

कॉलेजांत गेल्यावर त्यांचें लक्ष सार्वजनिक गोष्टीकडे विशेष वेधलें.

समाजसेवा करण्याची त्यांना पहिल्यापासूनच मनापासून आवड असल्यामुळें तशी संधि कुठें मिळेल, यासंबंधीं ते विशेष आतुर असत. कॉलेजांतहि त्यांनीं, वक्तृत्वसभा, विद्यार्थिसंघ, वगैरे अनेक संस्था स्थापन करून आपली सार्वजनिक कामाची आवड प्रगट केली होती. कलकत्त्याला असतांना त्यांचा निरनिराळ्या सार्वजनिक संस्थांशीं संबंध आला. १९०१ सालीं कलकत्त्याला 'अरुण-मंडळ' नांवाची एक धार्मिक संस्था स्थापन झाली होती. त्या संस्थेचे सभासद होऊन राजेंद्रबाबूंनीं भगवद्गीता वगैरे आध्यात्मिक ग्रंथांचा व्यासंग वाढविला. या मंडळाचीहि दर आठवड्याला बैठक भरत असे व तेथें प्रसिद्ध व विद्वान् लोकांचीं प्रवचनें केलीं जात. तेथें गीतेंवरहि शेंकडों व्याख्यानें झालीं. या मंडळाशिवाय बाबूजींचा विशेष संबंध बिहारी क्लबाशीं आला. कलकत्त्याला राहणाऱ्या बिहारी विद्यार्थ्यांची संघटना करून त्यांच्या सर्व प्रकारच्या सुखसोयी करण्याच्या उद्देशानें हा क्लब स्थापन करण्यांत आला होता. राजेंद्रबाबू या संघाचे बरेच दिवस मुख्य चिटणीस व प्रमुख कार्यकर्ते होते. कलकत्त्याला असलेले मोठमोठे बिहारी वकील, डॉक्टर, व्यापारी सर्व प्रकारचे लोक या संघांत त्यांनीं सामील करून घेतले होते. राजेंद्रबाबूंनीं १९०६ सालीं कलकत्त्यांतील सर्व बिहारी लोकांचें एक संमेलनहि घडवून आणून आपली संघटना-शक्ति जनतेच्या निदर्शनास आणली.

१९०६ सालीं कलकत्त्याला जी काँग्रेस झाली तीच राजेंद्रबाबूंनीं पाहिलेली पहिली काँग्रेस होय. त्या वेळच्या बैठकींचें वर्णन ते पुढील-प्रमाणें करतात. "त्या वेळीं काँग्रेसमध्यें स्वयंसेवक होण्याचा मान मला मिळाला होता. काँग्रेसचें अधिवेशन मोठ्या उत्साहानें साजरें झालें. मवाळ व जहाल या दोघांचीहि त्या वेळीं बरीच उपस्थिति होती. जहालांचे पुढारी लोकमान्य टिळक, लजपतराय, बिपिनचंद्र पाल, अरविंद घोष वगैरे होते; तर 'मवाळांचे नेते' फेरोजशहा मेहता व

गोखले होते आणि माझ्या समजुतीप्रमाणें सुरेंद्रनाथ बानर्जी व पं. मदनमोहन मालवीय या दोघांच्या मध्यें होते. या दोन पक्षांमधील दुफळी मिटविण्यासाठीं किंवा कमी करण्यासाठीं दादाभाई नौरोजी यांना मुद्दाम विलातेहून बोलावून त्यांना अध्यक्षस्थान देण्यांत आलें होतें. माझें असें भाग्य कीं मला मुख्य अधिवेशनाच्या मंडपाजवळची कामगिरी मिळाली. मला विषयनियामक कमिटींतील भाषणें ऐकण्याची संधि मिळाली, पण अधिवेशनाच्या पहिल्या दिवशीं मला लांब उभे राहावें लागल्यामुळें अध्यक्षांचें भाषण मला ऐकतां आलें नाहीं. इतर स्वयंसेवक आपलें स्थान सोडून आंत मंडपांत गेले होते. मला हें योग्य वाटलें नाहीं व मला देण्यांत आलेली जागा मीं सोडली नाहीं. सरोजिनीदेवी, मालवीय व जीना यांचीं भाषणें मीं प्रथमच या अधिवेशनांत ऐकलीं. प्रदर्शनहि मोठें भरविण्यांत आलें होतें. हें अधिवेशन पाहून काँग्रेसबद्दलची माझी श्रद्धा वाढली."

बंगालफाळणीच्या आंदोलनापूर्वींच राजेंद्रबाबू स्वदेशीचे उपासक बनले होते. सुमारें १९०२ सालापासूनच स्वदेशी त्यांचा हा धर्म झाला होता. विद्यार्थिदशेंत असतांनाच राजेंद्रबाबूंनीं लोकसेवेचें व स्वदेशीचें कंकण बांधलें होतें. ही गोष्ट आजकालच्या कॉलेज—विद्यार्थ्यांनीं आपल्या हृदयावर बिंबवून ठेवली पाहिजे. कॉलेजांत असतांना चैनीपलीकडे व फॅशनपलीकडे ज्या विद्यार्थ्यांची दृष्टि जात नाहीं व स्वदेश आणि स्वदेशी यांकडे ज्यांचें लक्ष पोंचत नाहीं, ते विद्यार्थी उच्च शिक्षणाला नालायकच म्हटले पाहिजेत. वास्तविक पाहतां उच्च शिक्षणामुळें विद्यार्थ्यांची दृष्टि व्यापक व्हावयास पाहिजे. जर उच्च शिक्षणाचा परिणाम हुच्च विद्यार्थी निपजण्यांत होईल, तर तें शिक्षण कुचकामाचें म्हणावें लागेल. राजेंद्रबाबूंच्या मनावर उच्च शिक्षणाचा खराखुरा सुपरिणाम झाला होता. आपल्या देशाची परिस्थिति काय आहे व त्या साठीं आपण स्वदेशीचें व्रत किती कसोशीनें पाळलें पाहिजे, याची

त्यांना कॉलेजांत असतांनाच यथार्थ जाणीव झाली होती. तसेंच सार्वजनिक कामाच्या बाबतींत लागणाऱ्या निःस्वार्थ बुद्धि, निरलसता व सेवावृत्ति या तीनहि गोष्टी त्याच्या अंगीं बाणल्या होत्या. राजेंद्रबाबूंची सार्वजनिक कार्याबद्दलची ही वृत्ति पाहून स्वामी विवेकानंदांची शिष्या भगिनी निवेदिता यांनीं त्या वेळीं जे उद्गार काढले होते ते आजहि आपल्या प्रत्ययास येत आहेत. 'राजेंद्रबाबू हिंदी राष्ट्राचे पुढारी होतील' असें भविष्य निवेदिताबाईंनीं १९०५ सालीं वर्तविलें होतें. तें भविष्य-कथन किती तंतोतंत खरें ठरलें हें आपण पाहातच आहोंत.

# २ : कर्तृत्वाची सुरुवात

एम्. ए. झाल्याबरोबर पुढें काय करावें या प्रश्नाचें त्यांना फार दिवस चिंतन करावें लागलें नाहीं. कारण त्यांचा मार्ग आपोआपच निश्चित झाला. अनाथांच्या सेवेचें कंकण बांधून दुसऱ्याला उपयोगी पडण्यासाठीं सदैव सिद्ध असणाऱ्या राजेंद्रबाबूंनीं मुझफरपूरच्या ब्राह्मण कॉलेजच्या मदतीला धाव घेतली व तेथील अध्यापकांची जागा स्वीकारली, यांत मुळींच आश्चर्य नाहीं. त्या वेळीं भूमिहार ब्राह्मण कॉलेजची स्थिति मोठी अनुकंपनीय झाली होती. कॉलेजांत जर लायक व विद्वान् अध्यापकवर्ग नसेल आणि अवश्य ती साधनसामुग्री किंवा उपकरणें नसतील तर युनिव्हर्सिटीकडून कॉलेजची मान्यता काढून घेण्यांत येईल, असें फर्मान निघालें होतें. कॉलेजमधील हा प्रसंग टळावा, यासाठीं कॉलेजच्या व्यवस्थापकांनीं आपल्याकडून शिकस्त चालविली होती. बाहेरच्या नामांकित विद्वानांना अध्यापक होण्यासाठीं विनंती करण्यांत आली होती. पण हें ब्राह्मण कॉलेज नांवाप्रमाणेंच द्रव्यहीन असल्यामुळें प्रोफेसरांच्या लायकीप्रमाणें त्यांना वेतन मिळणें शक्य नव्हतें. स्वार्थत्याग करून अगदीं अल्प वेतनावर संतुष्ट होणारे प्रोफेसर मिळतील तरच कॉलेजचा तरणोपाय असल्यामुळें ब्राह्मण कॉलेजच्या व्यवस्थापकांनीं राजेंद्रबाबूंची गांठ घेऊन त्यांना आपला मनोदय कळविला.

कॉलेजांत प्रोफेसरी करावी व विद्यार्थ्यां [illegible] ांची केव्हांहि इच्छा नव्हती. एम्. ए.च्या बरोबर [illegible] वकिलीची पाहिली परीक्षा दिलीच होती, तेव्हां दुसरी परीक्षा देऊन वकिली करण्याचा त्यांचा संकल्प होता. पण मध्यंतरीं भूमिहार कॉलेजच्या चालकांनीं त्यांना अध्यापक होण्यास विनंती केल्यामुळें राजेंद्रबाबूंनीं ती जागा पत्करली. सहृदयता हा बाबूजींचा मोठा गुण असल्यामुळें आपल्यामुळें जर ह्या कॉलेजचें कल्याण होत आहे तर तें कां न करा असा विचार करून त्यांनीं तावडतोब होकार दिला व ते भूमिहार कॉलेजांत इंग्रजीचे प्रोफेसर झाले. बाबूजी जर कॉलेजमध्यें येतील तर कॉलेजवरचें गंडांतर टळेल, अशी चालकांची खात्री होती. कारण कलकत्ता युनिव्हर्सिटींत त्यांचें दांडगें वजन होतें. खुद्द व्हाईस चॅन्सेलर सर आशुतोष मुकर्जी यांना बाबूजींच्या योग्यतेची यथार्थ जाणीव होती. या कॉलेजांत जवळ जवळ विनावेतनच काम करावयाचें आहे ही गोष्ट राजेंद्रबाबूंच्या ध्यानांत होतीच, पण त्यांच्या स्वभावसिद्ध परोपकारवृत्तीला कोण बांध घालणार?

बाबूजींना कांहीं एकच विषय अवगत होता असें नाहीं. विद्यार्थिदशेंत त्यांनीं निरनिराळीं विषयांवरचीं पुस्तकें वाचून बहुश्रुतता प्राप्त करून घेतली होती. त्यांचें इंग्रजीखेरीज अनेक विषयांवर प्रभुत्व होतें. कोणताहि विषय पुढें येवो, बाबूजींची त्यांत गति नाहीं, असें क्वचितच घडे. त्यामुळें या कॉलेजांत प्रोफेसर असतांना त्यांना अर्थशास्त्र, राज्यनीति वगैरे विषय शिकविण्याचा प्रसंग आला, तरी आपल्या आवडत्या विषयाइतकेंच त्यांनीं त्यांत आपलें नैपुण्य प्रकट केलें. शिकविण्यासाठीं म्हणून राजेंद्रबाबूंनीं अनेक विषयांचा मुद्दाम अभ्यास चालविला होता. आजकालच्या प्रोफेसरवर्गांत घरून तयारी करून येणारे कितीसे प्रोफेसर सांपडतील? जें काम एकदां हातीं घेतलें तें पुरें करण्यासाठीं जितके परिश्रम करावयास लागतील तितके करतांना थोडीसुद्धां कुचराई

करावयाची नाहीं हा राजेंद्रबाबूंचा स्वभावधर्म आहे. या कॉलेजांत प्रोफेसर म्हणून त्यांनीं जुलै १९०८ पासून मार्च १९०९ पर्यंत अवघें एक वर्षच काम केलें. त्या अवधींत त्यांची प्रिन्सिपॉल म्हणूनहि कांहीं दिवस नेमणूक झाली होती. ब्राह्मण कॉलेजांतील प्रोफेसरीची आमदानी संपल्यावर कलकत्ता येथें असतांनाहि त्यांनीं १९०९ सालीं सुमारें एक टर्मभर सिटी कॉलेजांत प्रोफेसर म्हणून काम केलें. त्यांनीं या वेळीं मागच्याप्रमाणेंच इतिहास व अर्थशास्त्र हे विषय शिकविले. हातीं घेतलेल्या विषयाची पूर्ण तयारी असल्यामुळें व शिकविण्याच्या कामीं त्यांचा हातखंडा असल्यामुळें विद्यार्थिवर्गांत ते तेव्हांच लोकप्रिय होत. त्यांचा मनमिळाऊपणाचा गुण या लोकप्रियतेला कारणीभूत झाला असेल, हें काय सांगावयास पाहिजे ?

पुढें कलकत्त्याच्या हायकोर्टांत वकिली करीत असतां ते सुमारें दोन वर्षें कलकत्ता युनिव्हर्सिटीच्या लॉ कॉलेजांत प्रोफेसर म्हणून काम करीत होते. कलकत्ता येथें त्या वेळीं जें लॉ कॉलेज होतें त्यांत उत्तमोत्तम प्रोफेसर नसल्यामुळें तें आदर्शभूत करण्याची युनिव्हर्सिटीचे व्हाईस चॅन्सेलर सर आशुतोष मुकर्जी यांची मनीषा होती. त्यामुळें त्यांनीं उत्तमोत्तम वकिलांना व विद्वानांना या कॉलेजांत काम करण्याची विनंति केली. या विनंतीला मान देऊन बाबू राजेंद्रप्रसाद, मार्च १९१४ ते मार्च १९१६ अशीं दोन वर्षें कॉलेजांत अध्यापक म्हणून काम करीत होते. राजेंद्रबाबूंच्या आयुष्यांत यानंतर कोणत्याहि सरकारी कॉलेजांत प्रोफेसर म्हणून काम करण्याचा प्रसंग आला नाहीं. त्यांनीं पुढें १९२१ सालीं जें राष्ट्रीय विद्यापीठ स्थापन केलें, त्या वेळीं त्यांना प्रोफेसर, प्रिन्सिपॉल व व्हाईस चॅन्सेलर इत्यादि हुद्दयांचीं कामें करावीं लागलीं व तीं त्यांनीं मोठ्या योग्यतेनें पार पाडलीं हें सर्वांस ठाऊकच आहे.

## वकिलाचा कारकून

आपल्या स्वतःच्या व वडील बंधूंच्या इच्छेस्तव त्यांनीं १९०९ च्या मार्च महिन्यांत मुझफ्फरपूरला रामराम ठोकला व ते कलकत्त्याला दाखल झाले. या वेळीं त्यांची वकिलीची पहिली परीक्षा झाली होती व शेवटच्या परीक्षेचा त्यांचा अभ्यास चालू होता. कलकत्त्यास आल्यावर वकिलीची परीक्षा देऊन ते ताबडतोब एल्एल्. बी. झाले असते व त्यांनीं आपल्या कर्तृत्वावर वकिलीची सुरुवात केली असती तरीहि त्यांनीं नांव कमाविलेंच असतें, यांत शंका नाहीं. त्यांचा स्वभाव धिम्मा असल्या-मुळें त्यांना जात्याच अहमहमिकेनें धांवपळ करण्याची संवय नाहीं. आणि नव्या वकिलाला तर असल्या धांवपळीची व पुढें पुढें करण्याची जरूरी; पण राजेंद्रबाबूंजवळ कायद्याचें उत्कृष्ट ज्ञान व वक्तृत्व या दोन अमोघ शक्ति असल्यामुळें राजेंद्रबाबूंच्या यशाबद्दल मुळींच शंका नव्हती. पण बाबूजींना स्वतंत्रपणें वकिलीचा व्यवसाय करूं देण्याचें हायकोर्टा-च्याच मनांत नव्हतें, तेथें त्यांच्या कर्तृत्वाला कोठून अवसर मिळणार? त्या वेळीं कलकत्ता हायकोर्टाचा असा एक नियम होता कीं, हाय-कोर्टांत वकिली करूं इच्छिणाऱ्या प्रत्येक वकिलानें एखाद्या प्रसिद्ध वकिलाच्या हाताखालीं सुमारें एक वर्षभर उमेदवारी केली पाहिजे आणि कामाची ओळख झाल्याबद्दलची एक परीक्षाहि दिली पाहिजे. या नियमाप्रमाणें राजेंद्रबाबू कलकत्त्याचे श्री. सुऱ्हावर्दी यांचे कारकून म्हणून काम करूं लागले. त्या वेळीं सुऱ्हावर्दी हे कलकत्ता हायकोर्टांत एक नाणावलेले वकील म्हणून प्रसिद्ध होते. पुढें ते हायकोर्ट जज्ज व कलकत्ता विद्यापीठाचे व्हाईस चॅन्सेलरहि झाले व त्यांच्याकडे कांहीं दिवस व दुसऱ्या एका वकिलाकडे कांहीं दिवस याप्रमाणें सुमारें ५ वर्षेपर्यंत बाबूजींनीं कारकुनाचें काम करून सर्व माहिती मिळविली व एक वर्षानें त्यांनीं वकिलीची शेवटची परीक्षा देऊन पदवी संपादन

केली. हायकोर्टाची जरूर ती मुदत भरल्यावर राजेंद्रबाबूंनीं कलकत्ता येथें स्वतंत्र वकिली थाटली व कोणाचीहि मदत अगर कोणाचाहि आधार न घेतां वकिलीला प्रारंभ केला.

## भारतसेवक समाज

याच सुमारास त्यांना नामदार गोखले यांजकडून सर्व्हंट्स् ऑफ इंडिया सोसायटीला येऊन मिळण्याबाबत आमंत्रण आलें. ना. गोखल्यांनीं हिंदुस्थानांतील प्रत्येक प्रांतांत जाऊन तेथून होतकरू व हुशार तरुण संस्थेसाठीं मिळविण्याचा उद्योग चालविला होता. संसारत्याग करून हिंदी राष्ट्राच्या सेवेला आपलें सर्वस्व वाहूं इच्छिणाऱ्यांची गोखल्यांना जरूरी होती. आणि त्या अपेक्षेनें सर्व देशांतील तरुणांकडे ते पाहात होते. ते कलकत्त्याला आले असतां त्यांनीं तेथल्या एका बॅरिस्टराकडे बिहारी तरुणांची मागणी केली. त्या बॅरिस्टरला बाबू राजेंद्रप्रसाद यांचें नांव विशेष परिचित होतें, इतकेंच नव्हे तर बिहारमध्यें राजेंद्रबाबूं-शिवाय दुसरा कोणी लायक व होतकरू तरुण सांपडेल कीं नाहीं याचीहि त्याला शंका वाटत होती. हा बॅरिस्टर मूळचा बिहारी असल्या-मुळें त्याचा सल्ला केव्हांहि उपयुक्त ठरणार याबद्दल ना. गोखल्यांनाहि शंका नव्हती. त्यामुळें त्या बॅरिस्टरानें राजेंद्रबाबूंचें नांव गोखल्यांना सांगितल्याबरोबर गोखले खूष झाले व दुसरे दिवशीं राजेंद्रप्रसादांना बोलावणें पाठविलें.

## ना. गोखले यांची मुलाखत

या बॅरिस्टर मित्राच्या मध्यस्थीमुळें व त्याच्या शिफारशीमुळेंच नामदार गोखले यांना भेटण्याची त्यांना संधि मिळाली. ते आणि त्यांचा एक मित्र श्रीकृष्ण प्रसाद असे दोघेजण गोखल्यांना भेटण्यासाठीं त्यांच्या बिऱ्हाडीं गेले. त्या वेळीं नुकतीच त्यांनीं 'सर्व्हंट्स् ऑफ इंडिया सोसायटी'ची स्थापना केली होती. त्यांची अशी इच्छा होती कीं या

संस्थेंत बिहारचे सुशिक्षित तरुण दाखल व्हावेत. आणि त्याच दृष्टीनें त्यांनीं राजेंद्रबाबूंना भेटण्यास बोलावलें होतें. राजेंद्रबाबू या भेटीची हकीकत पुढीलप्रमाणें सांगतात:—

" माननीय गोखले यांना माहीत होतें कीं आम्ही दोघेजण युनिव्हर्सिटीच्या परीक्षा उत्कृष्टपणें पास झालों असून वकिलीचा अभ्यास करीत आहों. आम्हांला उद्देशून ते म्हणाले, 'तुमची वकिली उत्तम चालेल. तुम्ही खूप पैसे मिळवाल व मोठ्या ऐषारामांत राहाल, हें अगदीं शक्य आहे. मोठा बंगला, घोडागाडी, नोकरचाकर इत्यादि बादशाही थाटहि तुमच्या वांटणीस येईल. पण तरुणांवर देशाची कांहीं जबाबदारी आहे कीं नाहीं? विशेषतः तुमच्यासारख्या सुशिक्षित तरुणांवर तर ती अधिकच आहे'. नंतर स्वतःबद्दल बोलतांना ते उद्‌गारले, 'माझ्यापुढेंहि हा प्रश्न आला होता. माझी स्थिति गरिबीची होती. माझ्या घरच्या मंडळींना अशी फार मोठी आशा होती कीं माझें शिक्षण पुरें झाल्यावर मी खूप पैसे मिळवीन व सर्वांना सुखांत ठेवीन. पण मी जेव्हां त्यांच्या आशेवर पाणी टाकून देशसेवेचें व्रत घेतलें तेव्हां माझ्या वडील बंधूंना इतकें वाईट वाटलें कीं, कित्येक दिवस ते माझ्याशीं बोलतहि नसत. पण कांहीं दिवस गेल्यानंतर त्यांना जेव्हां सर्व परिस्थिति कळून आली तेव्हां त्यांचा रोष गेला व सर्वजण माझ्यावर पूर्ववत् प्रेम करूं लागले. तुम्हांलाहि असा अनुभव येणें शक्य नाहीं असें नाहीं, पण मनाशीं एवढा दृढनिश्चय बाळगा कीं शेवटीं सर्व लोक तुमची पूजा करूं लागतील. लोकांच्या सर्व आशा तुमच्यावर केंद्रित झाल्या आहेत.' अशा प्रकारें दीड दोन तास गोखले आमच्याशीं बोलत होते. त्यांची बोलण्याची पद्धत अशी होती कीं त्यांच्या शब्दांनीं आमच्या अंतःकरणाचा ठाव घ्यावा. त्यांचें म्हणणें ऐकून घेतल्यावर मी त्यांना म्हणालों, 'आपल्या प्रश्नाचें आतांच्या आतां उत्तर देतां येणार नाहीं. कारण प्रश्न गहन आहे. आपल्या म्हणण्याचा विचार करून एक

दिवस आपणांस भेटूं व आमचें म्हणणें आपणापुढें मांडूं आणि मग आपण आपलें मत द्या. ' आम्ही दोघे तेथून उठलों, पण जणूं कांहीं त्यांचे शब्द आमच्या हृदयांत भेदून गेले आहेत असें आम्हांला वाटलें. दोन दिवस मला दुसरी कोणतीहि गोष्ट सुचली नाहीं व कित्येक दिवस तर झोंपही आली नाहीं. '

गोखले–प्रसाद मुलाखत होऊन एक आठवडा झाला, तरी राजेंद्रबाबूंनीं गोखल्यांना कळविलें नाहीं. ते एकसारखा त्या गोष्टीचा विचार करीत होते. रात्रीं दिवसां, केव्हांहि, जेव्हां वेळ मिळे, तेव्हां त्यांचा एकच विचार चाले. सोसायटीला मिळणें जरूर आहे असें त्यांचें मत झालें होतें व सोसायटींत दाखल होऊन देशसेवा करण्याची त्यांची इच्छाहि होती. पण वकिलीवर पाणी सोडून जर आपण देशकार्यांत पडलों, तर वडील बंधूंना व घरच्या मंडळींना काय वाटेल, हा हा प्रश्न एकसारखा त्यांच्या डोळ्यापुढें उभा राही राजेंद्रबाबू केव्हां एकदां चांगले पैसे मिळवायला लागताहेत इकडे घरच्या मंडळींचें डोळे लागून राहिले होते. त्यांना नाखूष करावें तर त्यांचें मन दुखाविलें जातें, हा राजेंद्रबाबूंना एक घोर अपराध वाटे. बरें, त्यांच्या इच्छेप्रमाणें वागावयाला जावें, तर आपल्या इच्छांना स्वतःच्याच हातानें तिलांजलि देण्याचा प्रसंग येतो. अशा दुहेरी पेंचांत ते सांपडले. ना. गोखल्यांची व त्यांची गांठ न पडती किंवा गोखले त्यांना आपल्या सोसायटींत न बोलावते, तरीदेखील लोकसेवा हें त्यांचें ध्येय ठरलें असतेंच, कारण पहिल्यापासूनच त्यांचा लोकसेवेकडे विशेष ओढा होता. पैसे मिळवून आपण खूप श्रीमंत होऊं अशा आशांचे मनोरे त्यांनीं आपल्या स्वप्नांतदेखील कधीं उभाविले नव्हते. त्यामुळें ना. गोखल्यांच्या प्रश्नाला होकारार्थी उत्तर देण्याला त्यांना फारशा विचाराची आवश्यकता होती असें मुळीच नाहीं. त्यांची मनोभूमिका लोकसेवेसाठीं केव्हांपासून सन्नद्ध होऊन राहिली होती.

## वडील बंधूंना पत्र

याच सुमारास त्यांचे वडील बंधु बाबू महेंद्रप्रसाद कांहीं कामानिमित्त कलकत्त्याला आले होते. त्यांना राजेंद्रबाबूंनीं गोखल्यांच्या आमंत्रणाची हकीकत सांगितली व त्याबाबत त्यांचा सल्ला विचारला. बाबूजींचा हा प्रश्न ताबडतोब तेथल्या तेथें सुटण्यासारखा नव्हता. त्याला थोडाबहुत विचार करणें जरूर असल्यामुळें महेंद्रबाबूंनीं त्यांना त्या वेळीं कांहींच उत्तर दिलें नाहीं. हा प्रश्न ऐकून महेंद्रप्रसादांची एकंदर चर्या अशी गंभीर झाली कीं त्यांना बाबूजींचा हा विचार मुळींच मान्य नसल्याचें स्पष्ट दिसून आलें. तेव्हां राजेंद्रबाबूंनाहि स्पष्ट बोलण्याचा धीर होईना. वडील बंधूंना जर आपला विचार पसंत नाहीं, तर आपण या फंदांत कां पडावें, असा विचार त्यांच्या मनांत डोकावूं लागला. आपलें म्हणणें महेंद्रबाबूंपुढें एकदां स्पष्टपणें मांडावें असा त्यांनीं अनेकवार बेत केला, पण कांहीं जुळेनाच. अखेर मनाचा धडा करून त्यांनीं महेंद्रबाबूंना खालील आशयाचें सविस्तर पत्र लिहिलें :

१–३–१९१० मंगळवार

प्रिय बंधूंस

सप्रेम अभिवादन वि.

माझें हें पत्र पाहून तुम्ही चकित व्हाल यांत शंका नाहीं, कारण रात्रंदिवस जो तुमच्या सहवासांत आहे, त्याच्याकडून पत्र येईल अशी तुम्हांला खचित अपेक्षा नसेल. पण अशा कांहीं गोष्टी असतात कीं ज्या बोलून दाखवितां येत नाहींत. तुमच्याशीं मोकळेपणानें बोलावें असा मीं अनेकदां विचार केला होता, पण मी भावनाप्रधान असल्या-मुळें मला तुमच्यासमक्ष स्पष्ट बोलतां येईना. अखेर मीं हा पत्राचा मार्ग पत्करला. आरंभीं हें सांगणें जरूर आहे कीं या पत्रांत मीं जें काय लिहिलें आहे त्याबद्दल मीं आपल्या मनाशीं पूर्ण विचार केलेला आहे.

तुम्हांला कदाचित् आठवत असेल कीं सुमारें तीन आठवड्यांपूर्वीं मी ना. गोखले यांना भेटावयास गेलों होतों. मीं सर्व्हंट्स् ऑफ इंडिया सोसायटींत दाखल व्हावें अशी इच्छा त्यांनीं त्या वेळीं व्यक्त केली होती. त्या दिवसापासून ह्या सूचनेचा मी आपल्या मनाशीं विचार करूं लागलों. माझ्या मनांत अनेक विचारचक्रें फिरूं लागलीं. अखेर गेले वीस दिवस या विषयाचा अहोरात्र विचार करून मीं असें ठरविलें कीं आपलें पुढील आयुष्य देशाच्या कारणीं वेंचावें. माझा हा विचार ऐकून तुमच्या हृदयाला धक्का बसेल हें मला माहीत आहे. कुटुंबाच्या सर्व आशा ज्याच्यावर केंद्रित झाल्या आहेत, त्याचा हा विचार कदाचित् तुम्हांला अविचारहि वाटण्याचा संभव आहे. मी जर कुटुंबाची जबाबदारी घेतली नाहीं तर घरच्या मंडळींना कोणी त्राता उरणार नाहीं हेंहि मी जाणून आहे. पण तुम्हांला मनापासून सांगावयाचें म्हणजे मला कुटुंबापेक्षां देशाची हांक अधिक महत्त्वाची व अधिक निकडीची वाटते. तुम्हांला अशा अडचणीच्या वेळीं सोडून जाणें म्हणजे कृतघ्नपणा आहे, याचीहि मला जाणीव आहे. पण या गोष्टींमुळें कलहाचा प्रसंग उद्भवणार नाहीं, ही माझी दृढ भावना आहे. कारण आपलें एकमेकांवरील बंधुप्रेम इतकें अढळ आहे कीं तें असल्या गोष्टींची पर्वाहि करणार नाहीं. तुम्ही सबंध कुटुंबाचा योगक्षेम चालवितां म्हणून तुमच्यावर माझें प्रेम आहे असें मुळींच नाहीं. तसेंच कुटुंबाची सर्व जबाबदारी मीं घ्यावी या अपेक्षेनें तुम्हीहि माझ्यावर प्रेम करीत नाहीं, अशीहि माझी खात्री आहे. आपलें परस्परावरील प्रेम यापेक्षांहि पक्क्या आणि अढळ पायावर उभें आहे. एकमेकांच्या लहरीपणामुळें जरी एकमेकांना कांहीं त्रास सोसावा लागला तरी त्याला यत्किंचितहि धक्का बसणार नाहीं. उलट माझी तर अशी भावना आहे कीं आपलें प्रेम उत्तरोत्तर वाढतच आहे, म्हणून ३० कोटी जनतेसाठीं तुम्ही स्वार्थत्यागाला तयार व्हावें असें मी म्हणतों. ना. गोखल्यांच्या भारतसेवक

ग्रंथालय, ... ८८ ... ९०७ ... क्र. ३११

समाजाला जाऊन मिळण्यांत मला स्वतःला मुळींच स्वार्थत्याग करावा लागणार नाहीं. सुदैवानें किंवा दुर्दैवानें मला असें शिक्षण मिळालें आहे कीं, मी कोणत्याहि परिस्थितींत असलों तरी तिच्याशीं समरस होणें मला सहज शक्य आहे. तुम्हांला माहीतच आहे, कीं मी किती साधा आहे तो. माझी राहणीहि इतकी साधेपणाची आहे, कीं मला स्वतःला विशेष असें कांहीं लागतच नाहीं. सोसायटीकडून माझ्या निर्वाहाला जेवढें मिळेल तेवढें मला पुरेसें होईल. त्यायोगें मी मोठासा स्वार्थत्याग करीत आहे, अशी मी खोटी समजूत करून घेत नाहीं. माझ्याकडे मोठ्या आशेनें डोळे लावून बसलेल्या तुम्हां सर्वांची खूप निराशा होईल व तुमचे सर्व मनोरथ धुळीला मिळतील हें मी जाणून आहे. पण एक गोष्ट तुमच्या ध्यानांत असेलच कीं आपल्याजवळ थोडीशी वडिलोपार्जित मिळकत आहे. मी जर पैशाच्या पाठीमागें लागलों, तर मला वाटतें, मी चांगलाच पैसा कमावीन व त्यायोगें आपल्या कुटुंबाला चांगले दिवस येऊन समाजांतहि आपला दर्जा वाढेल. पण समाजाला माणसाच्या श्रीमंतीचें महत्त्व वाटत असतें; त्याला हृदयाच्या उदात्त-पणाची किंमत वाटत नाहीं. ह्या अशाश्वत जगांत प्रत्येक गोष्ट नश्वर आहे. संपत्ति, पदवी किंवा दर्जा कोणतीहि गोष्ट घ्या, ती नाहींशी होणारच. तुम्हांला जसजसा पैसा मिळत जातो, तसतशी तुमची द्रव्य-तृष्णा वाढतच असते. आणि जरी पुष्कळांना वाटत असतें कीं एक द्रव्य असलें म्हणजे सर्व आहे तरी ज्यांच्याजवळ सोन्याच्या राशी पड-लेल्या आहेत, त्यांना किती समाधान मिळत असतें तें त्यांचें त्यांनाच ठाऊक आहे. कारण सुख हें बाहेरच्या साधनांवर अवलंबून नाहीं. तो मनाचा उदात्त धर्म आहे. झोपडींत राहणारा दरिद्रीनारायण राज-वाड्यांत विलासवैभवांत लोळत पडलेल्या लक्ष्मीनारायणापेक्षां अधिक सुखी व समाधानी असतो. म्हणून आपण दारिद्र्याची अवहेलना करतां कामा नये. जगांतल्या थोर पुरुषांचीं चरित्रें पाहिलीं तर ते अत्यंत

निर्धन व दरिद्री असलेलेच आपणांस आढळून येतील. त्यांचा किती छळ झाला, त्यांची किती अवहेलना व विटंबना झाली या गोष्टीहि ध्यानांत घेतल्या पाहिजेत. त्या थोर सज्जनांचा ज्या दुर्जनांनीं छळ केला ते पार धुळीस मिळाले; पण त्या थोर पुरुषांचीं नांवें चिरंजीव झालीं आहेत. म्हणून नामधारी समाजाच्या निंदेला भीक घालूं नका. कारण ज्या समाजाचें हृदय उदार व उदात्त नाहीं त्याची पर्वा करण्याचें कारण नाहीं.

भाई, एक गोष्ट मात्र ध्यानांत असूं द्या, कीं माझी जर सर्वांत मोठी कोणती महत्त्वाकांक्षा असेल तर देशाची सेवा करणें एवढीच आहे. कदाचित् ह्या माझ्या शिक्षणाचा दोष असेल. पण तुमच्या ध्यानांत असेलच कीं असले उदात्त विचार व उच्च भावना माझ्या मनांत रुजविण्याचें श्रेय तुम्हांलाच आहे. माझें जेव्हां इंग्लंडला जाण्याचें ठरत होतें, त्या वेळीं तुमचें काय मत होतें किंवां तुम्हांला काय वाटत होतें हें मला ठाऊक नाहीं, पण मी हें सांगतों कीं मला आय्. सी. एस्. चा कधींच मोह वाटला नाहीं. कारण त्या मोहांत सांपडलों कीं गुलाम बनलों अशी माझी भावना झाली होती. त्या वेळीं मीं आपले विचार खुल्या दिलानें तुमच्यापुढें मांडले होते. व तुम्हीहि तितक्याच मोकळेपणानें माझ्याशीं विचारविनिमय केला होता. आज पुन्हा तसा प्रसंग आला आहे. पूर्वींइतक्याच निधडेपणानें माझ्या या योजनेला संमति द्या व आपलें बंधुप्रेम व्यक्त करा. पण यदाकदाचित् संमति देण्याची तुमची इच्छा नाहीं असें जर मला कळलें तर मला अत्यंत वाईट वाटेल, पण आश्चर्य वाटणार नाहीं. कुटुंबाचा आधारस्तंभ या नात्यानें तुम्ही माझ्याकडे पाहतां अशी माझी समजूत आहे. आणि तेवढ्याच भावनेनें जर तुम्ही माझ्यावर प्रेम करीत असाल तर—आणि तुमच्या बाबतींत अशी कल्पना करण्यानेंच माझें हृदय दुभंग होईल--काय म्हणावें हेंच मला कळत नाहीं. मी तुमच्याजवळ याचना करतों कीं कृपा करून

माझी निराशा करूं नका अगर मला भलतेंच करण्यास सांगूं नका. जो मनुष्य आपल्या सत्त्वाला जागत नाहीं, तो दुसऱ्यांना कधींहि उपयोगी पडणार नाहीं. तुम्ही आतांच जर माझा मार्ग आडवलात, तर माझें पुढचें आयुष्य कवडीमोल होईल आणि ज्या वकिलीच्या धंद्यांत मी पडावें असें तुम्हांला वाटतें त्या धंद्यांतहि माझें लक्ष लागेल कीं नाहीं तें सांगवत नाहीं. माझें आयुष्य मातीमोल व्हावें किंवा माझ्या आशांचा चक्काचूर व्हावा असें तुम्हांला कालयत्रीं स्वप्नांत सुद्धां वाटणार नाहीं. मी आपल्या महत्त्वाकांक्षेपुरतेंच बोलत आहे. देशसेवेपलीकडे माझी दुसरी कोणतीच महत्त्वाकांक्षा नाहीं. माझ्या आयुष्यांत जर कोणतें सर्वोच्च व एकमेव ध्येय असेल तर देशसेवा एवढेंच आहे. समजा मला दुसरी एखादी महत्त्वाकांक्षा आहे असें गृहीत धरलें, तरी हायकोर्टांत ती सफल कशी होणार? मी म्हणतों कीं मी कदाचित् महिन्याकांठी शेंदोनशें रुपये मिळवीन, एखादे वेळीं चार दोन हजारहि मिळवीन, पण काय त्याचा उपयोग? ज्यांच्याजवळ लाखों रुपये आहेत असे कितीतरी धनंतर लोक पडले आहेतच कीं! त्यांच्याबद्दल कुणाला काय वाटतें? कित्येकदां तर असल्या मूर्ख श्रीमंतांबद्दल कींवच येते. पण जरा ह्या दुसऱ्या बाजूकडे पाहा. ना. गोखल्यांइतका मानसन्मान व दर्जा आज कोणत्या श्रीमंताला किंवा संस्थानिकाला मिळत आहे? आणि तसें म्हटलें तर गोखले अगदीं कंगाल आहेत. गोखल्यांपेक्षां का आपण अधिक कंगाल आहों? जर लाखों लोक महिना दोन किंवा तीन रुपयांवर गुजराण करतात, तर आपल्याला काय दोन-तीनशें रुपयांत चरितार्थ चालवितां येणार नाहीं? आपल्या महत्त्वाकांक्षेचे क्षेत्र मोठें आहे. तुम्ही जर हा स्वार्थत्याग करावयाला तयार व्हाल तर तुम्हांलाच तें भूषणावह होईल.

आतां माझ्या चरितार्थाच्या दृष्टीनें विचार करूं लागलों, तर मला तुमच्याकडून कांहींहि मागण्याची पाळी येणार नाहीं. कारण माझ्या

जरूरीपुरतें मला सोसायटीकडून मिळेल. तसेंच माझ्या कुटुंबाच्या योग-क्षेमाचीहि व्यवस्था सोसायटी करील. मी आपली मंडळी तुमच्याकडेच पाठवीन व त्यांना लागेल तो खर्चहि धाडून देईन. ह्या खर्चामुळें तुम्हांला मोठासा हातभार लागेल असें नाहीं, उलट तीनशांऐवजीं तुम्हांला तिसांतच समाधान मानावें लागेल. मुलांच्या शिक्षणाची तरतूद सोसायटी करीलच, तेव्हां मुलांच्या शिक्षणाची जबाबदारी मी तुमच्यावर टाकीत नाहीं. मी स्वतःच त्यांचें शिक्षण करीन. भाई, या गोष्टीचा विचार करून मला काय तें कळवा. या गोष्टीचा विचार करण्यांत मीं गेले २० दिवस घालविले आहेत. आणि विचार करून अखेर असें ठरविलें आहे कीं, मानसन्मान, दर्जा किंवा पदवी या गोष्टी म्हणजे शुद्ध फसवणूक आहे. मनुष्याचा मोठेपणा त्याच्या तिजोरीच्या मोठेपणांत नसून त्याच्या मनाच्या मोठेपणांत आहे. आणि माझी खात्री आहे कीं, तुमच्या अंगीं हा मोठेपणा आहे. या प्रश्नाचा दुसऱ्या दृष्टीनें विचार करून पाहा. समजा, कांहीं अपघात होऊन किंवा प्लेग—कॉलऱ्यासारख्या सांथीला बळी पडून मी जर तुम्हांला मुकलों, तर तुम्ही काय कराल? माझ्या पाठीमागें तुमच्यावरच सर्व प्रपंचाचा भार पडणार नाहीं काय? मग तुम्हांला जें काय मिळेल, त्यावरच समाधान मानावें लागणार नाहीं काय? नशिबाचा निर्णय तुम्हांला मान्य करावाच लागणार. तेव्हां मीं असें म्हणतों कीं, ईश्वरी संदेशाला मान देणें आपलें कर्तव्य नाहीं काय? आपला कायमचा वियोग व्हावा असें जर ईश्वरी सूत्र असेल, तर त्याच्या पुढें तुम्हांला नमलेंच पाहिजे म्हणून पुन्हा पुन्हा सांगतों कीं, तुमच्यांत जो ईश्वरांश आहे, त्याला साक्षी ठेवून दारिद्र्याचा अंगीकार करावयास तयार व्हा व समाजांतील उच्च दर्जाबद्दलच्या मोहापासून परावृत्त व्हा. जगांत अद्यापिहि उदारचरित महात्मे आहेत, हें आपल्या कृतीनें जगाला दाखवून द्या. ज्यांना द्रव्य हें कस्पटासमान आहे व लोकसेवेपुढें ज्यांना कशाचीच किंमत नाहीं, असे त्यागवीर अद्यापि या भूतलावर

हयात आहेत हें जगाला दाखवा. असें करण्यानें जगांत तुमचा लौकिक वाढावयासच मदतच होईल.

मी यासंबंधीं सौभाग्यवतीलाहि लिहीत आहें. आईला कळविणें माझ्या शक्तीबाहेरचें असल्यामुळें तीं तिला कांहींच लिहीत नाहीं. तिच्या वृद्धावस्थेंत तिला कदाचित् धक्काच बसावयाचा. कळावें.

आपला प्रिय बंधु,
राजेंद्रप्रसाद.

राजेंद्रबाबूंनीं या पत्रांत आपलें अंतःकरणच जणूं ओतलें आहे. आपल्या हृदयांतील आशा—आकांक्षा मूर्त स्वरूपांत त्यांनीं आपल्या बंधूपुढें मांडल्या आहेत आणि आपलें भविष्यकालीन ध्येयहि स्पष्ट केलें आहे. राजेंद्रबाबूंचें हृदय समजावून घेण्याच्या दृष्टीनें हें पत्र म्हणजे एक अमोल ठेवाच म्हटला पाहिजे. त्यांच्या हृदयांत पहिल्यापासूनच देश-भक्तीची आंच असल्याचें या पत्रावरून कोणालाहि दिसून येईल. त्यांना देशसेवेपुढें व लोकसेवेपुढें स्वार्थाची किंमत वाटत नाहीं. राजेंद्रबाबूंचें हें असें थोर विचारांचें पत्र पाहून त्यांचें ज्येष्ठ बंधु महेंद्रबाबूहि चकित झाले. दुसरे दिवशीं दोघां बंधूंचें गांवाबाहेर निवांतपणें बोलणें होऊन राजेंद्रबाबूंनीं ना. गोखल्यांना नकार द्यावा असें ठरविण्यांत आलें. घरच्या परिस्थितीबद्दल महेंद्रबाबूंनीं राजेंद्रबाबूंना कांहीं प्रश्न विचारले बाबूजींना त्यांचीं उत्तरें देणें कठीण पडलें. दोघां भावाभावांनीं पुष्कळ विचार-विनिमय करून एकमेकांपुढें आपलें हृदय खुलें केलें, अखेर राजेंद्रबाबूंना वडील बंधूंचें म्हणणें पटलें व त्यांनीं परमेश्वराचीच इच्छा नाहीं, असा मनाशीं विचार करून ना. गोखल्यांना नकार देण्याला रुकार दिला. पहिलें पत्र लिहून आपण वडील बंधूंना उगीच दुखविलें, असें वाटल्यावरून राजेंद्रबाबूंनीं त्यांना पुढीलप्रमाणें क्षमायाचनेचें दुसरें पत्र पाठविलें :

प्रिय बंधूस सप्रेम अभिवादन बुधवार २-३-१९१०

आतां काय लिहावें हेंच मला समजत नाहीं. मला एका गोष्टीचा मोठा अभिमान वाटतो कीं, मी दुसऱ्यास यत्किंचितहि दुखवीत नाहीं. आणि जर चुकून माझ्या हातून कोणी दुखविलें गेलें तर मला अत्यंत पश्चात्ताप होतो. तुम्हांला किंवा आईला यत्किंचितहि दुःख देणें मला मरणप्राय वाटेल. गेल्या पत्रांत मीं जें लिहिलें होतें तो माझा शेवटचा निर्णय नव्हता किंवा त्यांत निर्णयात्मक असें कांहीं नव्हतें. केवळ मीं आपले विचार आडपडदा न ठेवता, तुमच्यापुढें मनमोकळेपणानें मांडले होते. मीं आजपर्यंत तुमची कधीं अवज्ञा केली नाहीं आणि ईश्वर करील तर यापुढेंहि करणार नाहीं. तुमच्या प्रेमामुळें मला वडिलांची कधींहि आठवण झाली नाहीं. तुम्ही आपल्या वर्तणुकीनें मला वडील व ज्येष्ठ बंधु या दोघांचाहि आधार दिलांत. तुम्हांला जर यत्किंचितहि दुःख देईन तर माझ्यासारखा अधम मीच. तुम्ही या विषयावर मोकळेपणानें बोलावें अशी माझी इच्छा होती, ती तुम्ही तृप्त केल्यामुळें मला अत्यंत समाधान वाटलें. माझ्या समाधानाला सीमा राहिली नाहीं असेंहि म्हटल्यास चालेल. मी तुमची कोणत्याहि प्रकारें अवज्ञा करीन, तर मीं कृतघ्न ठरल्यावांचून राहणार नाहीं. तुमच्या आज्ञांचें पालन करण्यांत मला जें सुख वाटतें तें केवळ मलाच माहीत. तेव्हां तुमच्या आज्ञेवांचून तुमचा हा कनिष्ठ बंधु कोणतीहि गोष्ट करणार नाहीं याबद्दल निर्धास्त राहा. तुमच्या इच्छेविरुद्ध कांहींहि केलें जाणार नाहीं हें ध्यानांत ठेवा. तुमच्या निर्णयामुळें माझें भावी आयुष्य दुःखपूर्ण होईल अशी मुळींच कल्पना करून घेऊं नका. माझ्यांत तरुणपणांतला उच्छृंखलपणा आहे हें काय सांगावयास हवें? तुम्ही आजपर्यंत ज्या भावावर प्राणापलीकडे प्रेम केलें, त्याला तुम्ही क्षमा नाहीं का करणार? तुम्ही जर क्षमा केली नाहीं, तर दुसरा कोण करील? केवळ उच्छृंखलपणामुळें तुमच्या मनाला मीं ज्या निरर्थक वेदना दिल्या त्याबद्दल तुम्ही मला माफी करणार नाहीं काय?

माझ्यामुळें तुम्हांला किती दुःख झालें असेल, याची मला यथार्थ कल्पना आहे, व त्याबद्दल माझ्या अंतरात्म्याला किती खेद होत आहे तो पत्रीं लिहितां येत नाहीं. माझें हृदय जर उकलून दाखवितां आलें तरच त्याची कल्पना येईल. त्यासाठीं मीं अहोरात्र किती अश्रु ढाळले आहेत ते मीच जाणें. वडिलांना भयंकर यातना देऊन त्यांच्या मृत्यूला मीच कारण झालों, असें असतांना वडिलांच्या जागीं असलेल्या ज्येष्ठ बंधूंना मीं दुखवावें, याबद्दल मला शरमच वाटली पाहिजे. तुमची क्षमा कशी मागावी हेंच समजत नाहीं माझी पक्की खात्री आहे कीं भ्रातृप्रेमामुळें तुम्ही सर्व विसरून जाल. पण मला या गोष्टी विसरतां येणार नाहींत.

माझ्या मनांत आतां कांहीं राहिलें नाहीं असें म्हणणें म्हणजे धडधडीत खोटें बोलणेंच होय. ही गोष्ट माझ्या मनांतून केव्हां जाईल तें सांगतां येणार नाहीं. तथापि येवढें सांगतों कीं जेथें असेन तेथें सुखी व समाधानी राहण्याचा मी प्रयत्न करीन. तुम्हांला किंवा कुटुंबांतल्या कोणाच्याहि मनाला दुःख न देणें हेंच माझें समाधान आहे. मला माझ्या रीतीनें जें काय करतां येईल तें मी करण्याचा प्रयत्न करीन. तुम्हांला सुखी व समाधानी पाहणें यांतच माझें सुख सांठविलेलें आहे.

आपला प्रिय बंधु,
राजेंद्रप्रसाद

## गांधीजी व बाबूजी

सर्व्हंट्स् ऑफ इंडिया सोसायटीला मिळण्याबाबत महात्मा गांधीजींच्या आयुष्यांत राजेंद्रबाबूंप्रमाणेंच एक प्रसंग येऊन गेला. या दोन प्रसंगांत अतिशय साम्य असल्यामुळें गांधीजींच्या आत्मचारित्रांतील तत्संबंधींचा मजकूर येथें मुद्दाम देत आहे. गांधीजींच्या व राजेंद्रबाबूंच्या चरित्रांत सत्य, सेवा व संघटना या दृष्टीनें जसें अतिशय साम्य आहे तसें

इतरत्रहि आहे. गांधीजीप्रमाणें राजेंद्रबाबूंना ना. गोखल्यांनीं पाचारण केलें आणि दोघेहि जरी प्रत्यक्ष सोसायटीला जाऊन मिळाले नाहींत, तरी सोसायटींत असतांना त्यांनीं जें काय थोडेंबहुत केलें असतें त्याच्या किती तरी पट सोसायटीच्या बाहेर राहून त्यांनीं केलें आहे. सोसायटींत दाखल न होण्यानें कोणाचेंहि कांहीं नुकसान झालें नाहीं. म. गांधीजींच्या आत्मचारित्रांतील उतारा पुढीलप्रमाणें आहे :

" गोखल्यांची फारच इच्छा होती कीं, मीं सोसायटींत दाखल व्हावें. माझी तर इच्छा होतीच. पण सभासदांचें मत पडलें कीं सोसायटीचे आदर्श व त्यांची काम करण्याची रीत माझ्या रीतीहून भिन्न होती. त्यामुळें मी सभासद होणें योग्य होईल कीं काय याबद्दल त्यांना शंका वाटत होती. गोखल्यांची समजूत होती कीं माझ्यामध्यें आपल्या ध्येयांना चिकटून राहण्याचा जसा गुण होता, तितकाच इतरांचें आदर्श संभाळून घेण्याचा व त्यांच्याशीं मिळून मिसळून काम करण्याचाहि गुण होता. ' तुम्ही सोसायटीचे सभासद व्हा किंवा नका होऊं, पण मी तर तुम्हांला सभासदच मानून चालणार. ' गोखले म्हणाले.

" मी स्वतःची कल्पना त्यांना कळविली होती. मी सोसायटीचा सभासद झालों किंवा न झालों तरी माझ्या मनांतून एक आश्रम काढावयाचा होता. गोखल्यांना माझा विचार पसंत पडला व ते म्हणाले :

' तुम्ही अवश्य तसें करा. सभासदांबरोबरच्या चर्चेचा निकाल कसाहि लागो; पण तुम्हांला आश्रमासाठीं लागणारें द्रव्य तुम्ही माझ्यापासूनच घ्यावयाचें आहे. मी तो माझाच आश्रम समजणार. '

" माझें हृदय फुलून गेलें, पैसे वसूल करण्याच्या कामांतून बरी मोकळीक झाली असें म्हणून मी फार आनंद मानला; आणि यापुढें मला स्वतःच्या जबाबदारीवर चालावें लागणार नाहीं, तर प्रत्येक अडचणीमध्यें मला मार्गदर्शक मिळणार, या विश्वासामुळें माझ्या डोक्यावरील मोठा भार खालीं उतरला असें मला वाटलें.

" पुण्याला पोहोंचल्यानंतर गोखल्यांची उत्तरक्रिया वगैरे आटोपून सोसायटीचा योगक्षेम यापुढें कसा चालवावा, आणि मी सोसायटींत दाखल व्हावें कीं नाहीं, या प्रश्नाच्या चर्चेला आम्ही सर्वजण लागलों. माझ्यावर मोठा भार येऊन पडला. गोखले जिवंत असेपर्यंत मी सोसायटीमध्यें दाखल होण्याचा प्रयत्न करण्याचा प्रश्नच उपस्थित होत नव्हता. गोखल्यांची आज्ञा किंवा इच्छा असेल त्याप्रमाणें करावयाचें, येवढेंच माझें काम होतें. ही स्थिति मला पसंत होती. भारतवर्षरूपी तुफानी समुद्रामध्यें माझ्या आयुष्याचें तारूं ढकलतांना मला कोणी सुकाणदार पाहिजे होता, आणि गोखल्यांसारखा सुकाणदार मिळाल्यावर मला कसलीच धास्ती नव्हती.

" आतां मला वाटूं लागलें कीं, मी सोसायटींत दाखल होण्याचा सतत प्रयत्न केला पाहिजे. गोखल्यांच्या आत्म्याची अशीच इच्छा असणार असें मला वाटे. मी संकोच न धरतां व दृढपणें त्या प्रयत्नाला लागलों. सोसायटीच्या सभासदांमध्यें माझ्या बाबतींत मतभेद होता. कांहींचें मत मला दाखल करण्याच्या बाजूचें होतें, तर इतर मला सोसायटींत घेण्याच्या विरुद्ध होते. मला स्पष्ट दिसून आलें कीं, सोसायटीच्या सभासदांमध्यें मला दाखल करण्याबद्दल मतभेद असेल, तोंपर्यंत माझा मीच दाखल होण्याचा आग्रह सोडून दिला पाहिजे. तेणेंकरूनच सोसायटी व गोखले यांचेंबद्दलचें माझें कर्तव्य मीं केलें असें होईल. अखेर सोसायटीमध्यें दाखल होण्यासंबंधींचा माझा अर्ज परत घेऊनच मी सोसायटीचा खराखुरा सभासद झालों."

सोसायटींत न गेल्यानें राजेंद्रबाबूंना कांहीं काळ वाईट वाटलें व त्यांचें वकिलीकडे लक्ष लागेना. पण पुढेंपुढें जसजसें ते सेवाकार्यांत निमग्न झाले, तसतसा त्यांना सोसायटीचा विसर पडल्यास नवल नव्हतें. गांधीजीप्रमाणें त्यांनाहि आतां वाटत असेल कीं आपण सोसायटीचे

सभासद झालों नाहीं, हें बरें झालें आणि गांधीजींप्रमाणें त्यांनींहि आतां पुढीलप्रमाणें उद्गार कदाचित् काढले असते :

"अनुभवानें आतां मला असें दिसतें कीं, मी सोसायटीचा रीतसर सभासद झालों नाहीं, हें ठीकच झालें, व सभासदांनीं माझ्या सभासदत्वाला केलेला विरोध योग्य होता. त्यांच्या माझ्या सिद्धान्तामध्यें भेद असल्याचें अनुभवानें सिद्ध झालें आहे. पण मतभेदाची जाणीव असतांनाहि त्यांच्या माझ्यामध्यें आत्म्याचें अंतर कधींच पडलेलें नाहीं, कटुता कधींच उत्पन्न झालेली नाहीं, मतभेद असतांहि आमचें बंधुत्वाचें व मैत्रीचें नातें कायम राहिलें आहे. सोसायटीचें स्थान माझ्या दृष्टीनें नेहमीं यात्रेचें स्थानच होऊन राहिलें आहे. लौकिक दृष्टीनें मी तिचा सभासद नसेना का, पण आध्यात्मिक दृष्टीनें मी सभासद आहेच. लौकिक संबंधापेक्षां आध्यात्मिक संबंध अधिक मौल्यवान् आहे. आध्यात्मिक संबंधाखेरीज लौकिक संबंध हा प्राणाशिवायच्या देहाप्रमाणेंच होय."

* * *

" पुण्याला पोहोंचल्यानंतर गोखल्यांची उत्तरक्रिया वगैरे आटोपून सोसायटीचा योगक्षेम यापुढें कसा चालवावा, आणि मी सोसायटींत दाखल व्हावें कीं नाहीं, या प्रश्नाच्या चर्चेला आम्ही सर्वजण लागलों. माझ्यावर मोठा भार येऊन पडला. गोखले जिवंत असेपर्यंत मी सोसायटीमध्यें दाखल होण्याचा प्रयत्न करण्याचा प्रश्नच उपस्थित होत नव्हता. गोखल्यांची आज्ञा किंवा इच्छा असेल त्याप्रमाणें करावयाचें, येवढेंच माझें काम होतें. ही स्थिति मला पसंत होती. भारतवर्षरूपी तुफानी समुद्रामध्यें माझ्या आयुष्याचें तारूं ढकलतांना मला कोणी सुकाणदार पाहिजे होता, आणि गोखल्यांसारखा सुकाणदार मिळाल्यावर मला कसलीच धास्ती नव्हती.

" आतां मला वाटूं लागलें कीं, मी सोसायटींत दाखल होण्याचा सतत प्रयत्न केला पाहिजे. गोखल्यांच्या आत्म्याची अशीच इच्छा असणार असें मला वाटे. मी संकोच न धरतां व दृढपणें त्या प्रयत्नाला लागलों. सोसायटीच्या सभासदांमध्यें माझ्या बाबतींत मतभेद होता. कांहींचें मत मला दाखल करण्याच्या बाजूचें होतें, तर इतर मला सोसायटींत घेण्याच्या विरुद्ध होते. मला स्पष्ट दिसून आलें कीं, सोसायटीच्या सभासदांमध्यें मला दाखल करण्याबद्दल मतभेद असेल, तोंपर्यंत माझा मीच दाखल होण्याचा आग्रह सोडून दिला पाहिजे. तेणेंकरूनच सोसायटी व गोखले यांचेंबद्दलचें माझें कर्तव्य मीं केलें असें होईल. अखेर सोसायटीमध्यें दाखल होण्यासंबंधींचा माझा अर्ज परत घेऊनच मी सोसायटीचा खराखुरा सभासद झालों. "

सोसायटींत न गेल्यानें राजेंद्रबाबूंना कांहीं काळ वाईट वाटलें व त्यांचें वकिलीकडे लक्ष लागेना. पण पुढेंपुढें जसजसें ते सेवाकार्यांत निमग्न झाले, तसतसा त्यांना सोसायटीचा विसर पडल्यास नवल नव्हतें. गांधीजीप्रमाणें त्यांनाहि आतां वाटत असेल कीं आपण सोसायटीचे

सभासद झालों नाहीं, हें बरें झालें आणि गांधीजींप्रमाणें त्यांनींहि आतां पुढीलप्रमाणें उद्गार कदाचित् काढले असतें :

" अनुभवानें आतां मला असें दिसतें कीं, मी सोसायटीचा रीतसर सभासद झालों नाहीं, हें ठीकच झालें, व सभासदांनीं माझ्या सभासदत्वाला केलेला विरोध योग्य होता. त्यांच्या माझ्या सिद्धान्तामध्यें भेद असल्याचें अनुभवानें सिद्ध झालें आहे. पण मतभेदाची जाणीव असतांनाहि त्यांच्या माझ्यामध्यें आत्म्याचें अंतर कधींच पडलेलें नाहीं, कटुता कधींच उत्पन्न झालेली नाहीं, मतभेद असतांहि आमचें बंधुत्वाचें व मैत्रीचें नातें कायम राहिलें आहे. सोसायटीचें स्थान माझ्या दृष्टीनें नेहमीं यात्रेचें स्थानच होऊन राहिलें आहे. लौकिक दृष्टीनें मी तिचा सभासद नसेना का, पण आध्यात्मिक दृष्टीनें मी सभासद आहेच. लौकिक संबंधापेक्षां आध्यात्मिक संबंध अधिक मौल्यवान् आहे. आध्यात्मिक संबंधाखेरीज लौकिक संबंध हा प्राणाशिवायच्या देहाप्रमाणेंच होय. "

❁ ❁ ❁

# ३ : वकिलीचा व्यवसाय

भारतसेवकसमाजाचें पर्व कायमचें समाप्त झाल्यावर राजेंद्रबाबूंनीं वडील बंधूंच्या सांगण्यावरून आपलें लक्ष वकिलीकडे वळविलें. कलकत्ता हायकोर्टांत वकिली करण्याला लागणारी पूर्वतयारी त्यांनीं अगाऊच करून ठेवली असल्यामुळें त्यांना निराळी तयारी करावयाची नव्हती. फक्त वकिलीची पदवी घ्यावयाची होती. एकदां हायकोर्ट वकील व्हावयाचें ठरविल्यावर मग पदवी घेण्यास कितीसा उशीर लागणार? राजेंद्रबाबूंचा अभ्यास तयारच होता. ते १९१० च्या मार्च महिन्यांत लगेच परीक्षेला बसले व ताबडतोब पासहि झाले. आणखी कांहीं काळ वकिलाच्या कारकुनाचें काम करून १९११ च्या ऑगस्ट महिन्यांत कलकत्ता हायकोर्टांत वकिलीला प्रारंभ केला. कलकत्ता हायकोर्टांत मोठमोठे वकील व बॅरिस्टर होते तरी आपल्या कर्तृत्वावर राजेंद्रबाबूंनीं नांव कमविण्यास सुरुवात केली. त्यांच्या वेळीं कलकत्ता हायकोर्टांत लॉर्ड सिंह, डॉ. सर राशबिहारी घोष, देशबंधु दास, हसन इमान, सर गणेशदत्त सिंह वगैरे अनेक प्रसिद्ध वकील वकिली करीत होते व त्यांच्याशीं राजेंद्रबाबूंचा सामना होता. अनेकदां देशबंधु दासबाबूंबरोबर काम करण्याचा त्यांना प्रसंग आला होता. १९१६ सालापर्यंत बाबूजींनीं कलकत्त्याच्या हायकोर्टांत वकिली करून नामांकित वकील म्हणून नांव

मिळविलें. वकिली करीत असतांनाच त्यांनीं एल्एल्. एम्. या कायद्याच्या सर्वोच्च परीक्षेचा अभ्यास चालविला होता. १९१५ सालीं ते त्या परीक्षेला बसले व पहिल्या वर्गांत पहिले आले. या परीक्षेच्या वेळीं ते लॉ कॉलेजांत प्रोफेसर म्हणून काम करीत असल्यामुळें त्यांना जितका मोकळा वेळ मिळावयास पाहिजे होता तितका मिळूं शकला नाहीं. शिवाय दिवसभर त्यांना कोर्टाचीं कामें संभाळावीं लागत तीं निराळींच. असें असल्यामुळें त्यांनीं एल्एल्. एम्. साठीं कसून श्रम करून अभ्यास केला व अखेर त्या उच्च परीक्षेंत ते पहिले आले. त्यांच्या असामान्य बुद्धिमत्तेचाच हा विजय म्हटला पाहिजे. कलकत्ता युनिव्हर्सिटीची ही कठिणांत कठीण परीक्षा असून या परीक्षेला दर वर्षीं फारच थोडे विद्यार्थी बसतात. ही परीक्षा पास झालेले बिहारमध्यें त्यांच्यापर्यंत फक्त दोघेच होते. बाबूजी व त्यांच्याबरोबर परीक्षेला बसलेले त्यांचे सहाध्यायी बाबू वैद्यनाथसिंह या दोघांशिवाय त्यांच्यापूर्वीं कोणीहि ही परीक्षा उत्तीर्ण झालेला नाहीं.

## पाटणा हायकोर्टांत

१९१६ सालच्या मार्च महिन्यांत बिहार प्रांतांत पाटणा येथें नवीन हायकोर्ट स्थापन करण्यांत आलें. आपल्या प्रांतांत हायकोर्ट आलें असें पाहून कलकत्त्याला वकिली करणारे कित्येक बिहारी वकील आपल्या प्रांतांत परत आले व पाटणा हायकोर्टांत वकिली करूं लागले. राजेंद्रबाबूहि अर्थातच पाटण्याला आले व त्यांनीं तेथील हायकोर्टाची सनद काढली. कलकत्त्याला सुमारें पांच वर्षें त्यांनीं वकिली केली, तर पाटण्याला पुरीं साडेचार वर्षेंहि केली नाहीं. १९१६ पासून १९२० पर्यंत त्यांनीं काय ती वकिली चालविली. पुढें सर्वव्यापी असहकारितेमुळें त्यांनीं आपल्या भरभराटलेल्या वकिलीवर राष्ट्रासाठीं तिलांजलि दिली व ते फकीर बनले. वकिली करीत असतां त्यांना पुष्कळ पैसे

मिळत. विशेषतः पाटणा येथें आल्यावर तर त्यांची चांगलीच चलती सुरू झाली होती. पण वकिलीच्या या ऐन अमदानींत त्यांनीं आपला बडेजाव कधींहि वाढविला नाहीं, अगर मोठी दौलत करण्याच्या ते मार्गेहि लागले नाहींत. ते पूर्वींइतक्याच साधेपणानें वागत. त्यांच्याकडे कोणीहि येवो तो कधीं विन्मुख परत जात नसे. राजेंद्रबाबूंची पहिल्यापासूनच ही परोपकारवृत्ति असल्यामुळें त्यांना जेवढे पैसे मिळत, तेवढे सर्व परोपकारांत व सार्वजनिक कामांत खर्च होऊन जात. त्यांच्याकडे नेहमीं विद्यार्थ्यांची रीघ लागलेली असे व कित्येक गरीब विद्यार्थी त्यांच्याकडे कायमचे राहातहि असत. सार्वजनिक कामासाठीं वर्गण्या व देणग्या देतां देतां ते अगदीं पुरे कफल्लक बनून गेले. शिवाय त्यांच्याकडे नेहमीं राजकीय पुढारी, वाङ्मयसेवक, समाजसेवक वगैरेंचा तळ असे तो निराळाच. या बाबतींत त्यांची देशबंधु चित्तरंजन दास यांच्याशीं तुलना करतां येईल. परोपकार करतां करतां देशबंधु दास जसे अगदीं निष्कांचन बनले, तद्वतच राजेंद्रबाबूंची स्थिति झाली, असें म्हणण्यास हरकत नाहीं. १९२० सालीं जेव्हां त्यांनीं वकिलीला रामराम ठोकला त्या वेळीं त्यांच्याजवळ १५ रुपयेसुद्धां शिल्लक नव्हते. त्यांची मिळकत महिना तीन हजार रुपयांपासून पांच हजारांपर्यंत गेलेली होती. असें असूनसुद्धां त्यांच्या गांठीला १५ रुपये नसावेत, ही गोष्ट त्यांच्या परोपकारी व निःस्वार्थ बुद्धीची द्योतक नाहीं काय? या ठिकाणीं त्यांची चारुदत्ताशीं तुलना करण्याचा कोणालाहि मोह होईल.

## विलायतयात्रा

राजेंद्रबाबूंना १९२८ सालीं जी विलायतयात्रा करावी लागली ती त्यांच्या वकिलीसंबंधांतच असल्यामुळें तिचा या प्रकरणांतच उल्लेख येणें जरूर आहे. शहाबाद जिल्ह्यांत रायबहादूर हरिहरप्रसाद सिंह नांवाचा एक मोठा जमीनदार होता. त्याचा व डुमराव राजाचा जमिनीबाबत

एक मोठा तंटा चालला होता. हा वाद कित्येक लाख रुपयांचा होता, व त्यांत राजेंद्रबाबूंनीं बाबू हरिजींचें वकीलपत्र घेतलें होतें. हा खटला १९२० सालापासून चालत होता. १९२० सालीं तो खालच्या कोर्टांत होता. तेथून १९२४ सालीं हायकोर्टांत आला आणि १९२८ सालीं प्रीव्ही कौंसिलमध्यें दाखल करण्यांत आला. राजेंद्रबाबू या खटल्यांत अगदीं पहिल्यापासून असल्यामुळें त्यांना त्यांतील कागदपत्रांची जितकी इत्थंभूत माहिती झाली होती, तितकी दुसऱ्या कोणालाच नव्हती. आणि १९२० सालीं राजेंद्रबाबूंनीं वकिलीवर पाणी सोडलें, तरी जेव्हां हा खटला हायकोर्टांत अगर प्रीव्ही कौन्सिलमध्यें निघेल त्या वेळीं तो चालविण्याचें बाबूजींनीं हरिजींना अभिवचन दिलें होतें. हा खटला मोठाच असल्यामुळें त्यांत अनेक वकील होते. अधून मधून पं. मोतीलाल नेहरू यांनींहि हरिजीतर्फे कांहीं काम केलें. पण हा खटला केव्हां संपेल त्याचा नियम नसल्यामुळें कोणताहि एक वकील शेवटपर्यंत टिकून राहिला नाहीं. प्रतिपक्षातर्फे देशबंधु दास यांनीं कांहीं दिवस काम केल्यावर त्यांच्या जागीं सर आशुतोष मुकर्जी आले व पं. मोतीलाल नेहरूंनंतर पुन्हा राजेंद्रबाबू आले. हायकोर्टांत महाराजांच्या विरुद्ध निकाल झाल्यामुळें त्यांनीं प्रीव्ही कौन्सिलमध्यें अपील केलें. त्यामुळें हरिजीतर्फे बाबू राजेंद्रप्रसाद यांना इंग्लंडला जाणें भाग पडलें. ९ मार्च १९२८ रोजीं 'कैसर इ हिंद' बोटीनें राजेंद्रबाबू इंग्लंडला निघाले ते २४ मार्च रोजीं संध्याकाळीं लंडनला पोहोंचले. आपल्या अशिलाच्या खटल्यासाठीं ते लंडनला आले असल्यामुळें त्यांनीं प्रथम खटल्याच्या कामाशिवाय दुसरीकडे कोठेंहि लक्ष दिलें नाहीं. आपला खटला बरा व आपण बरें या भावनेनें ते इंग्लंडमध्यें कोठें हिंडलेंहि नाहींत अगर त्यांनीं लंडनाहि पाहिलें नाहीं, किंवा लंडनमध्यें त्यांनीं कोणाच्या गांठीभेटीहि घेतल्या नाहींत. नाहीं म्हणायला लंडनच्या पूर्व भागांत गरिबांची सेवा करणाऱ्या मिस् म्युरिएल लीस्टरबाईंची

त्यांनीं गांठ घेतली. खटला संपल्यावर राजेंद्रबाबूंनीं हिंदुस्थानांत यावयाचें ठरविलें व परत येतां येतां थोडी युरोपची चक्कर मारण्याचें त्यांच्या मनांत आलें. त्याप्रमाणें त्यांनीं आपला कार्यक्रम आंखला.

## ऑस्ट्रियांत

ते पहिल्याप्रथम ऑस्ट्रियांत गेले. व्हिएन्नानजीक सोनाट्सबर्ग या शहरीं आंतरराष्ट्रीय युद्धविरोधी संमेलन भरावयाचें होतें. हिंदुस्थानचे एकमेव प्रतिनिधि म्हणून ते त्या संमेलनाला हजर राहिले व त्यांनीं तेथें हिंदुस्थानच्या वतीनें भाषण केलें. त्या वेळेला फेनर ब्रॉक्वे संमेलनाध्यक्ष होते.

संमेलन समाप्त झाल्यावर संमेलनाच्या कार्याचा प्रचार करण्यासाठीं युरोपांत ठिकठिकाणीं संमेलनाचे प्रतिनिधि धाडण्यांत आले. राजेंद्रबाबूंचीहि ऑस्ट्रेलियांत एका गांवीं रवानगी करण्यांत आली. तेथें जाहीर सभा भरून युद्धविरोधी व्याख्यानें व्हावयाचीं होतीं. या गांवीं राहणाऱ्या एका प्रोफेसरला महात्मा गांधींनीं राजेंद्रबाबूंजवळ एक चिठी दिली होती. त्या गांवीं गेल्यावर राजेंद्रबाबूंवर जो भयंकर प्रसंग आला, त्याची हिंदुस्थानांत फारच थोड्यांना कल्पना असेल. त्या वेळीं हिटलरच्या जर्मनींत नाझींचे कोणत्या प्रकारचे अत्याचार चालत होते याची कल्पना या हकीकतीवरून कोणालाहि आल्याशिवाय राहणार नाहीं. त्या सभेंत राजेंद्रबाबूंवर जे अत्याचार करण्यांत आले व फॅसिस्टांनीं त्यांच्यावर जे हल्ले चढविले ती सगळी हकीकत अंगावर शहारे आणणारी आहे. महात्मा गांधींनीं ३० ऑगस्ट १९२८ च्या ‘ यंग इंडिया ’ मध्यें यासंबंधीं जो महत्त्वाचा लेख लिहिला होता, त्यांत राजेंद्रबाबूंवरील हल्ल्याचें सविस्तर वर्णन आलें असल्यामुळें तोच लेख येथें मुद्दाम देत आहे. ‘ युरोपांत जाणाऱ्यांना इषारा ’ या मथळ्याखालीं महात्मा गांधींनीं पुढीलप्रमाणें अग्रलेख लिहिला :

## राजेंद्रबाबूंवर हल्ला

" असहकारितेच्या चळवळीपासून युरोपांत हिंदुस्थानाबद्दल विशेष कुतूहल उत्पन्न झालें आहे व हिंदी राजकारणाकडे त्यांचें बरेंच लक्षहि वेधलें आहे. पण बाबू राजेंद्रप्रसाद यांच्या बाबतींत असा विपरीत अनुभव येईल अशी कोणाचीच कल्पना नव्हती. प्रीव्ही कौन्सिलमध्यें एक खटला चालविण्यासाठीं कांहीं महिन्यांपूर्वीं ते लंडनला गेले होते. खटल्याचें काम संपल्यावर त्यांनीं युरोपांत थोडीशी सफर मारली व जातां जातां व्हिएन्ना येथें भरलेल्या युद्धविरोधकांच्या परिषदेला हजर राहिले. तेथें एका अनोळखी गृहस्थाच्या विनंतीवरून त्यांनीं जवळच्या गांवीं एका सभेला येण्याचें कबूल केलें. राजेंद्रबाबू ज्या सभेंत विश्वशांतीवर व्याख्यान देत होते, ती सभा फॅसिस्टांनीं उधळून लावून राजेंद्रबाबूंवर भयंकर हल्ला केला; अशा आशयाची एक बातमी कांहीं दिवसांपूर्वीं मुंबई क्रॉनिकलमध्यें प्रसिद्ध झाली होती. पण खुद्द राजेंद्रबाबूंकडून मला कांहींच खबर न आल्यामुळें माझा त्यावर विश्वास बसेना.

ज्या दिवशीं क्रॉनिकलमध्यें वरील बातमी प्रसिद्ध झाली त्याच दिवशीं हॉलंडच्या युवक-परिषदेसाठीं राजेंद्रबाबूंनीं माझ्याकडे तारेनें संदेश मागविला होता. त्यावरून माझ्या शंकेचें निवारण झालें होतें. पण गेल्या डांकेनें माझ्याकडे एका ऑस्ट्रियन प्रोफेसराचें पत्र आलें. त्यांत त्यानें राजेंद्रबाबूंवरील हल्ल्याची बातमी सविस्तर कळविली आहे. ह्या पत्रांतील महत्त्वाचा भाग मी येथें उद्धृत करीत आहें :

" राजेंद्रप्रसाद यांच्याबरोबर तुम्हीं जें ओळखपत्र दिलें होतें त्यायोगें मला आनंद झाला होता. पण आतां त्यांच्यासंबंधींची भयंकर बातमी कळविण्याचें माझ्या नशिबीं आलें आहे. तुमच्या पत्रांत कोणत्याच सभेचा उल्लेख नव्हता, पण तुमच्या पत्राच्या मागल्या बाजूला कोणीतरी लिहिलें होतें कीं, ' भाई राजेंद्रप्रसाद हे स्टाईनफेल्डर सेल येथें व्याख्यान

देणार आहेत, त्या वेळीं तुम्ही हजर राहावें अशी त्यांची विनंती आहे.' हें पत्र वाचून मी नुसता चकितच नव्हे तर भयभीतहि झालें. कारण स्टाईनफेल्डर सेल हा दारूचा गुत्ता असून तेथें त्या दिवशीं स्त्रियांच्या आंतरराष्ट्रीय संघातर्फे शांतता व स्वातंत्र्य या विषयावर भाषणें व्हावयाचीं होतीं. मला हा संघ माहीतहि नव्हता. १ ऑगस्ट रोजीं सकाळीं ९ वाजतां हें पत्र माझ्या हातीं आलें व ह्या संघाचे कोण, कोण सभासद आहेत, त्यांचा पत्ता काय वगैरेंची चौकशी करण्यासाठीं आम्ही दुपार घालविली. पण आम्हांला कांहींच तपास लागला नाहीं. नंतर आम्ही भाई प्रसाद यांना आणण्यासाठीं स्टेशनवर गेलों. श्री. प्रसाद यांना या सभेची कांहींच माहिती नव्हती, अगर त्यांना ज्या गृहस्थानें निमंत्रण दिलें त्याचीहि ओळख नव्हती. त्या गृहस्थाच्या सांगण्यावरून त्यांनीं या सभेंत बोलण्याचें कबूल केलें होतें. ही सभा उधळून लावण्यासाठीं कांहीं अत्याचारी लोक तेथें येऊन बसले आहेत ही गोष्ट आम्हांला कोणासच माहीत नव्हती. त्यामुळें श्री. प्रसाद यांच्यासह आम्ही सभेच्या ठिकाणीं गेलों, तों तेथें काय ? तो अनोळखी गृहस्थ तर नव्हताच, पण स्त्रियांपैकीं कोणी दिसलें नाहीं. उलट दिवाणखाना सिगारेटच्या धुरानें भरलेला आहे, टेबलावर दारूचे प्याले पडलेले आहेत व कांहीं झिंगलेले दारुडे बरळत आहेत, असें दृश्य आम्हांला तेथें दिसलें. पंधरा मिनिटें होऊन गेलीं, तरी कोणाचाच पत्ता दिसेना, तेव्हां आम्ही स्त्रियांच्या कमिटीचें एक टेबल दिसत होतें तिकडे गेलों. आम्ही त्या टेबलाजवळ जातों न जातों तोंच आमच्यावर हल्ला चढविण्यात आला. भाई प्रसाद यांना वांचविण्याची आम्ही आपल्याकडून खूप शिकस्त केली, पण ते जखमी झालेच. आम्ही जखमी झाल्यावर आम्हांला कळलें कीं, त्या दिवशीं ज्या वक्त्याचें भाषण व्हावयाचें होतें तो क्रांतिकारक असून एका क्रांतिकारक पत्राचा संपादक होता. श्री. प्रसाद यांना तोच संपादक समजून चांगलाच प्रसाद देण्यांत

आला. या अनपेक्षित प्रसंगाबद्दल मला अत्यन्त दुःख होतें. माझ्या डोक्याला खादीची हॅट असल्यामुळें माझ्यावर जरी बरेच प्रहार करण्यांत आले तरी भाई प्रसाद यांच्या डोक्यावर, कपाळावर व गालांवर लाठ्यांचे अनेक ठोसे लगावण्यांत आले. आम्हांवर खुर्च्या, टेबलें, बाटल्या वगैरेंचा भयंकर मारा करण्यांत आला. श्री. प्रसाद यांच्या डोक्याजवळ तर भयंकरच जखम झाली असून तिचा डोक्यावर बरावाईट परिणाम होण्याचा संभव आहे. आणि सर्वांत विशेष गोष्ट ही कीं एकानें श्री. प्रसाद यांच्यावर वार करण्यासाठीं सुरा उगारला व तो ताबडतोब मी आपल्या हातावर झेलला, म्हणून बरें झालें. माझ्या हाताला बरीच जखम झाली हें सांगणें नकोच. त्या वेळीं मला इतकें धैर्य व बळ कोठून आलें होतें याचें मला आश्चर्य वाटतें. एका बाजूला मी व दुसऱ्या बाजूला माझा मित्र असे आम्ही दोघे श्री. प्रसादांचें रक्षण करीत होतों. मी एका हातानें श्री. प्रसाद यांना धरलें होतें व दुसऱ्या हातावर प्रहार झेलीत होतों. आम्हां तिघांवर मला वाटतें, शें-पांचशें लोक तुटून पडले असावेत. श्री. प्रसाद यांनींहि शिकस्त केली. अखेरपर्यंत ते आपली गांधी टोपी संभाळीत होते, पण शेवटीं ती गेलीच. दोन दिवस आमचे हात व पाय काळेनिळे होऊन सुजून गेले होते. हातपाय हलविण्याची सोय नव्हती. माझें डोकेंहि भ्रमण करीत असावेंसें वाटतें. ते अत्याचारी दंगेखोर त्या वेळीं एकसारखे ओरडत होते कीं, ‘त्याला ठार करा.’ या आरोळ्या ऐकून माझ्या हृदयांत धडकी भरे व श्री. प्रसाद कसे वांचतात या चिंतेंत मी चूर होऊन जाई...आम्ही श्री. प्रसाद यांना आमच्या घरीं ठेवलें असून त्यांची योग्य ती सेवाशुश्रूषा करीत आहों. नुकतेंच त्यांना जरा बरें वाटूं लागल्यावर ते आमच्या घरून गेले. आम्ही त्यांना पोंचवावयाला बरेंच लांबपर्यंत गेलों होतों. ते दुसरे दिवशीं व्हिलन्यूव्ह येथें पोंचल्यावर त्यांच्याकडून आम्हांला खुशालीचें पत्र आलें. त्यांच्या जखमा डॉक्टरांनीं तपासल्यामुळें

काळजीचें कारण नाहीं असें त्यांनीं आपल्या पत्रांत लिहिलें आहे. आज ते रोमेन रोलंड यांच्याकडे उतरले आहेत. त्यांना मीं ओळखपत्र दिलें होतें. मला तुम्हांला आतां एवढीच विनंती करावयाची आहे कीं, युरोपांत जाऊं इच्छिणाऱ्या हिंदी बांधवांना ही सर्व हकीकत कळवा व कुणाहि अनोळखी माणसाच्या नादीं लागूं नका, असा त्यांना स्पष्ट इशारा द्या. तुमचीं अहिंसेचीं तत्त्वें येथें बेधडक पायाखालीं तुडविलीं जात आहेत. हिंदी बांधव हे स्वभावतःच सज्जन व सौजन्यशील आहेत. एखादा युरोपियन मनुष्य 'मी शाकाहारी आहे' असें त्यांना म्हणाला, कीं त्यांना वाटतें तो तुमच्या अहिंसा तत्त्वाचाच अनुयायी आहे. पण तो कधीं अत्याचारी क्रांतिकारकहि असूं शकतो. म्हणून युरोपांतील अनोळखी माणसाशीं संबंध न ठेवण्याबद्दल तुम्ही आपल्या देशबांधवांस स्पष्ट इषारा देऊन ठेवा, येवढेंच माझें सांगणें आहे.'

"राजेंद्रबाबूंचें मोठ्या धैर्यानें व शिकस्तीनें संरक्षण केल्याबद्दल राजेंद्रबाबूंच्या नातेवाईकांनीं व असंख्य मित्रांनीं या युरोपियन मित्रांचे मनःपूर्वक आभार मानले पाहिजेत. या अनुभवावरून येवढेंच दिसून येतें कीं, सौजन्य, स्वार्थत्याग व औदार्य या गोष्टी अमुकच जातीला किंवा धर्माला आंदण दिलेल्या नाहींत. पण ह्या पत्रांत जो इषारा दिलेला आहे, तो सर्वांत महत्वाचा आहे. हिंदी लोकांच्या प्रसिद्धीचा वाटेल तसा फायदा घेण्याची इच्छा युरोपांत बळावत चालली आहे, यांत शंका नाहीं. हिंदी लोकांनींहि युरोपियन लोकांपुढें हिंदुस्थानचा प्रश्न वेळोवेळीं मांडला पाहिजे व त्यांना खऱ्या परिस्थितीची ओळख करून दिली पाहिजे.

ऑस्ट्रियांतील या दिव्यांतून बाहेर पडल्यावर राजेंद्रबाबू युरोपांत अनेक ठिकाणीं हिंडले. स्वित्झर्लंडमध्यें त्यांनीं रोमेन रोलंड यांची गांठ घेतली व दुभाष्यामार्फत त्यांनीं रोलंड यांजबरोबर सुमारें दोन तास चर्चा केली. राजेंद्रबाबूंना फ्रेंच, जर्मन किंवा दुसरी कोणतीच युरो-

पियन भाषा येत नसल्यामुळें त्यांची बरीच कुचंबणा झाली व इंग्लंड-शिवाय त्यांना इतरत्र फारसें हिंडतां आलें नाहीं. युरोपची सफर संपल्यावर ते परत लंडनला आले. लंडन येथें भरलेल्या जागतिक युवकांच्या शांततापरिषदेला ते हजर राहिले. १६ ऑगस्ट रोजीं ही परिषद भरली होती. या परिषदेंत त्यांनीं हिंदुस्थानतर्फे भाग घेतला व थोडें भाषणहि केलें.

यាप्रमाणें आपल्या अशिलाच्या खटल्यासाठीं त्यांनीं विलायतयात्रा केली, आणि त्यांत त्यांना विविध प्रकारचे रोमांचकारी अनुभव आले. राजेंद्रबाबूंची ही युरोपयात्रा म्हणजे त्यांच्या वकिलीचें अवभृथस्नानच म्हटलें पाहिजे.

❋ ❋ ❋

अनुक्रम
विभाग
क्रमांक
नों. दि.

# ४ : राजेंद्रबाबू व काँग्रेस

१९३४ सालीं काँग्रेसच्या अध्यक्षपदाचा बहुमान मिळविणारे राजेंद्रबाबू १९०६ सालापासून काँग्रेसचे सभासद आहेत. म्हणजे साध्या सभासदापासून अध्यक्षपदापर्यंत पोंचावयाला राजेंद्रबाबूंना पंचवीस वर्षे लागलीं. या हिशेबानें मात्र कोणीहि प्रारंभिक सभासदानें स्वतःच्या मोठेंपणाचें गणित करूं नये! नाहींतर त्याची निष्कारण फसगत व्हावयाची! सभासद झाल्यापासून सुमारें पंचवीस वर्षांनीं गांधीजींना काँग्रेसच्या अध्यक्षपदाचा मान मिळाला, तर पं. जवाहरलाल नेहरू १५ वर्षांतच काँग्रेसचे अध्यक्ष झाले! टिळकांनीं ३० वर्षे काँग्रेसची सेवा करूनहि अध्यक्षपद त्यांच्या वांट्यास आलें नाहीं! खरें म्हटलें तर, राजेंद्रबाबू १९२० सालापासूनच काँग्रेसच्या राजकारणांत विशेष व प्रत्यक्ष असा भाग घेऊं लागले. तत्पूर्वीं काँग्रेसच्या कार्यक्रमांत त्यांचा फारच थोडा भाग असे. १९०६ सालीं कलकत्ता येथें एम्. ए. चा अभ्यास करीत असतां राजेंद्रबाबू अगदीं पहिल्यानें काँग्रेसचे सभासद झाले व त्या काँग्रेसच्या अधिवेशनांत त्यांनीं स्वयंसेवक म्हणून बरेंच काम केलें. जो काँग्रेसचा सच्चा सेवक आहे, त्याची किंमत जनता ओळखतेच, हें सांगणें नकोच. १९११ सालीं पुन्हा कलकत्त्यालाच काँग्रेसचें अधिवेशन भरलें होतें, तेव्हां प्रतिनिधि म्हणून ते काँग्रेसला

हजर राहिले होते. १९१२ सालपासून राजेंद्रबाबू ऑल इंडिया काँग्रेस कमिटीचे जे सभासद झाले, ते अद्यापपर्यंत कायम आहेत. तसेंच गेलीं अनेक वर्षे वर्किंग कमिटीचेहि सभासद आहेत. ते दर वर्षी काँग्रेसच्या अधिवेशनाला नियमितपणें हजर राहात, असें नाहीं. तितकेंच दुसरें महत्त्वाचें काम निघाल्यास ते गैरहजरहि राहात. इतर कामामुळें त्यांचीं फार तर पांचसहा अधिवेशनें चुकलीं असतील. अमृतसर काँग्रेसच्या वेळीं ते आजारी पडले, तर पाटणा काँग्रेसच्या वेळीं साहित्य-संमेलनासाठीं त्यांना कलकत्त्याला जावयाचें होतें. कारण त्या वर्षी ते अखिलभारतीय हिन्दी साहित्यसंमेलनाचे स्वागताध्यक्ष होते. लखनौ, मुंबई, दिल्ली इत्यादि अधिवेशनांना ते हजर राहिले होते.

राजेंद्रबाबूंचा काँग्रेसशीं विशेष निकट संबंध आला, तो १९१९ सालीं. त्या वर्षी सुप्रसिद्ध रौलट कायदा पसार झाला होता. तो कायदा रद्द व्हावा, यासाठीं देशांत जी सार्वत्रिक सत्याग्रहाची चळवळ झाली, त्यांत इतर राजकीय पुढाऱ्यांप्रमाणें राजेंद्रबाबूंनींहि उडी घेतली व ६ एप्रिल रोजीं झालेल्या हरताळांत व जाहीर कार्यक्रमांत भाग घेतला. १९२० सालच्या ऑगस्ट महिन्यांत महात्मा गांधीजींचा सर्वव्यापी असहकारितेचा ठराव देशापुढें येतांक्षणींच राष्ट्रानें त्या ठरावाला आपली मान्यता दिली व सर्व देशभर असहकारितेचा कार्यक्रम अंमलांत आणण्याचें मुक्रर करण्यांत आलें. राजेंद्रबाबूंना गांधीजींचा हा कार्यक्रम मनापासून पसंत पडल्यानें त्यांनीं ताबडतोब आपल्या वकिलीला तिलांजलि दिली व ते ज्या ज्या सरकारी अगर निमसरकारी संस्थांचे सभासद होते, त्यांचेहि त्यांनीं राजीनामे पाठविले. राजेंद्रबाबू त्या वेळीं पाटणा युनिव्हर्सिटीच्या सेनेटचे व सिंडिकेटचेहि सभासद होते. त्या जागांचेहि त्यांनीं राजीनामे दिले.

म. गांधीजींच्या कार्यपद्धतीचा व मनोरचनेचा परिचय राजेंद्रबाबूंना चंपारण्यांत झालाच होता. गांधीजींच्या व्यक्तिमत्त्वाचा राजेंद्रबाबूंवर

एवढा ठसा उमटला कीं आपण यापुढें गांधींच्या नेतृत्वाखालीं वागलें पाहिजे, अशी त्यांना मनोमय जाणीव झाली व त्याप्रमाणें १९२० पासून ते गांधींचे खरेखुरे निष्ठावंत अनुयायी बनले. १९२० सालच्या सप्टेंबर महिन्यांत राजेंद्रबाबूंच्या अध्यक्षतेखालीं जी बिहार प्रांतिक परिषद भरली होती, तिच्यांत त्यांनीं गांधींच्या धोरणाचा व कार्यक्रमाचा जोरदार पुरस्कार करून जनतेला असहकारितेचीं तत्त्वें पटवून दिलीं. राजेंद्रबाबूंनीं वकिली सोडल्याचें जाहीर करतांच त्यांच्या कित्येक मित्रांनीं त्यांचें अनुकरण केलें व कोर्टांवर बहिष्कार पुकारला. १९२० सालीं राजेंद्रबाबूंना पाटण्याच्या हायकोर्टांत वकिली करावयाला लागून अवघीं चारच वर्षें झालीं होतीं; पण तेवढ्या अवधींत नामांकित वकील म्हणून पाटणा हायकोर्टांत त्यांची ख्याति झाली होती. संयुक्तप्रांतांत पं. मोतिलाल नेहरू अगर डॉ. सप्रू, बंगाल्यांत देशबंधु दास अगर बॅ. सेनगुप्त, मद्रासकडे राजगोपालाचार्य अगर श्रीनिवास आय्यंगार अथवा मुंबई प्रांतांत बॅ. जयकर अगर जीना यांनीं वकिलीच्या बाबतींत जें यश व नांव मिळविलें तें बिहार प्रांतांत बाबू राजेंद्रप्रसादांच्या वांट्याला आलें. अव्वल दर्जाचे वकील म्हणून सबंध बिहारमध्यें त्यांचें नांव दुमदुमत होतें. त्या वेळीं त्यांची प्राप्तीहि हजारोंच्या वर गेलेली होती. अशा नामांकित वकिलानें असहकारितेच्या ठरावाला अनुसरून आपल्या धंद्या-वर पाणी सोडावें, याबद्दल जनतेला कां आश्चर्य वाटलें नसेल ?

असहकारितेच्या कार्यक्रमाचीं चक्रें देशांत जोरजोरानें फिरूं लाग-तांच राजेंद्रबाबूंकडे बिहारचें नेतृत्व आलें. असहकारितेचा संपूर्ण कार्यक्रम अमलांत यावा, अशी त्यांची तळमळ असल्यामुळें त्यांनीं गांवोगांव प्रचार करण्यास सुरुवात केली. राजेंद्रबाबूंच्या या दौऱ्यामुळें बिहारमध्यें अभूतपूर्व जागृति झाली. बाबूजींचें विधायक कार्याकडे विशेष लक्ष वेधल्यामुळें त्यांनीं पहिल्याप्रथम संघटना व राष्ट्रीय शिक्षण यांवर भर दिला व आपल्या स्नेह्यांच्या सहकार्यानें पाटणा येथें राष्ट्रीय विद्यापीठ

स्थापन केलें. राष्ट्रीय शिक्षणाबद्दल राजेंद्रबाबूंना सर्वांत जास्त आस्था होती, म्हणून पहिल्यानें त्यांनीं विद्यापीठाची संस्थापना केली. तरी राष्ट्रीय सभेच्या आज्ञेप्रमाणें ग्रामसंघटना, काँग्रेस कमिट्यांची पुनर्घटना, काँग्रेसचे सभासद वाढविणें, टिळक स्वराज्यफंड जमाविणें, चरख्यांचा प्रसार करणें, परदेशी मालावरील बहिष्काराचा प्रचार करणें, मद्यपान बंदीचा पुरस्कार करणें, वगैरे कार्यांतहि त्यांनीं तितक्याच निष्ठेनें लक्ष पुरविलें व काँग्रेसचा संदेश खेडोपाडीं पोहोंचविला. राजेंद्रबाबूंनीं राष्ट्रीय शिक्षणाच्या खालोखाल जर स्वतःला कशाला वाहून घेतलें असेल, तर खादीला घेतलें. महात्माजींप्रमाणें खादी हा त्यांचा बहिश्चर प्राण असून दरिद्रीनारायणाला जगावयाचें असेल तर त्याला खादीशिवाय तरणोपाय नाहीं, अशी त्यांची पक्की खात्री झालेली आहे. त्यामुळें त्यांनीं खादी केंद्रें उघडण्याकडे आपला उत्साह उपयोगांत आणला. १९२२ सालीं महात्मा गांधी कारागृहांत पडल्यावर कायदेभंग चौकशीकमिटी नेमण्यांत आली व देश कायदेभंगाला तयार नाहीं असें ठरविण्यांत आलें. तेव्हां दासनेहरूंनीं जो स्वराज्यपक्ष स्थापन केला, त्यांत राजेंद्रबाबू पडले नाहींत. त्यांना स्वराज्यपक्षाचा कौन्सिलप्रवेशाचा कार्यक्रम अगदीं नापसंत होता. विधायक कार्यापलीकडे लक्ष देण्याची त्यांची इच्छा नव्हती. या मधल्या सात वर्षांत बाबूजींनीं खादीकार्यावर आपलें सर्वस्व वेंचलें व बिहार प्रांतांत हजारों खादीकेंद्रें उघडलीं. महात्मा गांधींच्या नेतृत्वाखालीं जो अखिल भारतीय चरखा संघ निघाला त्यांत एक प्रमुख सभासद म्हणून राजेंद्रबाबूंची योजना करण्यांत आली होती. राजेंद्रबाबूंनीं बिहारमध्यें खादीचा इतका प्रसार केला कीं, गरीबगुरीब व बेकार बिहारी लोकांना पोटभर अन्न मिळण्यास राजेंद्रबाबूंचा चरखाच उपयोगी पडला. या लोकांना राजेंद्रबाबूंबद्दल केवढी कृतज्ञता वाटते त्याची कल्पनाहि करतां येणार नाहीं.

१९२१ सालीं गया येथें काँग्रेसचें अधिवेशन भरलें होतें. त्या वेळीं

स्वागतमंडळाच्या प्रमुख चिटणीसाची कामगिरी राजेंद्रबाबूंकडे आली होती. ती त्यांनीं केवढ्या कर्तबगारीनें पार पाडली याचें लागलीच प्रत्यंतर आलें. त्यांना त्याच वर्षीं काँग्रेसचे चिटणीस म्हणून नेमण्यांत आलें.

राजेंद्रबाबू १९२२–२३ सालीं नाफेरवादी म्हणून प्रसिद्ध होते, तरी कांहीं सहकाऱ्यांच्या आग्रहानुसार त्यांनीं स्थानिक स्वराज्यसंस्थांत प्रवेश केला व १९२४ च्या जानेवारींत पाटणा म्युनिसिपालिटीचे अध्यक्ष म्हणून निवडून आले. कांहीं दिवस या स्थानिक स्वराज्यसंस्थांचा कटु अनुभव घेऊन त्यांनीं म्युनिसिपालिटी व लोकलबोर्ड यांच्या सभासदत्वाचे एका वर्षांतच राजीनामे पाठविले. कौन्सिलांवर त्यांचा कधींच विश्वास नव्हता, त्यामुळें ते कधीं त्या फंदात पडले नाहींत. केवळ काँग्रेसच्या बहुमताच्या ठरावानुसार काँग्रेस पार्लमेंटरी बोर्डाला त्यांनीं आपली अनुमति दिली व काँग्रेससाठीं म्हणून ते कौन्सिलांच्या बाजूनें व्याख्यानें देत हिंडत असत. तसेंच जातिनिष्ठ संस्थांना त्यांचा मनापासून विरोध आहे. तथापि १९२२ सालीं गया येथें भरलेल्या हिंदुमहासभेचे ते स्वागताध्यक्ष होते. पं. मालवीयांच्या मोहबतीखातर त्यांनीं कांहीं दिवस महासभेच्या कार्यांत आपलेपणानें भाग घेतला आहे. शिवाय ते हाडाचे सनातनी व धर्मनिष्ठ असल्यामुळें त्यांना त्या वेळीं महासभेचें आकर्षण वाटलें असेल. पण त्यानंतर ते हिंदुमहासभेपासून किंवा कायस्थ परिषदेपासून अगदीं अलिप्त आहेत. १९२१ सालीं जोधपूर येथें अखिल भारतीय कायस्थ परिषद त्यांच्या अध्यक्षतेखालीं भरली होती.

१९२८ सालीं कलकत्ता काँग्रेसमध्यें वसाहतीच्या स्वराज्याचा जो ठराव पसार झाला तो राजेंद्रबाबूंना कधींच मान्य नव्हता. पं. जवाहरलाल नेहरूंप्रमाणें ते कट्टर व अस्सल स्वातंत्र्यवादी आहेत. लाहोर काँग्रेस भरण्यापूर्वीं कांहीं दिवस बाबूजींच्या अध्यक्षतेखालीं बिहार प्रांतिक परिषद भरली होती. या परिषदेंत त्यांनीं संपूर्ण स्वातंत्र्याचा

ठराव मांडला होता व तो एकमतानें मंजूरहि झाला होता. लवकरच लाहोर येथील कॉंग्रेसच्या अधिवेशनांत ' पूर्ण स्वराज्या ' चा ठराव झाला. यावरून राजेंद्रबाबू हे राष्ट्राच्या पुढें कसे आहेत तें दिसून येईल.

## सत्याग्रहाचा लढा

१९३० सालीं महात्मा गांधींनीं सुरू केलेल्या कायदेभंगाच्या अभूतपूर्व महायुद्धांत राजेंद्रबाबूंनीं केवढा व किती भाग घेतला, तो इतिहास सर्वांच्या नजरेसमोरच आहे. चळवळ सुरू झाल्याबरोबर बाबूजींनीं बिहारचें नेतृत्व स्वीकारून कायदेभंगाच्या लढ्याला प्रारंभ केला. त्यांनीं आपल्या अनुयायांसह मिठाचा कायदेभंग केला, चौकीदारी कर द्यावयाचें नाकारलें व बेकायदा मिरवणुकी काढल्या. व्हाईसरॉयांनीं करबंदीचा वटहुकूम जारी केला; पण असल्या फर्मानामुळें कायदेभंगाकरितां निघालेल्या लोकांना कायदेभंगाची आयतीच संधि चालून आली. चम्पारण्य जिल्ह्यांत ठिकठिकाणीं करबंदी सुरू झाली. त्याचा परिणाम म्हणून चम्पारण्यांत ६०० घरांवर जप्ती निघाली. लाखों रुपयांचें सामान कवडीमोलानें विकण्यांत आलें. कांहीं ठिकाणीं करवसुलीसाठीं गोळीबारहि झाले. या सर्वांचा परिणाम हजारों लोकांच्या कारागृहवासांत झाला. बिहार प्रांतांतून १४२५१ लोक तुरुंगांत गेले. सबंध हिंदुस्थानांत बिहारचा दुसरा नंबर लागला. इतर प्रांताप्रमाणें बिहारमध्येंहि पोलिसांनीं अनेकवार लाठी चालविली व एकदोनदां तर सत्याग्रहींवर गोळ्या झाडल्या. खुद्द राजेंद्रबाबूंनाहि एकदां लाठीचा प्रसाद मिळाला. पाटणा येथील एका कायदेभंगाच्या मिरवणुकींत लोकांवर घोडेस्वार घालण्यांत येऊन मिरवणूक उधळण्यांत आली. या वेळीं राजेंद्रबाबूंवर एका सार्जंटानें आपला घोडा घातला होता. तसेंच भागलपूर जिल्ह्यांत बिहपूर या गांवीं सत्याग्रह करीत असतां त्यांच्यावर बेदरकार लाठी चालविण्यांत आली. या दोन्हीहि वेळीं राजेंद्रबाबूंच्या शरीरावर अनेक जखमा झाल्या. असें म्हणतात कीं या लाठीमाराच्या वेळीं राजेंद्रबाबूंना बचावण्यासाठीं जर एक सच्चा स्वयंसेवक आड

आला नसता तर कदाचित् बाबूजींचें डोकें फुटलें असतें व त्या आघातानें त्यांचा मृत्यूहि ओढवला असता. राष्ट्राचें भाग्य म्हणूनच राजेंद्रबाबू या अत्याचारी हल्लयांतून बचावले.

या कायदेभंगाच्या पहिल्या लढ्यांत राजेंद्रबाबूंवर दोनदां कारागृहवासाचा प्रसंग आला. ५ जुलै १९३० रोजीं छपरा जिल्ह्यांत कायदेभंग करीत असतां, त्यांना अटक करण्यांत आली व ता. ७ रोजीं त्यांना १९३० च्या पांचव्या आणि सहाव्या ऑर्डिनन्सखालील गुन्ह्याबद्दल ६ महिने साध्या कैदेची शिक्षा देण्यांत आली. त्यांच्या दर्जाप्रमाणें त्यांना 'अ' वर्ग मिळाला.

१९३२ सालीं जेव्हां कायदेभंगाचा दुसरा लढा सुरू झाला, तेव्हां राजेंद्रबाबूंना ता. ४ जानेवारी रोजीं दुपारीं पकडण्यांत आलें व लगेंच त्यांना सहा महिन्यांची साधी शिक्षा सुनावण्यांत आली. राजेंद्रबाबूंची तुरुंगवासाची ही दुसरी खेप. याहि खेपेला त्यांना अ वर्ग मिळाला होता, तरी तुरुंगवासाचा त्यांच्या प्रकृतीवर बराच परिणाम झाला. १४ जून १९३२ रोजीं तुरुंगांतून बाहेर पडल्यावर त्यांना प्रकृतिस्वास्थ्यासाठीं कांहीं दिवस पूर्ण विश्रांति घेणें भाग पडलें. १९३०–३१ व १९३२ सालीं कॉंग्रेसचे अध्यक्ष म्हणून राजेंद्रबाबूंची दोनदां हंगामी नेमणूक झाली होती. १९३३ च्या ४ जानेवारीला राजेंद्रबाबूंकडेच अध्यक्षपद होतें. ह्या दिवशीं महात्मा गांधींच्या अटकेचा पहिला वाढदिवस साजरा करण्याच्या हेतूनें राष्ट्रपति राजेंद्रबाबू यांनीं एक जाहीर पत्रक काढलें. बेकायदा कॉंग्रेसचे अध्यक्ष या नात्यानें ता. ६ जानेवारीला राजेंद्रबाबू गिरफ्तार झाले व त्यांना १५ महिन्यांची सक्तमजुरीची शिक्षा फर्मावण्यांत आली. मागच्या दोन्ही तुरुंगवासाप्रमाणें याहि वेळेला त्यांची हजारीबाग तुरुंगांत रवानगी झाली होती व त्यांना अ वर्गहि देण्यांत आला होता. या खेपेला त्यांची प्रकृति मागच्यापेक्षांहि अधिक बिघडली, व त्यांना हजारीबाग तुरुंगांतून पाटणा येथील हॉस्पिटलमध्यें

नेण्यांत आलें. त्यांची तब्बेत उत्तरोत्तर खालावतच चालली. जनतेच्या विनंतीला मान न देतां त्यांना तसेंच तुरुंगांत डांबून ठेवण्यांत सरकारनें आपला निर्घृणपणा व्यक्त केलाच. जनतेच्या मागण्यांना मान दिला, तर सरकार कसचें? राजेंद्रबाबूंच्या भयंकर आजारीपणानें सरकारचें पोलादी अंतःकरण कंप पावलें नाहीं. अखेर राजेंद्रबाबूंचें दुखणें विकोपास चाललें हें पाहून, आपल्यावरील अपवाद टाळण्यासाठीं सरकारनें ता. १७ जानेवारी १९३४ सालीं त्यांची मुक्तता केली. त्यांची पूर्ण मुदत भरण्यापूर्वीं अवघे तीनच महिने त्यांची सुटका झाली. राजेंद्रबाबूंच्या या सुटकेबाबत हिंदुस्थान सरकारनें पुढीलप्रमाणें पत्रक काढलें होतें :

"बाबू राजेंद्रप्रसाद यांना १९३३ च्या जानेवारींत क्रि. लॉ. अमेंडमेंट ॲक्टाच्या १७ कलमाखालीं १५ महिन्यांची सक्तमजुरीची शिक्षा सुनावण्यांत आली. पुढें हजारीबाग तुरुंगांत असतां ते दमा, खोकला, अतिसार वगैरे विकारांनीं आजारी पडले. सप्टेंबर-मध्यें त्यांची बांकीपूर जेलमध्यें रवानगी करण्यांत आली व पुढें त्यांना औषधोपचारासाठीं पाटणा जनरल हॉस्पिटलमध्यें पाठविण्यांत आलें असून अजून ते तेथेंच आहेत. त्यांचा आजार कमी होईना, म्हणून सरकारनें त्यांची प्रकृति मेडिकल बोर्डाकडून ता. ९ जानेवारी रोजीं तपासून घेतली. तेव्हां त्यांची प्रकृति सुधारत असली तरी त्यांना औषधोपचाराची जरूर आहे असा बोर्डानें आपला अभिप्राय व्यक्त केला. त्यावरून त्यांची राहिलेली शिक्षा माफ करून त्यांची तावडतोब मुक्तता करण्याचें स्थानिक सरकारनें ठरविलें आहे.'

या सरकारी पत्रकाप्रमाणें ता. १७ जानेवारी रोजीं संध्याकाळीं पाटणा जनरल हॉस्पिटलमधून राजेंद्रबाबूंची मुक्तता करण्यांत आली.

तुरुंगांतून सुटतांक्षणींच राजेंद्रबाबूंच्या पुढें बिहार भूकंपकार्याचें जणूं ताट वाढूनच ठेवलें होतें. प्रकृति चांगली नसतांहि त्यांनीं या

सेवाकार्याला स्वतःला जुंपलें व मोठ्या धडाडीनें कार्याला प्रारंभ केला. राजेंद्रबाबूंची ही भूकंपनिवारणाची कामगिरी बिहारच्या व हिंदुस्थानच्या इतिहासांत अजरामर राहील यांत शंका नाहीं.

राजेंद्रबाबूंचें भूकंपनिवारणाचें कार्य चालू असतांना इकडे दिल्लींत निराळेंच राजकारण शिजत होतें. डॉ. अन्सारी, डॉ. विधानचंद्र रॉय, व भुलाभाई देसाई यांनीं कौन्सिलें काबीज करण्याच्या हेतूनें स्वराज्य-पक्षाचें पुनरुज्जीवन करण्याचा घाट घातला व कॉंग्रेसमध्यें पुनः कौन्सिलप्रवेशाचा ठराव पास व्हावा, असा उद्योग आरंभला. त्यांनीं लागलींच आपल्या मताशीं जुळणाऱ्या कॉंग्रेस पुढाऱ्यांना निमंत्रण करून ता. ३१ मार्च रोजीं दिल्ली येथें एक परिषद भरविली व स्वराज्यपक्षाला पुनर्जन्म दिल्याचें बहुमतानें जाहीर केलें. वजनदार पुढाऱ्यांच्या या चळवळीला महात्मा गांधींची संमति मिळेल किंवा नाहीं याची शंका होती; पण अखेर गांधीजींचें मत वळविण्यांत येऊन त्यांच्याकडून ता. ५ एप्रिल रोजीं कौन्सिलप्रवेशाला मान्यता मिळविण्यांत आली. पुढें दोनच दिवसांनीं महात्माजींना अंतःसाक्षात्कार होऊन त्यांनीं कायदेभंगाची चळवळ बंद केल्याचें पत्रक काढलें. महात्माजींचें हें क्रांतिकारक पत्रक बाहेर पडतांच देशांत एकच खळबळ उडाली व कॉंग्रेसचा पुढें काय कार्यक्रम ठरणार याबद्दल सर्वत्र चर्चा सुरू झाली. कॉंग्रेसच्या अलीकडील स्थित्यंतरांचा इतिहास समजावून घेण्याच्या दृष्टीनें गांधीजींचें हें पत्रक अत्यंत महत्त्वाचें असल्यामुळें तें येथें मुद्दाम उद्धृत केलें आहे :

## म. गांधींचें पत्रक

" आश्रमवासीयांबरोबर झालेल्या वाटाघाटीनंतर आत्मनिरीक्षण करून माझें असें मत झालें आहे कीं, या वेळीं सविनय कायदेभंग मागें घेण्याचाच मीं सल्ला देणें जरूर आहे. कारण विशिष्ट गाऱ्हाण्याकरितां

केलेला कायदेभंग हा स्वराज्याकरितां केल्या जाणाऱ्या कायदेभंगापासून भिन्न आहे. यापुढें सर्वांनीं सविनय कायदेभंगाचें हें अस्त्र केवळ माझ्याकडे सोंपवावें. माझ्या हयातींत यापुढें पुनः कोणास या अस्त्राचें पुनरुज्जीवन करावेंसें वाटलें, तर माझ्याच देखरेखीखालीं त्याचा उपयोग करण्यांत यावा. मात्र याला अपवाद एकच, आणि तो म्हणजे ज्याला या उपायाचें शास्त्र माझ्यापेक्षां अधिक स्पष्टपणें समजलें असेल व लोकांत आत्मविश्वास जागृत करतां येईल, त्यानेंच या अस्त्राचा स्वतंत्रपणें अवलंब करावा.

" या पत्रकांतील प्रत्येक शब्द, आत्मचिंतन, अंतर्निरीक्षण व प्रार्थना यामुळें मला सुचला आहे. या निर्णयांत कोणाहि व्यक्तीवर टीका करण्याचा माझा हेतु नसून ही माझ्या मर्यादित सामर्थ्याचीच कबुली आहे. इतक्या वर्षांच्या जबाबदारीची जाणीव ठेवूनच मीं हा निर्णय घेतलेला आहे.

" पुणें येथें गेल्या जुलै महिन्यांत कॉंग्रेसकार्यकर्त्यांची खाजगी परिषद भरली होती. तींत मीं सांगितलें होतें कीं, वैयक्तिक कायदेभंग करणारी पुष्कळ मंडळी निघाली तर उत्तमच, नाहीं तर वैयक्तिक सत्याग्रहाचा संदेश जिवंत ठेवण्याकरितां एक मनुष्य जरी निघाला तरी पुरें होईल.

" या परिषदेनंतर पुष्कळ विचार करूनच मीं हा निर्णय ठरविला आहे व कायदेभंगाच्या चळवळीची जबाबदारी मीं स्वतःच्या शिरावर घेऊं इच्छितों.

" सत्याग्रहाचा खरा व पूर्ण अर्थ जनतेला अद्यापि कळलेला नाहीं. सत्याग्रहाची शिकवणूक जनतेला देतांना गेल्या चळवळींत कित्येक अनिष्ट गोष्टी सत्याग्रहांत चुकीनें मिसळल्या गेल्या व त्यामुळें खऱ्या सत्याग्रहाला गालबोट लागलें.

"आध्यात्मिक साधनांचा उपयोग योग्य व्यक्तीकडूनच न केला गेल्यास तीं साधनें पुष्कळ वेळां निरुपयोगी ठरतात. सत्याग्रह किंवा सविनय कायदेभंग हेंहि एक तेजस्वी आध्यात्मिकच हत्यार आहे. वैद्यकीय शास्त्रांत शस्त्रक्रियेचीं हत्यारें वापरण्यास जसा कुशल सर्जनच लागतो, त्याप्रमाणें सत्याग्रहाचें अस्त्रहि कुशल सत्याग्रहीच वापरूं शकेल. इतरांना तें साधणार नाहीं, व त्यांनीं तें वापरण्याच्या मोहांतहि सांपडूं नये. हेंच त्यांच्या व इतरांच्याहि हिताचें होईल.

"मी सत्याग्रहाचा जनक, तज्ज्ञ व प्रवर्तक आहे. माझ्या मतें देश-हिताचा तोच उत्तम मार्ग होय. त्याच्या सुपरिणामाबद्दल व्यक्तिशः माझी बालंबाल खात्री पटलेली आहे, असें मी स्वानुभवावरून सांगतों.

"सशस्त्र युद्धापेक्षांहि सत्याग्रह अधिक शुद्ध व उपयुक्त आहे. सत्याग्रह हें शस्त्र क्रांतिकारक आणि क्रांतिकारकांना दडपणारे राज्यकर्ते या दोघांच्याहि अंतःकरणाला जाऊन भिडणारें आहे. गेल्या चळवळींत सत्याग्रहाचा प्रयोग करण्यांत आला, पण तो कांहीं दृष्टींनीं बरोबर झाला नाहीं.

"सत्याग्रह म्हणजे नुसता कायदेभंग नव्हे. सत्याग्रहाचा अर्थ कायदेभंगापेक्षां अधिक व्यापक आहे. सत्याग्रह म्हणजे सत्याचा शोध. सत्याग्रह म्हणजे अहिंसेच्या मार्गाचें संशोधन. सत्य आणि अहिंसा यांना सर्वस्वी बाध न येईल अशा रीतीनें कायदेभंग व्हावयास हवा होता, पण तो तसा झाला नाहीं. असा कायदेभंग तहकुबीचा हा माझा सल्ला कॉंग्रेसवर बंधनकारक नाहीं. हें माझें व्यक्तिविषयक मत मी जाहीर करीत आहें. खादी-प्रचार, जातिविषयक ऐक्यसाधन, अस्पृश्यता-निवारण, मद्यपानप्रतिबंध वगैरे कॉंग्रेसच्या कार्यक्रमांतील विधायक भाग कायम असून त्याला माझ्या या अभिप्रायानें कोणत्याहि प्रकारचा बाध येणार नाहीं. तीं कार्यें पूर्वीप्रमाणें पुढें चालू राहतील."

अशा रीतीनें महात्मा गांधींनीं दांडी येथें समुद्रकिनाऱ्यावर ता. ६ एप्रिल १९३० रोजीं जाहीर रीतीनें मिठाच्या कायद्याचा भंग करून सुरू केलेली कायदेभंगाची चळवळ बरोबर चार वर्षांनीं म्हणजे ता. ७ एप्रिल १९३४ रोजीं संपुष्टांत आणली.

## राजेंद्रबाबूंची मुलाखत

ता. २ मे रोजीं रांची येथें स्वराज्यपक्षाची परिषद भरून त्यांत महात्मा गांधींच्या पत्रकाचा विचार करण्यांत आला. राजेंद्रबाबू ह्या परिषदेला हजर होते, पण स्वराज्यपक्षाला न मिळण्याचा त्यांनीं आपला मनोदय व्यक्त केला. ते पहिल्यापासूनच कौन्सिलविरोधी असल्यामुळें ते या कौन्सिलवाल्या स्वराज्यपक्षाला मिळतील अशी कोणाला आशाहि वाटत नव्हती. तथापि स्वराज्यपक्षाला मदत करण्याचें त्यांनीं जें आश्वासन दिलें तें त्यांच्या औदार्यबुद्धीस साजेसेंच होतें. ता. ९ मे रोजीं त्यांची कौन्सिलप्रवेशाच्या कार्यक्रमाबाबत पाटणा येथें जी मुलाखत घेण्यांत आली तीवरून त्यांचीं पूर्वीचींच मतें अद्यापि कशीं अढळ आहेत, हें दिसून येतें. ही मुलाखत त्या दृष्टीनें महत्त्वाचीच म्हटली पाहिजे.

वृत्तपत्राच्या प्रतिनिधीला मुलाखत देतांना राजेंद्रबाबू म्हणाले कीं, "पूर्वीचा फेर नाफेरवाद पुनः उकरून काढावा असें मला वाटत नाहीं, म्हणून बिहारमधील मदतीचें काम संपल्यावर मी शक्य तितका वेळ स्वराज्यपक्षाच्या सेवेला द्यावयाला तयार आहे. या प्रयत्नांत त्यांना यश येवो असें मी इच्छितों व त्याकरितां जरूर ती खटपट करावयास मी तयार आहें."

प्रश्न—रांची परिषदेच्या निर्णयाला ऑ. इं. कॉंग्रेस कमिटीकडून मंजुरी मिळेल काय?

बाबू राजेंद्रप्रसाद—कॉंग्रेसमध्यें एक पार्लमेंटरी शाखा ठेवण्याला व त्या शाखेकडे कायदेमंडळांतील काम सोंपविण्याला ऑ. इं. कॉं.

कमिटीची संमति मिळेल असें मला वाटतें. यामुळें स्वराज्यपक्षाचें समाधान होईल. नाफेरवाले म्हणविणारे लोक त्यांना विरोध करणार नसल्यामुळें कौन्सिल–प्रवेशवादी लोकांना सर्वांचें समाधान होण्याजोगी योजना कां तयार करतां येऊं नये, हें मला समजत नाहीं.

प्रश्न—श्री. नरीमन वगैरे मंडळींनीं म्हटल्याप्रमाणें लाहोर कॉंग्रेसचा ठराव रद्द करण्यासाठीं जादा कॉंग्रेसची जरूरी आहे का? ऑ. इं. कॉं. कमिटीला तसें करण्याचा काय अधिकार आहे?

बाबू राजेंद्रप्रसाद—लाहोर कॉंग्रेसचा ठराव अस्तित्वांत असतां ऑ. इं. कॉं. कमिटीला कौन्सिल–प्रवेशाला मंजुरी देतां येईल किंवा नाहीं हा नियमाचा प्रश्न सोडविला तरी कॉंग्रेसची सर्वसाधारण बैठक भरणें जरूर असून तिनें या बाबतींत योग्य पुढाकार घ्यावा हें बरें. पण या बाबतींत बऱ्याच अडचणी आहेत. कॉंग्रेसपूर्वीं निरनिराळ्या कॉंग्रेस कमिट्या अस्तित्वांत येणें जरूर आहे. पण गेलीं तीन वर्षें त्या अस्तित्वांत नसल्यामुळें प्रतिनिधींची निवडणूक कशी करणार? या सर्व गोष्टींना बराच वेळ लागेल व कॉंग्रेसच्या बैठकीनंतर असेंब्लीच्या निवडणुकी लढवायला पुरेसा वेळ राहणार नाहीं, म्हणून सदर प्रश्न कॉंग्रेसच्या बैठकीपर्यंत लांबणीवर टाकूं नये, असें मला वाटतें.

प्रश्न— बिहारमध्यें स्वराज्यपक्ष काढण्याची जरूरी आहे काय? असल्यास तुमचे स्वराज्यपक्षाशीं संबंध कसे राहतील?

बाबू राजेंद्रप्रसाद—बिहारमध्यें इतर प्रांतांप्रमाणें स्वराजिष्ट व इतर असा भेद नाहीं. बिहारप्रांत कॉंग्रेसची आज्ञा पाळीत असून या वेळींहि ती पाळली जाईल. बिहारमध्यें स्वराज्यपक्ष काढावयाचा किंवा नाहीं, हें त्या पक्षाच्या कॉंग्रेसमध्यें मंजूर होणाऱ्या घटनेवर अवलंबून आहे. मी स्वतः कौन्सिल–प्रवेशवादी लोकांना सर्वस्वी मदत करावयास तयार आहें.

प्रश्न—संयुक्त प्रांतांतील कौन्सिलविरोधी लोकांच्या चळवळीबद्दल तुम्हांला काय वाटतें ?

बाबू राजेंद्रप्रसाद—माझीं पूर्वींचीं मतें कायम असलीं तरी कौन्सिल-प्रवेशावर विश्वास असणाऱ्या आपल्या मित्राशीं झगडण्यांत आपल्या सामर्थ्याचा अपव्यय करावा, असें मला वाटत नाहीं. त्यांच्या मार्गांत अडचणी आहेतच. त्यांत आणखी भर घालावी, असें मला वाटत नाहीं.

## राजेंद्रबाबूंची विनंति

स्वराज्यपक्षाला मदत करण्याचें आश्वासन दिल्याबरोबर राजेंद्रबाबूंनीं काँग्रेसच्या उमेदवारांना मतें देण्याबद्दल एक विनंतिपत्रक ता. २ रोजीं प्रसिद्ध केलें.

पत्रकांत राजेंद्रबाबू म्हणतात, "सरकार सुसंघटित व प्रबल आहे. त्याच्या जनहितविघातक कार्याला तितक्या प्रबळ आणि सुसंघटित संस्थेलाच तोंड देणें शक्य होईल. काँग्रेस ही राष्ट्रांतील एकच संघटित व परिणामकारक विरोध करूं शकेल अशी संस्था आहे. आणि असें-ब्लींत शिस्तवार आणि संघटित विरोध करण्याचें कार्य काँग्रेसनें असेंब्लींत पाठविलेला पक्षच करूं शकेल. अशा स्थितींत काँग्रेस उमेदवारांना मतें देऊनच जाचक सरकारी कायद्यांना तुम्ही सडेतोड व राष्ट्राला हितकारक असें उत्तर देऊं शकाल. इतरांना हीं मतें देऊन हें कार्य होणार नाहीं; कारण ते उमेदवार कितीहि सच्चे व सज्जन असले, तरी त्यांची प्रबळ संघटना होऊं शकणार नाहीं. याकरितां सर्वांनीं आपलीं मतें काँग्रेस–उमेदवारांकरितांच राखून ठेवावीं."

ता. १७ मे रोजीं पाटणा येथें काँग्रेसची वार्किंग कमिटीची सभा भरून महात्मा गांधींच्या कायदेभंग–तहकुबीच्या पत्रकास मान्यता देण्यांत आली, व स्वराज्यपक्षाचा कौन्सिलप्रवेशाचा कार्यक्रमहि मंजूर करण्यांत आला, लगेच दुसऱ्या दिवशीं तेथेंच ऑल इंडिया काँग्रेस

कमिटीची बैठक भरली, व देशांतील एकंदर राजकारणाचा आढावा घेण्यांत आला. गांधीजींच्या पत्रकाचा व स्वराज्यपक्षाचा विचार होऊन कौन्सिलाच्या कार्यक्रमासाठीं काँग्रेस पार्लमेंटरी बोर्डाची स्थापना करण्यांत आली. या बैठकींत महात्मा गांधींच्या पत्रकाला संमति देण्यासंबंधींचा ठराव डॉ. अन्सारी यांनीं मांडला व त्याला राजेंद्रबाबूंनीं पुढील भाषण करून दुजोरा दिला. ते म्हणाले, “ चार वर्षे झगडा झाल्यावर पुण्यांत सामुदायिक कायदेभंगाचें वैयक्तिक कायदेभंगांत रूपांतर करण्यांत आलें. आतां ही चळवळ एका व्यक्तीपुरती मर्यादित करण्यांत येत आहे. म. गांधींचें पत्रक सर्वांना देण्यांत आलेलें आहे. त्यांत आपण आज किंवा उद्यां स्वतः सविनय कायदेभंग करूं असें त्यांनीं कोठेंहि म्हटलेलें नाहीं. फक्त जरूर पडेल त्या वेळीं कायदेभंग करूं असें त्यांत त्यांनीं म्हटलें आहे. ज्यांना यामध्यें कायदेभंग पूर्णपणें परत घेतला नाहीं, असा अर्थ दिसत असेल, त्यांनीं त्यांवर आपले विचार प्रदर्शित करावे. सरकारलाहि स्वतःच्या दृष्टिकोनानुसार त्याची छाननी करतां येईल; पण म. गांधी व काँग्रेस यांचें धोरण सर्वांनाच सहज कळण्यासारखें आहे.”

## राष्ट्रपति राजेंद्रबाबू

यानंतर ता. १३ जून रोजीं वर्धा येथें वर्किंग कमिटीची बैठक भरून त्यांत राजेंद्रबाबूंनाच मुंबई काँग्रेसचें अध्यक्षपद देण्यांत यावें असा ठराव एकमतानें करण्यांत आला. हा ठराव पुढीलप्रमाणें आहे :

‘ काँग्रेसचे अध्यक्ष निवडण्याचा काँग्रेस-कमिट्यांचा हक्क वर्किंग कमिटीस मान्य आहे तरी पुरीस होणाऱ्या ( परंतु पुढें न झालेल्या ) काँग्रेस अधिवेशनाचे अध्यक्षस्थानीं बाबू राजेंद्रप्रसाद यांची योजना एकमतानें काँ. कमिट्यांनीं केली होती; तरी त्यांची मुंबई काँग्रेसचे अध्यक्ष म्हणून योजना करावी, असें वर्किंग कमिटीचें मत आहे. ’

वर्किंग कमिटीच्या या शिफारशीप्रमाणें देशांतील सर्व प्रांतिक काँग्रेस कमिट्यांनीं मुंबई काँग्रेसच्या अध्यक्षपदासाठीं राजेंद्रबाबूंचेंच नांव

सुचविलें, व त्याप्रमाणें ता. ३० सप्टेंबर रोजीं मुंबई कॉंग्रेसच्या स्वागत-मंडळाची सभा भरून त्यांत बाबू राजेंद्रप्रसाद यांचें नांव अध्यक्ष म्हणून अधिकृतरीत्या मंजूर करण्यांत आलें.

राजेंद्रबाबूंनीं मुंबईच्या स्वागत–मंडळाला अध्यक्षपद स्वीकारण्याची जी तार पाठविली ती पुढीलप्रमाणें आहे—'आभारी आहे. जबाबदारीनें दडपून गेल्यासारखें वाटतें. परंतु अंतस्थ श्रद्धेनें व आशेनें पण त्याचबरोबर विनम्रतेनें ही जबाबदारी पत्करीत आहे.'

# ५ : कायदेमंडळाचें राजकारण

राजेंद्रबाबूंच्या अध्यक्षतेखालीं मुंबईची काँग्रेस मोठ्या ऐश्वर्यांत व उत्साहानें पार पडली. वरळीनजीक एक लाख लोक बसतील एवढा प्रचंड मंडप उभारला होता. कराची काँग्रेसनंतर काँग्रेसचें असें हेंच अधिकृत व निर्बन्धमुक्त अधिवेशन असल्यामुळें जनतेच्या उत्साहाला भरती आली होती. या बैठकीचें वैशिष्ट्य म्हणजे काँग्रेसच्या घटनेंत आमूलाग्र बदल करण्यांत आला व विधायक कार्यक्रमासाठीं महात्मा गांधींनीं काँग्रेसचा राजीनामा दिला. गांधीजींच्या या निर्णयामुळें काँग्रेस-वर एक प्रकारची खिन्नतेची छाया पडली होती, तथापि एकंदरीनें काँग्रेसचा हा सोहळा तिच्या महोत्सवाला साजेसा असा झाला.

राजेंद्रबाबूंच्या काँग्रेसच्या अध्यक्षपदाच्या कारकीर्दींतच काँग्रेसनें मध्यवर्ती कायदेमंडळाच्या निवडणुका लढविण्याचें ठरविलें व १९३५ सालापासूनच काँग्रेसचें तोंड कायदेमंडळाकडे वळलें. आणि तेव्हां-पासूनच निवडणुकांसाठीं राजेंद्रप्रसाद, सरदार पटेल व मौलाना आझाद यांचें पार्लमेंटरी बोर्ड अस्तित्वांत आलें. राजेंद्रबाबूंनीं आपल्या कारकीर्दींत जातीय प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीनें बॅ. जीना यांची मुलाखत घेतली. जीना यांच्या मनधरणीचे पुढें राष्ट्राध्यक्ष सुभाषचंद्र बोस व म. गांधी यांनीं जे

निष्फळ प्रयत्न केले त्या प्रयत्नांची राजेंद्रबाबूंची मुलाखत ही पहिली पायरी होय. म. गांधींव्यतिरिक्त कॉंग्रेसच्या अध्यक्षांपैकीं सबंध देशभर असा दौरा कोणीं काढला नव्हता. तो राजेंद्रबाबूंनीं काढला. कन्याकुमारी-पासून हिमालयापर्यंत सबंध देशभर ते फिरले व त्यांनीं कॉंग्रेसकार्याचा प्रचार केला. या दौऱ्यांत राजेंद्रबाबूंना जे विविध अनुभव आले ते त्यांनीं आपल्या आत्मचरित्रांत सविस्तर ग्रथित केले आहेत. महाराष्ट्रा-संबंधींचे त्यांचे पुढील उद्गार पाहण्यासारखे आहेत : "महाराष्ट्राच्या यात्रेंत मला एक गोष्ट विशेष दिसून आली कीं, तेथील लोकांना फुलांचा खूप षोक आहे. स्वागताच्या वेळीं ते फुलांचे हार घालतात. तेथें अशी पद्धत आहे कीं, जेव्हां एखाद्या मोठ्या व्यक्तीचा सन्मान करावयाचा असतो तेव्हां त्या सन्मानांत अनेक संस्था भाग घेतात व त्या पाहुण्याला प्रत्येकाचे वेगवेगळे हार घातले जातात. या पद्धतीमुळें माझ्या एकेका सभेच्या वेळीं कितीतरी हार जमत असत. बरें, फुलांचे हार हे कांहीं काळ टिकण्याजोगे असते तर त्यांत कांहीं अर्थ होता, पण दुसऱ्या दिवशीं त्याचें सर्वस्व नष्ट होतें व ते फेकून देण्याच्या लायकीचे होतात; शिवाय प्रवासांत त्यांच्यामुळें गाडीला ओझें होतें तें निराळेंच. म्हणून मीं एक जाहीर विनंतीपत्र काढलें. ज्या लोकांना माझा स्वागत–सभारंभ करायचा असेल तर त्यांनीं मला एकाहि फुलाचा हार घालतां कामा नये. त्यांनीं त्याऐवजीं हातसुतांचा हार घालावा. श्री. शंकरराव देवांना माझें हें म्हणणें पटलें व त्याला त्यांनीं दुजोरा दिला. त्याचा असा परिणाम झाला कीं, महाराष्ट्रांत किंवा दुसऱ्या इतर प्रांतांत मीं जेथें जेथें गेलों तेथें तेथें मला सुताचे हार मिळाले. हे सर्व हार मीं गोळा करून घरीं नेले व त्या सुताची खादी विणून घेतली. ही खादी इतकी झाली कीं मला स्वतःसाठीं भरपूर ठेवूनहि मी मित्रांना त्यांतली देऊं शकलों........ महाराष्ट्र कॉंग्रेस कमिटीनें अशी व्यवस्था केली होती कीं ज्या ठिकाणीं मी जाईन त्या ठिकाणीं लोकांनीं मला पैसे द्यावेत. सार्वजनिक फंडाची

ही कल्पना प्रथम महाराष्ट्रांतच निघाली. गांव छोटें असलें किंवा सभा छोटी असली तरी मला थैली दिली जात असे. कधीं कधीं गाडी थांबवून रस्त्यांत ही थैली देण्यांत येई. या पद्धतीनें सुमारें २०–२५ हजार रुपये जमा झाले. या सबंध दौऱ्यांत महाराष्ट्रीय कार्यकर्त्यांची कार्यकुशलता व सुव्यवस्था पाहून मी अत्यंत खूष झालों. दौऱ्याचा कार्यक्रम अशा प्रकारें ठरविण्यांत आला होता कीं, योग्य वेळीं, योग्य विश्रांतीनंतर सभा सुरू होत असे. त्यामुळें शरीरकष्ट न होतां ही यात्रा यथासांगपणें पार पडली."

१९३५ च्या डिसेंबरमध्यें कॉंग्रेसला पन्नास वर्षें पुरीं होत असल्यामुळें कॉंग्रेसचा हा सुवर्णमहोत्सव मोठ्या थाटानें साजरा करावा असें ठरलें व त्या वेळींच डॉ. पट्टाभिसीतारामय्या यांचा कॉंग्रेसचा अधिकृत इतिहास प्रसिद्ध झाला. या ग्रंथाचें श्रेय डॉ. पट्टाभि यांच्याइतकेंच डॉ. राजेंद्रबाबूंना आहे, हें फार थोड्यांना माहीत असेल. कॉंग्रेसचा जन्म होऊन पन्नास वर्षें झालीं पण कॉंग्रेसचा सविस्तर, सुसंगत, साद्यंत व अधिकृत असा इतिहास उपलब्ध नव्हता. डॉ. राजेंद्रबाबूंनीं पट्टाभि यांच्या मागें लागून तो लिहून घेतला व कॉंग्रेसतर्फे प्रसिद्ध केला. राजेंद्रबाबूंचा लकडा मागें नसता तर हा महान् ग्रंथ त्या वेळीं प्रसिद्ध झाला असता किंवा नाहीं याची शंकाच आहे.

## कॉंग्रेसचीं मंत्रिमंडळें

१९३६ च्या एप्रिलमधील लखनौ कॉंग्रेस व १९३६ च्या डिसेंबरमधील फैजपूर कॉंग्रेस हीं दोन्ही अधिवेशनें पं. जवाहरलाल नेहरू यांच्याच लागोपाठ अध्यक्षतेखालीं भरलीं. फैजपूर कॉंग्रेसच्या बैठकींत कॉंग्रेसच्या कायदेमंडळांत जाण्याचा निर्णय घेतल्यामुळें हें अधिवेशन आटोपतांच निवडणुकीच्या प्रचारासाठीं कॉंग्रेस पुढाऱ्यांचे दौरे देशभर सुरू झाले. पं. जवाहरलालप्रमाणें डॉ. राजेंद्रबाबूंनीं या प्रचारांत महत्त्वाचा

भाग घेतला. कॉंग्रेस पुढाऱ्यांनीं केलेल्या सर्वव्यापी जागृतीमुळें बहुतेक सर्व प्रांतांत कॉंग्रेसला बहुमत मिळालें व जुलै १९३७ मध्यें सात प्रांतांत कॉंग्रेसचीं मंत्रिमंडळें स्थापन झालीं.

हीं मंत्रिमंडळें हरिपुरा कॉंग्रेसपर्यंत म्हणजे फेब्रुवारी १९३८ पर्यंत सुरळीत चाललीं, पण राजबंद्यांच्या मुक्ततेच्या प्रश्नावरून वादळ सुरू झालें व कांहीं मंत्रिमंडळांनीं राजीनामेहि दिले. परंतु लवकरच तडजोड झाली व राजीनामे परत घेतले गेले. हरिपुरा व त्रिपुरी हीं कॉंग्रेसचीं दोन्ही अधिवेशनें बाबू सुभाषचंद्र बोस यांच्या अध्यक्षतेखालीं भरलीं होतीं, पण त्रिपुरी येथें त्यांच्या आजारीपणामुळें व वर्किंग कमिटींतील सभासदांच्या मतभेदामुळें त्यांचें अध्यक्षपद असून नसल्यासारखेंच झालें. अशा अडचणीच्या परिस्थितींत कलकत्ता येथें भरलेल्या ऑल इंडिया कॉंग्रेस कमिटीच्या बैठकींत म. गांधींच्या सल्ल्यानें सुभाषबाबूंनीं अध्यक्षपदाचा राजीनामा दिला व त्यांच्या जागीं डॉ. राजेंद्रप्रसाद यांची एकमतानें निवड झाली. पण ही निवड सुद्धां कांहींना रुचली नाहीं. राजेंद्रबाबू भाषण करावयास उभे राहिले असतां विरोधकांनीं एवढा दंगा सुरू केला कीं कांहीं वेळपर्यंत त्यांचें कोणी ऐकूनहि घेईना. पण ते तसेच नेट देऊन उभे राहिले, व थोड्याच वेळांत त्यांनीं सभा बरखास्त केली. पण बैठक संपल्यावर ते बाहेर पडतात तोंच लोकांनीं त्यांच्या भोंवतीं गर्दी केली व त्यांचा कोट ओढला; पण ते थोडक्यांत बचावले. या वेळच्या वर्किंग कमिटींत पं. नेहरू नव्हते, पण डॉ. बिधनचंद्र रॉय व डॉ. प्रफुल्लचंद्र घोष यांचा समावेश झाला होता. यामुळें त्यांच्या घरापुढेंहि विरोधी निदर्शनें झालीं.

सुभाषबाबूंनीं जरी राजीनामा दिला होता तरी त्यांच्या मनांतली अढी गेली नव्हती. त्यांनीं कॉंग्रेसविरुद्ध जाहीरनामे व पत्रकें काढण्यास सुरुवात केली व कॉंग्रेसला जितकी बदनाम करतां येईल तितकी करण्याचा प्रयत्न केला. सुभाषबाबूंचें हें कृत्य गैरसनदशीर तर होतेंच,

पण सभ्यतेलाहि सोडून होतें. त्यामुळें त्यांच्या विरुद्ध कांहींतरी उपाय-योजना करावी असें वर्किंग कमिटीनें ठरविलें व त्यांच्याकडून कैफियतीची मागणी केली. सुभाषबाबूंचा जोर आणखी वाढला होता, त्यामुळें त्यांनीं आपल्या कृत्याचें अधिक जोरानें समर्थन केलें व वर्किंग कमिटीचा आदेश धुडकावून लावला. इतकें झाल्यावर काँग्रेसमधून सुभाषबाबूंची हकालपट्टी करण्यावांचून वर्किंग कमिटीला गत्यंतर नव्हतें. तिनें मोठ्या नाखुषीनें हा निर्णय घेतला.

हा निर्णय राष्ट्राध्यक्ष राजेंद्रप्रसाद यांच्या मनाला फार लागला. पण त्यांच्या मतें तें 'एक अत्यंत अप्रिय कार्य' होतें व तें केल्यावांचून दुसरी गति नव्हती. यासंबंधीं राजेंद्रबाबू कळवळून म्हणतात : "सुभाष-बाबू काँग्रेसमधील एक प्रमुख पुढारी होते. इतकेंच नव्हे तर राष्ट्राध्यक्ष म्हणून दोन वेळां ते निवडून आले होते. त्यांची देशसेवा, त्याग, धैर्य वगैरे गोष्टी लक्षांत घेऊन त्यांच्याविरुद्ध कारवाई कशी करावी, त्यांना हें शासन कसें करावें, हें प्रत्येकाच्या मनाला डाचत होतें. त्यांच्याबरोबर एकत्र काम करण्याची संधि मला कधींच मिळाली नव्हती. तथापि त्यांच्याबद्दल मला फार प्रेम वाटत होतें. त्यांचे ज्येष्ठ बंधु शरच्चंद्र बोस यांची व माझी ओळख कॉलेजपासून होती. आम्ही दोघे एकाच वेळीं प्रेसिडेन्सी कॉलेजांत होतों व एकाच वसतिगृहांत राहात होतों. त्यामुळें आम्हांला एकमेकांबद्दल प्रेमादर वाटत असे. पण मुख्य प्रश्न असा होता कीं काँग्रेस संस्थेला अशा प्रकारें धक्का देणें कितपत उचित ठरलें असतें? आपल्या व्यक्तिगत आत्मीयतेसाठीं अशा सार्वजनिक व सार्व-देशिक संस्थेची अप्रतिष्ठा करणाराला शासन न करणें कसें योग्य होईल? अशा प्रसंगीं वैयक्तिक भावना बाजूस ठेवून संस्थेच्या दृष्टीनें योग्य तें कर्तव्यपालन केलें पाहिजे, म्हणून आम्ही मोठ्या दुःखानें कर्तव्याला जागून कांहीं काळपर्यंत सुभाषबाबूंची काँग्रेसमधून हकालपट्टी केली."

पण याचा असा परिणाम झाला कीं सुभाषबाबू आणखीच शेर झाले व

त्यांनीं ‘ फॉरवर्ड ब्लॉक ’ नांवाचा कॉंग्रेसला प्रतिस्पर्धी असा नवा पक्ष स्थापन केला व ते उघड उघड कॉंग्रेसचे प्रतिपक्षी बनले. अशा प्रकारें कॉंग्रेस व सुभाषचंद्र बोस यांचा संबंध कायमचा तुटला.

## महायुद्धाचें रणकुंड पेटलें

कॉंग्रेसचें पुढचें अधिवेशन बिहारमध्यें व्हावयाचें असल्यामुळें त्रिपुरीहून परत येतांच राजेंद्रबाबूंनीं अधिवेशनाचें स्थळ निश्चित करण्यास प्रारंभ केला व अनेक स्थळांच्या संशोधनानंतर हजारीबाग जिल्ह्यांतील रामगड हें स्थान नक्की करण्यांत आलें. कॉंग्रेसच्या बैठकीची पूर्व तयारी चालू असतां १ सप्टेंबर १९३९ रोजीं युरोपांत हिटलरनें महायुद्धाची डांबरबत्ती शिलगावली. युरोपप्रमाणें हिंदुस्थानांतहि प्रचंड खळबळ उडाली व पुढें काय करावें यासंबंधीं म. गांधींची व्हाईसरॉयशीं मुलाखत झाली आणि कॉंग्रेस वर्किंग कमिटीचीहि बैठक ताबडतोब भरली.

कॉंग्रेसनें सरकारकडून युद्धहेतूची मागणी केली व त्यासंबंधांत म. गांधी व बॅ. जीना यांच्यासह राजेंद्रबाबूंना व्हाईसरॉय यांची भेट घेण्याचा योग आला. कॉंग्रेसनें युद्धांत भाग घेण्याची सशर्त तयारी दाखविली व स्वातंत्र्याचें निश्चित आश्वासन मिळेल तर कॉंग्रेस युद्धकार्यांत सहभागी होईल असें वर्किंग कमिटीनें जाहीर केलें. साम्राज्यवादी ब्रिटिश सरकारनें कॉंग्रेसची ही मागणी धुडकावून लावली व त्याचा परिणाम ठरल्याप्रमाणें कॉंग्रेस मंत्रिमंडळांनीं राजीनामे देण्यांत झाला. १९३९ च्या नोव्हेंबरमध्यें कॉंग्रेसनें केलेल्या एकाहि मागणीला सरकारकडून १९४२ पर्यंत समाधानकारक उत्तर आलें नाहीं. मध्यंतरीं १९४० मध्यें भर पावसांत रामगड कॉंग्रेसचें अधिवेशन मौलाना आझाद यांच्या अध्यक्षतेखालीं पार पडलें. स्वागताध्यक्ष म्हणून डॉ. राजेंद्रप्रसाद यांची एकमतानें निवड करण्यांत आली होती. संध्याकाळीं अधिवेशन सुरू होणार होतें, पण एकाएकी एवढा मुसळधार पाऊस सुरू झाला कीं मंडपांत गुडघा-

भर पाणी झालें. सर्व प्रतिनिधि उभे राहिले. इतक्यांत अध्यक्षांची स्वारी मंडपांत येऊन दाखल झाली. सर्व बाजूंनीं पावसाचा वर्षाव होत होता. स्वागताध्यक्ष डॉ. राजेंद्रप्रसाद यांनीं मोठ्या मुष्किलीनें अध्यक्षांना व्यासपीठावर बसविलें व दोन चार शब्दांत स्वागतपर भाषण केलें. पावसामुळें लाउडस्पीकर निरुपयोगी झाले होते व भाषण ऐकण्याच्या मनःस्थितींतहि कोणी नव्हतें. अध्यक्षांनीं दोन चार वाक्यें बोलून ही बैठक संपल्याचें जाहीर केलें. अशा प्रकारें रामगड काँग्रेसला प्रारंभ झाला, पण दुसऱ्या दिवशीं पावसानें खैर केल्यामुळें अधिवेशन कसें बरें पार पडलें.

१९४० च्या मे महिन्यांत युरोपांतील युद्धानें बरीच आघाडी मारली व जर्मनीनें पोलंड, बेल्जम, हॉलंड, डेन्मार्क, नॉर्वे इत्यादि काबीज करून अखेर फ्रान्सवरहि आक्रमण केलें आणि त्याचाहि जेव्हां ग्रास केला तेव्हां मात्र इंग्लंडचें धाबें दणाणलें व हिटलर हें भयंकर प्रकरण आहे असें इंग्लंडला वाटूं लागलें. इंग्लंडवरील संकटाची ही छाया पाहून काँग्रेसनें आपसें अहिंसातत्त्व तात्पुरतें बाजूस ठेवून युद्धाच्या कामीं मदत करण्याची तयारी दाखविली. पुण्यास भरलेल्या ऑल इंडिया काँग्रेस कमिटीच्या बैठकींत असा ठराव पास करण्यांत आला कीं, सरकारनें जर ताबडतोब स्वातंत्र्याची घोषणा केली व भारतीय पुढाऱ्यांचें सरकार बनवून त्यांच्या हातीं सर्व सत्ता सुपूर्त केली तर काँग्रेस युद्धांत भाग घ्यावयास तयार आहे. हा ठराव खान अब्दुल गफारखान व डॉ. राजेंद्रप्रसाद यांना अहिंसेवरील दृढ श्रद्धेमुळें मुळींच मान्य नव्हता व वर्किंग कमिटींत जेव्हां हा ठराव पास झाला तेव्हां त्याच्या निषेधार्थ या दोघांनीं राजीनामे दिले होते. पण अध्यक्ष मौलाना आझाद यांच्या विनंतीप्रमाणें व त्यांनीं आश्वासन दिल्यावरून त्यांनीं आपले राजीनामे परत घेतले व ऑ. इंडिया कॉं. कमिटीच्या खुल्या अधिवेशनांत तटस्थता स्वीकारली होती. कांहीं तटस्थ मतामुळेंच हा ठराव पास झाला व काँग्रेसनें पुन्हा एकदां युद्धसाहाय्याचें आश्वासन दिलें.

अनुक्रम २.८.८.६
विभाग ८१.८१
क्रमांक 1088
नों. दि. 3913

# ६ : बेचाळीसचा लढा

काँग्रेसनें पुढें केलेला सहकार्याचा हात, युद्ध गळ्याशीं येऊन ठेपलें तरी ब्रिटिश नोकरशाहीला स्वीकारण्याची इच्छा झाली नाहीं व तिनें तो झिडकारून टाकला. व्हाईसरॉय लिन्‌लिथगो यांनीं आपलें कार्यकारी मंडळ वाढविण्याची व त्यांत अधिक हिंदी सभासद घेण्याची तयारी दर्शविली, पण युद्धाच्या काळांत ब्रिटिश सरकार कसलेंहि अभिवचन देऊं शकत नाहीं असें स्पष्टपणें सांगितलें. याचा साहजिकच असा परिणाम झाला कीं युद्धाला सर्वतोपरी विरोध करावयाचा असें काँग्रेसनें ठरविलें व महात्मा गांधींच्या नेतृत्वाखालीं वैयक्तिक सत्याग्रहाचा निश्चय करण्यांत आला. हा सत्याग्रह एक प्रकारें प्रतीकात्मक होता. या सत्याग्रहांत खुद्द महात्मा गांधींनीं निवडलेले व पसंत केलेलेच विधायक काँग्रेस कार्यकर्ते भाग घेऊं शकत होते. वाटेल त्याला वैयक्तिक सत्याग्रह करण्याची परवानगी नव्हती. राजेंद्रबाबू त्या वेळीं बिहारमध्यें आजारी होते, त्यामुळें गांधीजींनीं त्यांना सत्याग्रहाची परवानगी दिली नाहीं.

१९४२ च्या पहिल्या दोन महिन्यांत महायुद्धाला अनपेक्षित कलाटणी मिळाली. पॅसिफिक महासागरांत जपाननेंहि दोस्ताविरुद्ध युद्ध पुकारलें व हिंदुस्थानावर जपानचें संकट येणार कीं काय अशी भीति उत्पन्न झाली. या संकटांतून बचावण्यासाठीं व हिंदी राष्ट्राची

सहानुभूति व सहकार्य मिळविण्यासाठीं ब्रिटिश मंत्रिमंडळानें १९४२ च्या मार्चमध्यें क्रिप्स या मंत्र्याला हिंदुस्थानांत पाठविलें. क्रिप्सनें जी योजना आपल्याबरोबर आणली होती ती हिंदुस्थानाची विभागणी करणारी होती, इतकेंच नव्हे तर त्या योजनेंत प्रत्यक्ष कांहीं मिळावयाचें नव्हतें, पण युद्धोत्तर स्वातंत्र्याचें अभिवचन मात्र त्यांत होतें. म. गांधींनीं म्हटल्याप्रमाणें 'बुडणाऱ्या बँकेचा पुढील तारखेचा हा चेक' काँग्रेस वर्किंग कमिटीनें स्वीकारला नाहीं यांत आश्चर्य नाहीं; पण त्या वेळीं वर्किंग कमिटींत असलेले राजगोपालाचारी यांचें मात्र असें मत होतें कीं, ही योजना स्वीकारावी. बाकीचे सभासद अर्थातच विरुद्ध असल्यामुळें क्रिप्स योजना फेटाळली गेली व हिंदुस्थानाला युद्धांत ओढण्याचें ब्रिटिश सरकारचे प्रयत्न फसले.

महायुद्ध जसजसें हिंदुस्थानापर्यंत पोचूं लागलें तसतसें ब्रिटिश सरकारनें युद्धाला तोंड देण्याचे निरनिराळे मार्ग शोधून काढण्यास सुरुवात केली. त्यामुळें जनतेंत एकसारखा असंतोष पसरूं लागला. काँग्रेसनें ही परिस्थिति पाहून कांहीं तरी करण्याचें ठरविलें व वर्किंग कमिटीची बैठक १९४२ च्या जुलै महिन्यांत वर्धा येथें घेण्यांत आली. या सुमारास म. गांधींनीं 'हरिजन' मधून 'चलेजाव' या रणघोषाला प्रारंभ केला होता. या बैठकींत सत्याग्रह केल्याशिवाय गत्यंतरच नाहीं असें सर्वांनाच मनोमन पटल्याचें दिसून आलें व या लढ्याचें नेतृत्व गांधीजींनीं हातीं घ्यावें असें ठरविण्यांत आलें. मात्र या सत्याग्रहाचा कार्यक्रम काय हें मुळींच ठरविण्यांत आलें नाहीं. तो अहिंसात्मक असावा याबद्दल मात्र सर्वांचें एकमत होतें.

मुंबईला ८ ऑगस्टला भरणाऱ्या ऑल इंडिया काँग्रेस कमिटीच्या बैठकीपूर्वीं १९४२ च्या ३१ जुलैला राजेंद्रबाबूंनीं आपल्या सदाकत आश्रमांत प्रांतिक काँग्रेस कमिटीची बैठक बोलावली. या वेळीं त्यांची

प्रकृति दम्यानें अगदीं जर्जर झाली होती, पण त्यांनीं सभासदांपुढें जोराचें भाषण करून सत्याग्रहासंबंधीं वर्धा येथें झालेली चर्चा निवेदन केली व मुंबईस भरणारी बैठक अत्यंत महत्त्वपूर्ण होईल असें सांगितलें प्रकृति बरी नसल्यामुळें राजेंद्रबाबू या ऐतिहासिक बैठकीला हजर राहूं शकले नाहींत. ते पाटण्यासच राहिले,

मुंबईच्या बैठकीच्या ज्या बातम्या वृत्तपत्रांत येत त्यावरून राजेंद्र-बाबूंना असें वाटूं लागलें कीं थोड्याच दिवसांत सर्व पुढारी पकडले जाणार, तेव्हां तत्पूर्वीं जनतेसाठीं आपण कांहींतरी कार्यक्रम आंखून ठेवावा, त्याचप्रमाणें त्यांनीं एक मसुदा तयार केला. ता. ९ ऑगस्टला अगाऊ कल्पना केल्याप्रमाणें, महात्मा गांधीसुद्धां सर्व प्रमुख पुढारी पकडले गेले. पाटणा येथें त्याच दिवशीं सकाळीं राजेंद्रबाबू मुंबईच्या बैठकीची व अटकेची हकीकत वाचीत होते तोंच डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेट त्यांना अटक करण्यास त्यांच्या आश्रमांत येऊन दाखल झाले. त्यांची तब्बेत बरीच बिघडली असल्यामुळें त्यांना प्रथम १०।१२ दिवस तेथल्या बांकीपूर तुरुंगांत ठेवण्यांत आलें. वर्किंग कमिटीचे इतर सभा-सद ज्या ठिकाणीं ठेवण्यांत आले होते त्या ठिकाणीं राजेंद्रबाबूंना नेण्याचें ठरलें. पण त्या वेळीं आगगाड्या बंद पडल्या होत्या, त्यामुळें विमानाची कल्पना पुढें आली. पण हा प्रवासहि त्यांच्या प्रकृतीला झेंपणार नाहीं असें डॉक्टरांनीं सांगितल्यामुळें तो बेत तसाच राहिला. दहा महिन्यांनीं १९४३ च्या जूनमध्यें त्यांना अहमदनगरच्या किल्ल्यांत पाठविण्याचें ठरलें व त्यांच्यासाठीं एक खोलीहि साफसूफ करून ठेवण्यांत आली. पण पुढें काय झालें कोण जाणें, ते होते तिथेंच म्हणजे बांकीपूर तुरुंगांत खितपत पडले.

या तुरुंगांत असतांना राजेंद्रबाबूंना जे विविध अनुभव आले, त्यासंबंधीं एक उद्‌बोधक प्रकरण त्यांनीं आपल्या आत्मचरित्रांत लिहिलें

आहे. या तुरुंगवासांतील त्यांचे कांहीं अनुभव त्यांच्या शब्दांत पुढील-प्रमाणें होत :

## बांकीपूरच्या तुरुंगांत

" बांकीपूर तुरुंगांतील माझें जीवन फारसें त्रासदायक झालें नाहीं. बंदिस्त जागीं एकान्तांत राहणें पुष्कळांना कष्टप्रद वाटतें, पण मी आपली मनोवृत्ति अशा प्रकारची बनवली आहे कीं, तुरुंगांत आल्या-बरोबर बाहेरची सर्व चिंता विसरून जावी, बाहेरच्या जगाचा आंतल्या जगाशीं कोणत्याहि प्रकारचा संपर्क येऊं नये. नवीन आलेले कैदी बाहेरच्या हकीकती सांगतात व वर्तमानपत्रांच्या द्वारें जगांतल्या बातम्या कळतात, पण अशा बातम्या ऐकण्यापलीकडे मी बाहेरच्या जगाशीं कोठलाहि संबंध ठेवीत नसे. एकदोन मित्रांनीं बाहेरून कांहीं बातम्या माझ्या कानांवर घालून माझें मत विचारलें, पण मीं कोणालाहि कांहीं कळविलें नाहीं. शिवाय प्रारंभीं कित्येक महिने मी आजारीच होतों. मुसळधार पाऊस व थंडी यामुळें माझी प्रकृति अतिशय बिघडून गेली होती. फक्त मार्च ते जून हे तीनचार महिने माझी तब्बेत बरी असे. पण इतर वेळीं मी खाटेवर पडून असे असें मात्र नाहीं. कधीं कधीं तशी स्थिति येई, पण क्वचित्. त्यामुळें सूत काढणें किंवा लिहिणें-वाचणें शक्य होई. पुढें कांहीं दिवसांनीं या सवलतींत आणखी भर पडली व माझ्या सहवासांत दोनतीन जण आले.

" घरचे लोक मला नेहमीं भेटावयाला येत. त्यांच्याबरोबर लहान लहान मुलेंहि असत. त्यांना अर्थात् हें कळत नव्हतें कीं, मी बंदिस्त अवस्थेंत आहे. पण भेटीच्या दिवशीं माझ्याकडे येण्याला तीं अतिशय उत्सुक असत. माझा धाकटा मुलगा चिरंजीव अरुण अडीच वर्षांचा होता. तो तुरुंगाचें फाटक उघडल्याबरोबर इस्पितळ वॉर्डमध्यें मी जेथें होतों तेथें धांवत पळत येई. चारपांच वेळां आल्यामुळें त्याला सर्व माहिती झाली होती. माझ्याजवळ आल्याबरोबर तो म्हणे, 'बाबा, खाऊ

द्या.' मी त्याच्यासाठीं कांहींतरी तयार ठेवीत असे. अर्धा तास इकडे तिकडे करून तो जाई. जातांना त्याला एखादें सुंदर फूल दिसलें तर तो तोडीत असे. तुरुंगाचे अधिकारी त्याला हटकत नसत किंवा त्याच्यावर रागवत नसत. उलट त्याच्या चांचल्याचें कौतुकच करीत. दर वेळीं बाहेर जातांना अरुण म्हणे, 'बाबा, तुम्हीहि चला ना!' बालकाचें हृदय किती सुंदर व निर्व्याज असतें.

"महात्मा गांधींच्या उपवासाच्या वेळीं तुरुंगांत जिकडे तिकडे चिंतेचें वातावरण निर्माण झालें. वर्तमानपत्रांतून ही बातमी आली. गांधीजींच्या प्रकृतीची बातमी मला तारेनें मिळावी असें मीं सरकारला लिहिलें. त्याप्रमाणें कांहीं मित्रांनाहि लिहिलें, त्याप्रमाणें तारा येऊं लागल्या. पण गुप्त पोलिसांच्या तपासणीमुळें मला २४ तासांनंतर त्या मिळत. पण त्यांतील मजकूर सरकारी पत्रकाप्रमाणें अगदीं मामुली असे व दुसऱ्या दिवशीं सकाळच्या "पाटणा डेली न्यूज" दैनिकांत तो वाचावयालाहि मिळत असे; त्यामुळें त्या तारांचा कांहीं उपयोग होत नसे. म्हणून मीं त्या बंद केल्या. एक दिवस अशी बातमी आली कीं, महात्माजींची प्रकृति अतिशयच बिघडली आहे व या बातमीमुळें सबंध शहरांत भयंकर खळबळ उडाली. आम्हांला तुरुंगांत ही बातमी कळली नव्हती. दुसऱ्या दिवशीं 'पाटणा डेली न्यूज' मध्यें आम्हीं वाचलें कीं, गांधी शेवटच्या दिव्यांतून वांचले, व त्यांची प्रकृति आतां सुधारण्याच्या मार्गाला लागली आहे. आम्ही परमेश्वराला धन्यवाद देत त्याची प्रार्थना केली. ईश्वराच्या कृपेनें अशुभ वेळ टळली. या दिव्यांतून ते पार पडले व त्यांचा उपास यशस्वी झाला. मात्र या प्रकरणीं ब्रिटिश सरकार व लॉर्ड लिन्‌लिथगो यांच्या निर्घृण राजनीतीचें पुरेपूर प्रदर्शन झालें.

"तुरुंगांतील जीवनक्रम एक प्रकारें शांतपणें चालत असतो. त्यांत क्वचितच एखादी महत्त्वाची घटना घडते. बाहेर जनता, सरकारी

अधिकारी, पोलीस, लष्कर, मॅजिस्ट्रेट इत्यादिकांचें काय चालू आहे यासंबंधीं आम्हांला जी बातमी मिळाली ती मात्र फारच भयंकर व अंगावर शहारे आणणारी होती. ती बातमी ऐकून मी आंतल्या आंत चूर होऊन गेलों व ती ऐकण्याशिवाय मी दुसरें कांहींच करूं शकत नव्हतों. जे नवे नवे वटहुकूम निघत होते त्यामुळें गोंधळ मात्र खूप उडत होता. राजकीय बाबतींतच नव्हे तर सामान्य मामुली गोष्टींतहि अत्यंत गैरव्यवस्था—बजबजपुरी—माजून राहिली होती. या ठिकाणीं मी दोन उदाहरणें देतों.

"आम्ही तुरुंगांत आल्यावर थोड्याच दिवसांनीं पाटणा जिल्ह्यांतल्या एका खेडेगांवांत जमिनीच्या बाबतींत तंटा होऊन मारामारी झाली व त्यांत एक माणूस ठार झाला. त्या काळांत पोलिसांना एखाद्या माणसाला शिक्षा करावयाची असेल तर ते त्याच्या गुन्ह्याला राजकीय स्वरूप देत आणि मग त्यांचें कार्य सहज साध्य होई. या खाजगी मारामारीलाहि त्यांनीं राजकीय स्वरूप दिलें. पोलिसांचें म्हणणें असें कीं, ज्या माणसाचा खून झाला तो सैन्यांत दाखल झाला होता आणि काँग्रेसचे लोक त्याला लष्करांत जाण्याला मनाई करीत होते. पण त्यानें न ऐकल्यामुळें त्याचा खून करण्यांत आला. हा खटला एका स्पेशल मॅजिस्ट्रेटपुढें सुनावणीस निघाला. त्यानें असा निकाल दिला कीं, ज्या माणसाचा खून झाला तो कधींच लष्करांत शिरला नव्हता म्हणजे लष्करभरती हें खुनाचें कारण होऊं शकत नाहीं. तथापि खुनाचें कारण कोणतेंहि असो, ज्याअर्थीं खून झाला आहे, त्याअर्थीं मी आठ इसमांना फांशीची शिक्षा देतों. वटहुकुमानुसार हा निकाल एका खास हायकोर्ट जज्जापुढें मंजुरीसाठीं ठेवण्यांत आला. त्यानें सात इसमांना दोषमुक्त ठरवून एकाची फांशी कायम केली. पुढें त्यानें प्रीव्ही कौन्सिलकडे अपील केलें, पण तेथेंहि त्याच्या विरुद्धच निकाल लागला. आम्ही तुरुंगांत असतांना जर कोणाला अपील करावयाचें असलें तर आम्ही त्याला

मदत करीत होतों. फांशी झालेल्या कैद्यांच्या वतीनें दयेची याचना करण्याचा अर्ज बहुतकरून मींच लिहीत असे. तुरुंगाधिकारी या कामीं विरोध करीत नसत. उलट एक दोन वेळां त्यांनींच माझ्याकडून दयेचा अर्ज लिहून घेतला होता. वरील खटल्यांतील कैद्याला फांशीची शिक्षा झाली होती व या एकंदर प्रकरणाला राजकीय रंग दिला गेल्यामुळेंच फांशीची शिक्षा सुनावण्यांत आली होती. मीं दयेचा अर्ज लिहिला. गव्हर्नरनें फांशी रद्द करून जन्मठेप शिक्षा दिली. आणि त्याचे प्राण वांचले. या बाबतींत आणखी एक विशेष सांगण्यासारखी गोष्ट म्हणजे पोलिसांनीं या प्रकरणाला राजकीय स्वरूप दिलें. ते गुन्हेगाराच्या पथ्यावरच पडलें. कारण १९४६ मध्यें जेव्हां कॉंग्रेस सरकार अधिकारारूढ झालें तेव्हां इतर राजकीय कैद्यांबरोबर हाहि कैदी सुटला. सुटल्यावर माझी भेट घेण्यासाठीं तो सदाकत आश्रमांत आला होता. या कैद्याप्रमाणेंच एका स्त्री गुन्हेगाराचा दयेचा अर्ज मीं गव्हर्नरकडे पाठविला होता. या बाईला फांशीची शिक्षा झाली होती, तथापि तिच्या अर्जाचा विचार होऊन तिला काळ्या पाण्याची शिक्षा मिळाली.

"दुसरा खटला लूटमारीचा होता. मात्र त्याला राजकीय रंग देण्यांत आला नव्हता. त्या काळांत साधे मामुली खटलेहि वटहुकुमाप्रमाणें चालविण्यांत येत असत. मॅजिस्ट्रेटांचे अधिकार वाढले होते. ते लांबलांब शिक्षा देऊं शकत होते. साठ वर्षांचा एक म्हातारा इसम होता. त्याच्या हातांत असा कांहीं दोष होता कीं, त्याच्या हातांचीं बोटें अर्धवट मिटलेलीं राहात. तो पायानें लंगडा असल्यामुळें त्याला नीट चालतांदेखील येत नव्हतें; मग पळण्याची बात दूरच. तो तुरुंगांत आजारी पडला. मी ज्या ठिकाणीं इस्पितळांत होतों त्या ठिकाणीं त्याला आणण्यांत आलें. ज्या खटल्यांत तो सांपडला तो खटला लुटालुटीसंबंधींचा होता. पाटणा—रांची रस्त्यावर एक गाडीवान आपल्या गाडींत तांदुळाचीं पोतीं भरून चालला होता. त्याच्यावर कांहीं दरोडे-

खोरांनीं हल्ला करून त्याचा तांदूळ लुटून नेला. त्यांनीं आपल्या पाठीवर पोतीं घेतलीं व ते शेतांतून पळून गेले. गाडीवाल्यानें जोर-जोरानें चोर चोर म्हणून आरडाओरड करण्यास सुरुवात केली. त्याबरोबर आजूबाजूचे लोक धांवून आले. सर्वांनीं दरोडेखोरांचा पाठलाग करावयाला सुरुवात केली. एक दीड मैल अंतरावर शेतांत पोतीं फेकून दरोडेखोर पळूं लागले, इतक्यांत लोकांनीं त्यांना धरलें. या लोकांत वर उल्लेखिलेला अष्टावक्रहि होता. तो आजारी असल्यामुळें पोलिसांनीं त्याला इस्पितळांत नेलें व त्याची जबानी घेऊन मॅजिस्ट्रेटनें सात वर्षांची शिक्षा ठोठावली. मी इस्पितळांतल्या वॉर्डच्या बाहेर आलों तों या माणसानें माझे पाय धरले व रडूं लागला. मीं त्याला अपील करायला सांगितलें. त्याप्रमाणें दर्खास्तहि लिहून दिली. त्याचा उपयोग होऊन तो हायकोर्टांत सुटला. न्यायाधीशानें त्याच्यावरचा आरोप हास्यास्पद ठरवला आणि माझीहि अशी खात्री झाली कीं या वटहुकुमा-च्यामुळें न्यायदेवता आंधळी झाली आहे. ज्या माणसाला दोन पावलें सरळ चालतां येत नाहीं, लंगडा आहे व ज्याचें वय साठाच्या वर आहे, असला माणूस दोन मण तांदुळाचें पोतें पाठीवर घेऊन दोन मैल पळूं शकेल काय? केवळ आंधळ्यालाच हें खरें वाटेल. वटहुकुमांच्या तावडींत सांपडलेल्या मॅजिस्ट्रेटलाहि वरील गोष्टी खऱ्या वाटून त्यानें त्याला सात वर्षांची शिक्षा ठोठावली होती.

"राजकीय खटल्यांच्याविषयीं बोलण्याची कांहीं जरुरीच नाहीं. पाटणा जिल्ह्याच्या कांहीं भागांत पावसाळ्यांत इतका भयंकर पाऊस पडतो कीं जिकडे तिकडे पाणीच पाणी होऊन जातें. कांहीं गांवांतून तर बाहेर पडावयाला नावेशिवाय दुसरें साधन नसतें. नेहमींच्या दिवसांत या खेड्यांत आठवड्यांतून एकदां डाकवाला येतो आणि पावसाळ्याच्या दिवसांत महिना दोन महिन्यांत एखादे वेळींच लोकांना टपाल मिळतें. अशा एका खेडेगांवांत कित्येक वर्षें छोट्या जमीनदारा-

बरोबर गांवकऱ्यांचें कांहीं भांडण चाललें होतें. १९४२ च्या आंदोलनाची संधि घेऊन त्या जमीनदारानें चळवळ केल्याच्या आरोपावरून गांवांतील प्रमुख लोकांना पोलिसांच्या हवाली केलें. राजकीय चळवळे म्हणून त्यांना बांकीपूर तुरुंगांत ठेवण्यांत आलें होतें. सेशन कोर्टाला इतकें काम होतें कीं १९४४ च्या जून–जुलैपर्यंत त्यांचा खटला पुढें आला नाहीं. दोन वर्षें लोक तुरुंगांत कुजत पडले होते. त्यांच्यावर मोठमोठे आरोप ठेवण्यांत आले होते. त्यांनीं ८ ऑगस्टच्या ठरावानुसार कॉंग्रेसच्या हुकुमाप्रमाणें आसपासच्या गांवांत ब्रिटिश सरकारचें राज्य उलथून टाकून कॉंग्रेस–राज्याची स्थापना केली, एकजण राजा झाला, दुसरा तर प्रधान, तिसरा सेनापति. या लोकांनीं राज्य चालविण्यासाठीं लोकांवर कर बसविले व जे लोक कर देणार नाहींत त्यांना फांशी किंवा जप्ती अशा शिक्षा सुनावण्यांत येत. अशा प्रकारचे भयंकर आरोप असलेले राजे, प्रधान व सेनापति आमच्याजवळ इस्पितळांत दाखल झाले होते. त्यांचा खटला चालला व सेशन्स जज्जानें निकाल दिला कीं, हा खटला अजीबात खोटेपणानें भरण्यांत आला आहे व त्यांच्यावरचे सर्व आरोप खोटे आहेत. हे सर्व लोक सुटले, पण त्यांना निष्कारण दोन वर्षें तुरुंगांत पडावें लागलें व खटल्यासाठीं बराच भुर्दंड भरावा लागला.

" ह्या असल्या अंदाधुंदींत राजकीय चळवळ्यांची काय गत झाली असेल तें सांगावयास नको. त्यांच्या शिक्षेबद्दल काय लिहूं ? किती लिहूं ? असेहि कांहीं लोक आहेत कीं, ज्यांना २५–२५ वर्षांची शिक्षा मिळाली आहे. कांहीं जणांच्या वांट्याला तर ५० वर्षांचा तुरुंगवास आला आहे. मग वर्ष दोन वर्ष सजेला काय महत्त्व ? पुष्कळांनीं आपल्या शिक्षेवर हायकोर्टांत अपील केलें. कांहींजण सुटले, कांहींची शिक्षा कमी झाली. मीं पुष्कळांना अपिलाच्या कामीं जी मदत करतां येईल ती भरपूर केली. ज्या लोकांची शिक्षा कायम झाली ते लोक

काँग्रेस सरकार अधिकारावर आल्यावर सुटले. पण ज्या लोकांना फांशी देण्यांत आलें त्यांना जर काळ्या पाण्याची किंवा दुसरी एखादी शिक्षा देण्यांत आली असती तर काँग्रेसच्या राजवटींत तेहि सुटले असते. पण दुर्दैव !"

## बाबूजींचें ग्रंथलेखन

१९४४ च्या मे महिन्यांत महात्मा गांधींची आकस्मिक सुटका झाली व १९४५ च्या १५ जूनला वर्किंग कमिटीचे सर्व सभासद सुटले. त्याच दिवशीं, १०४१ दिवसांच्या कारागृहवासानंतर राजेंद्रबाबूंची मुक्तता झाली. तुरुंगांत असतांना देशांत चाललेली जाळपोळ, मोडतोड, हिंसाचार, वगैरे विविध प्रकारचीं कृत्यें त्यांच्या कानावर येत होतीं व बंगालच्या भयंकर दुष्काळाच्या वार्ताहि त्यांना वाचावयास मिळत होत्या. पण कोणत्याहि बाबतींत ते कांहींहि करूं शकत नव्हते. तुरुंगांतून बाहेर आल्यावर मौ. आझाद, पं. जवाहरलाल नेहरू व म. गांधी यांनीं कांहीं अपवाद सोडून ऑगस्ट क्रांतीची ज्याप्रमाणें मुक्त-कंठानें प्रशंसा केली, त्याप्रमाणें राजेंद्रबाबूंनींहि क्रांतिवाद्यांना धन्यवाद दिले. ९ ऑगस्ट रोजीं काँग्रेस पुढाऱ्यांना अटक झाल्यानंतर रूळ उखडणें, तारा तोडणें वगैरे प्रकारचीं घातपाती कृत्यें अहिंसेला सोडून नाहींत असे जे लेख काका कालेलकर व किशोरलाल मश्रूवाला 'हरिजन'-मधून लिहीत होते त्या लेखांप्रमाणेंच जवळजवळ राजेंद्रबाबूंचीं मतें होतीं व ८ ऑगस्टपूर्वीं वर्ध्यास असतांना त्यांनीं म. गांधींच्याकडून आपल्या मतावर शिक्कामोर्तब करून घेतलें होतें.

या १०४१ दिवसांच्या तुरुंगवासांत पं. नेहरूंनीं ज्याप्रमाणें 'भारताचा शोध' हा ग्रंथ लिहिला, त्याप्रमाणें डॉ. राजेंद्रप्रसाद यांनीं 'द्विखंड भारत' या ग्रंथाची रचना केली. हा ग्रंथ लिहिण्यास ते कां प्रवृत्त झाले यासंबंधींचा इतिहास त्यांच्याच तोंडून ऐकल्यास अधिक इष्ट होईल.

ते म्हणतात, "मी पहिल्याप्रथम पाकिस्तानसंबंधींचें वाङ्मय वाचूं लागलों. तें जसजसें वाचूं लागलों तसतसा माझ्या मनांत विचार आला कीं या विषयाचा अधिकाधिक अभ्यास करावा. त्याप्रमाणें ज्या पुस्तकांत पाकिस्तानचें समर्थन आहे अशीं पुस्तकें मागविलीं. त्यांचें मननपूर्वक वाचन केल्यावर असे विविध प्रश्न उद्भवूं लागले कीं, कोणत्या आधारावर ही पाकिस्तानची मागणी केली जात आहे? पाकिस्तान म्हणजे काय? पाकिस्तान आपल्या पायावर स्वतंत्रपणें उभें राहूं शकेल काय? या प्रश्नांचीं उत्तरें देण्यासाठीं व सबंध देशापुढें आपलीं मतें मांडण्यासाठीं मीं सविस्तर पुस्तक लिहिण्याचें ठरविलें. मीं असा निश्चय केला कीं, मी जर आपले विचार ग्रंथरूपानें देशापुढें ठेविले तर या मागणींतली अव्यवहार्यता लोकांना कळून येईल. पाकिस्तान अव्यावहारिक आहे असें सिद्ध करणारा भाग लिहिल्यावरहि मला असें लिहिणें भाग पडलें कीं, हिंदुस्थानांत हिंदु व मुसलमान अशीं दोन राष्ट्रें आहेत. म्हणून त्यांचे दोन भाग करून दोन स्वतंत्र राष्ट्रें निर्माण करणें अधिक योग्य होईल."

तुरुंगांत राजेंद्रबाबू अशा प्रकारचें पुस्तक लिहीत आहेत ही बातमी बाहेर कोणींतरी प्रसिद्ध केली. ती वाचून तुरुंगाचे सुपरिंटेंडेंट त्यांच्याकडे आले व कसलें पुस्तक आहे म्हणून त्यांनीं पृच्छा केली. राजेंद्रबाबूंनीं कागदाच्या दोन्ही बाजूंनीं अगदीं बारीक अक्षरांत लिहिलेलें हस्तलिखित दाखविलें व हें छापणार काय असें सुपरिंटेंडेंटनें विचारतां ते म्हणाले, सरकारनें परवानगी दिल्यास तें छापण्याची इच्छा आहे. पण असलें हस्तलिखित सरकारी अधिकाऱ्यांना वाचतां येणें अशक्य असल्यामुळें ते टाइप करून घेण्याची परवानगी मिळाली व १४ जून १९४५ रोजीं, सुटण्याच्या आधले दिवशीं रात्रीं, हें टाइप करण्याचें काम पुरें झालें व सरकारी परवानगीनें हें टंकलिखित त्यांना दुसऱ्या दिवशीं आपल्याबरोबर बाहेर आणतां आलें. १९४६ च्या जानेवारींत हें

'द्विखंड भारत' (India Divided) पुस्तक प्रसिद्ध झालें एक महिन्याच्या आंत पहिली आवृत्ति खलास झाली व चार महिन्यांनीं दुसरी निघाली. तीहि थोड्या दिवसांतच संपली. यावरून ह्या पुस्तकाचा विषय जनतेला किती जिव्हाळ्याचा वाटत होता याची कल्पना येईल.

या ग्रंथाशिवाय बाबूजींनीं आपल्या आत्मकथेचा बराचसा भाग या कारागृहवासांत लिहिला. ही आत्मकथा त्यांनीं इंग्रजींत न लिहितां मुद्दाम हिंदींतच लिहिली आहे. त्यांच्या नेहमींच्या संवयीप्रमाणें ते पहाटे ४ वाजतां जागे झाले म्हणजे हें आत्मचरित्र लिहूं लागत. त्यासाठीं त्यांच्याजवळ कोणतीच साधनसामुग्री नव्हती, पत्रव्यवहार नव्हता कीं रोजनिशा नव्हत्या. रोजनिशी लिहिण्याची त्यांना कधींच संवय नव्हती, त्यामुळें केवळ स्मरणशक्तीवर भिस्त ठेवून त्यांनीं आपलें लेखन चालविलें. तुरुंगांतून सुटण्यापूर्वीं या आत्मकथेचा भाग रामगड काँग्रेसपर्यंत येऊन पोंचला होता. पुढचा भाग त्यांनीं जुलै १९४६ मध्यें लिहिला व पुस्तक पुरें केलें. ६५० पानांचें व १६१ प्रकरणांचें हें आत्मचरित्र १९४७ च्या जानेवारींत पाटण्याच्या 'साहित्यसंसार' प्रकाशनसंस्थेनें प्रसिद्ध केलें. त्याला सरदार वल्लभभाई पटेल यांची प्रस्तावना असून त्याची किंमत १२ रु. आहे. 'प्राक्कथनांत' सरदार म्हणतात: "१९१८ च्या खेडा सत्याग्रहाच्या लढ्याच्या वेळीं बाबूजींची पहिली भेट झाली त्या वेळी राजेंद्रबाबूंच्या संबंधीं माझ्या मनांत जें आकर्षण उत्पन्न झालें व आमच्या दोघांमध्यें जो प्रेमरज्जु निर्माण झाला त्यामुळेंच मी हें काम करावयास तयार झालों. श्रीराजेंद्रबाबूंना पाहतांच आपल्या मनावर त्यांच्या सरलतेचा व नम्रतेचा जो छाप पडतो त्याचें प्रतिबिंब या आत्मकथेच्या पानोपानीं पडलेलें आहे. हें पुस्तक जो कोणी वाचील त्याला आपलें जीवन उन्नत करण्याची स्फूर्ति मिळेल."

# ७ : हिंदुस्थान स्वतंत्र झाला !

महात्मा गांधींनीं १९४२ चा लढा समाप्त झाल्याचें जाहीर केल्यानंतर १९४५ च्या मे महिन्यांत युरोपांतील महायुद्धहि संपत आलें. त्यामुळें हिंदुस्थानचा प्रश्न सोडविण्याची जरूरी ब्रिटिश मंत्रिमंडळाला वाटूं लागली व नवे व्हाईसरॉय लॉर्ड वेव्हेल यांच्या मुखानें १४ जून १९४५ रोजीं एक जाहीर घोषणा करण्यांत आली. या घोषणेनुसार काँग्रेस वर्किंग कमिटीचे सर्व सभासद मुक्त करण्यांत आले व नवें लोकनियुक्त मध्यवर्ती सरकार स्थापन करण्याचा विचार करण्यासाठीं सिमला येथें सर्वपक्षीय पुढाऱ्यांची बैठक भरली. या बैठकीस म. गांधीहि हजर होते. बरेच दिवस विचार—चर्चा होऊन मुस्लीम लीगच्या आडमुठेपणामुळें ही सिमला परिषद अखेर यशस्वी झाली नाहीं, हें सांगावयास नकोच. व्हाईसरॉयच्या कार्यकारी मंडळाची वाढ करून त्यांत ५ सवर्ण हिंदु, ५ मुसलमान, २ हरिजन व ३ इतर असे १५ प्रतिनिधि नेमण्यांत येतील असें सरकारनें सुचविलें. पण या जातवारीमुळें या परिषदेंतून कांहींच निष्पन्न होण्याचें चिन्ह न दिसल्यामुळें ही परिषद फिसकटली. काँग्रेसतर्फे प्रथम जीं पांच नांवें सुचविण्यांत आलीं होतीं त्यांत पं. नेहरू व पटेल यांच्याप्रमाणें राजेंद्रबाबूंचेंहि नांव होतें, पण भुलाभाईंचें नव्हतें, हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे.

सिमला परिषदेचा हा बार फुसका ठरला तरी १९४६ च्या मार्चमध्यें प्रांतिक कायदेमंडळांच्या सार्वत्रिक निवडणुका झाल्या व पुन्हा ७ प्रांतांत कॉंग्रेस मंत्रिमंडळें अधिकारारूढ झालीं. क्रिप्स योजनेनंतर वेव्हेल योजना वांझोटी ठरल्यामुळें ब्रिटिश त्रिमंत्र्यांचें एक शिष्टमंडळ मार्चमध्यें हिंदुस्थानांत येऊन दाखल झालें व त्यानें १६ मे रोजीं आपली योजना जाहीर केली. या योजनेंत हंगामी मंत्रिमंडळ, घटनापरिषद, संघराज्य वगैरे अनेक गोष्टी असल्यामुळें अनेक वाटाघाटींनंतर कॉंग्रेसनें ही त्रिमंत्रियोजना स्वीकारण्यास संमति दिली व २ सप्टेंबर १९४६ रोजीं पं. नेहरूंच्या नेतृत्वाखालीं राष्ट्रीय सरकार किंवा हंगामी मंत्रिमंडळ स्थापन झालें. या मंत्रिमंडळांत नेहरू, पटेल, राजेंद्रबाबू यांच्याशिवाय राजगोपालाचारी, असफअली, बलदेवसिंग, डॉ. मथाई, शरच्चंद्र बोस इत्यादिकांचा समावेश झाला होता.

कॉंग्रेसनें मध्यवर्ती सरकारच्या हंगामी मंत्रिमंडळांत भाग घ्यावा असें जेव्हां २७ ऑगस्ट १९४६ रोजीं वर्किंग कमिटीनें म. गांधींच्या सल्ल्यानें निश्चित केलें तेव्हां ती एक मोठी अघटित घटना घडून आली असें म्हणण्यास हरकत नाहीं. कारण तोंपर्यंत कॉंग्रेस ही सरकारच्या दृष्टीनें बंडखोर संस्था होती व तिच्या हातीं यापुढें देशाची संस्था येणार होती. आजपावेतों कॉंग्रेसनें असहकारिता, सत्याग्रह, कायदेभंग इत्यादि विविध चळवळी केल्या होत्या, पण राज्यशासनाचें विधायक असें कोणतेंच कार्य केलें नव्हतें. त्यामुळें कॉंग्रेसनें हंगामी मंत्रिमंडळ बनविण्याचें ठरवितांच हें काम आपल्या हातून कसें काय पार पडणार याबद्दल अनेकांना चिंता वाटूं लागली. संकल्पित मंत्रिमंडळांतील एक मंत्री डॉ. राजेंद्रप्रसाद यांच्याहि मनांत थोडा संदेह उत्पन्न झाला. आपल्या मनांतील या संकुलावस्थेचें वर्णन राजेंद्रबाबू पुढील शब्दांत करतात :

"गेलीं २६ वर्षे रात्रंदिवस कॉंग्रेसचें काम करण्यांत गेलीं. घरीं आजारी पडूनहि बरेच दिवस होतों. ज्येष्ठ बंधूंच्या मृत्यूनंतर कांहीं

दिवस घराकडे लक्ष देणें भाग पडलें. तोंपर्यंत घराच्या व्यवस्थेपासून मी अलिप्तच होतों. स्वतःच्या राहण्यासाठीं मीं कांहीं निराळी व्यवस्था कधींच केली नाहीं. जेव्हां आश्रमांत राहात होतों तेव्हां माझ्याबरोबर माझे मित्र होते. पाटण्याला आलों म्हणजे मृत्युंजयच्या बिऱ्हाडीं चार दोन दिवस राहात असे. अशा प्रकारें एकाच प्रकारचें जीवन मीं व्यतीत केलें. कचेरींत बैठक मांडून मीं कधींच काम केलें नाहीं. पाटणा म्युनिसिपालिटीचा अध्यक्ष या नात्यानें कांहीं दिवस कचेरींचें काम करावें लागलें. पण तो अनुभव इतका थोडा व थोड्या दिवसांचा होता कीं तो जमेसहि धरतां येणार नाहीं. कॉंग्रेसच्या चिटणीसपदाचें काम करण्याचा माझ्यावर प्रसंग आला, पण कचेरीकामापेक्षां जनतेंत जाऊन मिसळण्याचें, जनतासंपर्काचें काम मीं अधिक केलें. आणि सर्वांना ठाऊकच आहे कीं, हें काम म्हणजे अगदीं वेगळ्या प्रकारचें आहे. आतां अगदीं नव्या प्रकारच्या जीवनांत मला प्रवेश करावयाचा आहे. पहिल्याप्रथम मला स्वतःसाठीं एक स्वतंत्र घर केलें पाहिजे, आणि त्यांत राहण्याची व जेवणाखाण्याची व्यवस्था केली पाहिजे. आतां वेतन म्हणून कांहीं तरी द्रव्यप्राप्ति होणारच. या बाबतींत कॉंग्रेसकडून कोणता आदेश मिळणार याची कल्पना नाहीं. आम्हांला किती पैसे मिळणार व आम्हीं ते कसे खर्च करावे हें अजून कळलें नाहीं."

मुस्लीम लीगनें तत्पूर्वी १६ ऑगस्ट रोजीं 'प्रत्यक्ष प्रतिकार' दिन जाहीर करून देशांत अमानुष अत्याचार केले होते व माणुसकीला काळिमा फासणारी गुंडगिरी केली होती. मुस्लीम लीगच्या म्हणजे बॅ. जीनांच्या या धोरणामुळें मध्यवर्ती हंगामी सरकारांत लीगनें भाग घेण्याचें नाकारलें व अखेर या गुंडागिरीचा परिणाम हिंदुस्थान द्विखंड होण्यांत झाला.

मुस्लीम लीगनें असहकार पुकारला तरी निमंत्रियोजनेप्रमाणें ता. ९ डिसेंबर १९४६ रोजीं दिल्ली येथें घटना परिषद भरली. या परिषदेचें

अध्यक्ष म्हणून डॉ. राजेंद्रप्रसाद यांची एकमतानें निवड करण्यांत आली. हिंदी राष्ट्राच्या उद्दिष्टाचा ठराव पं. नेहरूंनीं मांडला व प्रचंड बहुमतानें तो मंजूर झाल्यामुळें घटना परिषदेनें आपलें ध्येय साध्य केलें असें म्हणण्यास हरकत नाहीं. स्वतंत्र सार्वभौम प्रजासत्ताक राज्याची घोषणा घटना परिषदेनें केली व हिंदी राष्ट्राची घटना बनविण्यासाठीं एक समितीहि नेमली.

पण हा पल्ला गांठीपर्यंत देशांत अनेक घडामोडी झाल्या व राष्ट्राचें भवितव्य एकदम बदललें. घटना समितीचें कार्य अत्यंत यशस्वीपणें चालल्यामुळें २१ फेब्रुवारी १९४७ रोजीं ब्रिटिश मुख्य प्रधान ॲटली यांनीं घोषणा केली कीं जून १९४८ पर्यंत हिंदी राष्ट्राला संपूर्ण स्वातंत्र्य देण्यांत येईल. ही घोषणा म्हणजे हिंदी राष्ट्राच्या स्वातंत्र्याची ललकारीच होय. या घोषणेनुसार शेवटचे व्हाईसरॉय लॉर्ड माउंटबॅटन यांनीं द्विखंड हिंदुस्थानची योजना आंखून हिंदुस्थान व पाकिस्तान अशीं दोन स्वतंत्र राष्ट्रें बनविण्याचा आपला मनोदय जाहीर केला. बॅ. जीनांच्या व मुस्लीम लीगच्या अत्याचारी राजनीतीचा कॉँग्रेस पुढाऱ्यांना वीट आलेला होता व जातीयतेचीं कटु फळें जनतेच्या अनुभवास आलीं होतीं, त्यामुळें माउंटबॅटनची योजना हिंदी राष्ट्राच्या फाळणीवर आधारलेली होती तरी संपूर्ण स्वातंत्र्याच्या ध्येयप्राप्तीसाठीं म. गांधी व कॉँग्रेस पुढारी यांनीं एकमतानें नाइलाजास्तव तिचा स्वीकार केला. अशा प्रकारें ता. १५ ऑगस्ट रोजीं हिंदुस्थान दास्यमुक्त होऊन स्वतंत्र झाला.

मध्यंतरीं घटना परिषदेपूर्वीं २३ नोव्हेंबर १९४६ रोजीं मीरत येथें कॉँग्रेसचें ५४ वें अधिवेशन आचार्य कृपलानी यांच्या अध्यक्षतेखालीं भरलें होतें. १५ ऑगस्टनंतर हिंदुस्थान स्वतंत्र झाल्यावर पं. नेहरूंचें मंत्रिमंडळ अधिकारारूढ झालें. त्यांत अन्नमंत्री म्हणून डॉ. राजेंद्रप्रसाद यांची नेमणूक झाली होती. देशाची सत्ता हातीं घेतल्यानंतर हें मंत्रिमंडळ कॉँग्रेसचें राहिलें नव्हतें. त्यामुळें कॉँग्रेसचे अध्यक्ष आचार्य

कृपलानी यांना आपलें अधिकारक्षेत्र अधिक विस्तृत आहे असें वाटूं लागलें व या संघर्षांतून अखेर कृपलानींनीं अध्यक्षपदाचा राजीनामा दिला. अशा अडचणींच्या व विरोधाच्या प्रसंगीं नेहमींप्रमाणें अजातशत्रु डॉ. राजेंद्रप्रसाद यांची कॉंग्रेसचे अध्यक्ष म्हणून २६ नोव्हेंबर १९४७ रोजीं ऑल इंडिया कॉंग्रेस कमिटीनें एकमतानें निवड केली. पूर्वी सुभाषबाबूंच्या राजीनाम्यानंतर राजेंद्रबाबूंकडेच हें पद आलें होतें, आतां कृपलानींच्या राजीनाम्यामुळें त्यांना चालचलाऊ अध्यक्षपद स्वीकारण्याची पुन्हा पाळी आली. या अध्यक्षपदासाठीं राजेंद्रबाबूंना आपल्या मंत्रिपदाचा राजीनामा द्यावा लागला आणि त्यांना कोणत्याच स्थानाचा लोभ नसल्यामुळें कर्तव्य म्हणून त्यांनीं कॉंग्रेसचें अध्यक्षत्व स्वीकारलें. कॉंग्रेस व सरकार यांच्यामधील दुवा या नात्यानें त्यांनीं ताबडतोब सलोख्याचें वातावरण निर्माण केलें.

राजेंद्रबाबूंच्या अध्यक्षपदाच्या कारकीर्दींत घडलेली पहिली महत्त्वाची गोष्ट म्हणजे राष्ट्रजनक महात्मा गांधी यांचा ता. ३० जानेवारी १९४८ रोजीं झालेला अमानुष खून. जगांतल्या या थोर पुरुषाच्या हत्येमुळें हिंदी राष्ट्रच काय, पण सबंध जग हळहळलें. महात्मा गांधींच्या निधनामुळें हिंदुस्थानचें जें नुकसान झालें तें कधींहि भरून निघणें शक्य नाहीं. पण त्यांची स्मृति देशाला सदैव मार्गदर्शक व्हावी म्हणून त्यांचें स्मारक करण्यासाठीं डॉ. राजेंद्रप्रसाद यांच्या अध्यक्षतेखालीं एक अखिल भारतीय स्मारक समिति नेमण्यांत आली व तिनें ५० कोटी रुपये जमवावे असें ठरलें.

# ८ : विविध क्षेत्रांतील कामगिरी

डॉ. राजेंद्रप्रसाद हे नुसते राजकीय पुढारी नसून त्यांचें जीवन अनेकांगी आहे. त्यामुळें राजकारणाव्यतिरिक्त त्यांनीं इतरहि अनेक क्षेत्रांत जें कार्य केलें आहे, त्याची माहिती या ठिकाणीं देत आहें.

चम्पारण्य हा बिहार ओरिसा प्रांतांतील एक जिल्हा आहे. चम्पारण्य हा गंगा नदीच्या पैलतीरीं थेट हिमालयाच्या पायथ्याशीं नेपाळच्या शेजारीं असलेला मुलूख आहे. मोतीहारी हें त्याचें मुख्य शहर. चम्पारण्य म्हणजे जनक राजाची भूमि. चंपारण्यांत ज्याप्रमाणें आंब्याचीं बनें आहेत, त्याप्रमाणें १९१७ सालीं तेथें निळाचीं शेतें होतीं. चम्पारण्यांतील शेतकऱ्यांनीं आपापल्या जमिनीच्या तीन विसांश भागामध्यें जमिनीच्या मूळ मालकासाठीं निळाचीच लागवड केली पाहिजे, असें कायद्याचें बंधन होतें. याला 'तीन कठिया' असें नांव होतें. तिकडे वीस कठांचा एक एकर होतो, व एकरी तीन कठांचीं लागवड करणें याचें नांव 'तीन काठियांचा रिवाज.' दर बिघ्यामागें २०० ते ३५० रुपयांची नीळ पिके, पण शेतकऱ्याला त्यांपैकीं फक्त १४ ते २० रुपयेच मिळत. सरकारधारा या रकमेंतूनच कापून घेण्यांत येई. निळीच्या उत्पादनांत शेतकऱ्याला दर बिघ्यामागें ४० ते ६० रुपये खर्च येई. म्हणजे एकंदरींत शेतकऱ्याला निळीच्या लागवडींत दर

एकरीं १२० ते १३५ रुपये नुकसान येई. मळेवाला दरवर्षी तीन काठ्या जागा निळीच्या लागवडीसाठीं निश्चित करी. ह्या जमिनींत दरवर्षी दोन दोन पिकें येत. पण ह्या राखून ठेवलेल्या जागेंत शेतकऱ्याला स्वतःचें निराळें पीक काढण्याची मनाई असे. परंतु त्याबद्दल शेतकऱ्याला कांहींच नुकसानभरपाई मिळत नसे. दहा अकरा वर्षे वयाच्या कोंवळया मुलांना वेठीस धरण्यांत येई. इजारदार व मुकादम स्त्रियांना जबरदस्तीनें कामावर नेत. आणि ह्या सगळ्यांना सकाळीं ७ ते संध्याकाळीं ७ पर्यंत कामावर राबवीत. ह्या जुलुमामुळें किती तरी लोक आपली जन्मभूमि सोडून नेपाळच्या हद्दींत जाऊन राहिले होते. त्यांच्याकडून जबरदस्तीनें सारा वसूल करण्यांत येई. मळेवाले रयतेकडून तूप, दूध व दहीं हक्कानें घेत. तुपाबद्दल दर शेरीं दोन आणे देत. आणि दहींदुधाला तर किंमतच नसे! मळ्यावरील अधिकाऱ्यांच्या जुलूमजबरदस्तीच्या सामान्य गोष्टींविषयीं तर बोलावयासच नको!

महात्मा गांधींचा चंपारण्यांत प्रवेश होण्यापूर्वी ही चम्पारण्याची स्थिति होती. बिहारच्या पुढाऱ्यांनीं १९१६ च्या लखनौ कॉंग्रेसपुढें चंपारण्याची ही कहाणी निवेदन केली होती व कॉंग्रेसनें चम्पारण्याची दाद घ्यावी, अशी कॉंग्रेसला विनंति केली होती. कॉंग्रेसनें त्याप्रमाणें सहानुभूतीचा ठराव केला. पण तेवढ्यानें कांहीं कार्य होण्यासारखें नव्हतें. खुद्द चम्पारण्यांत हिंडून तेथील परिस्थिति नजरेखालीं घालणें अत्यंत जरूर होतें. बिहारचे पुढारी ब्रजकिशोर बाबू, राजकुमार शुक्ल, बाबू राजेंद्रप्रसाद वगैरेंनीं महात्मा गांधींचें मन वळवून बिहारची समक्ष पाहणी करण्याचें त्यांच्याकडून आश्वासन मिळविलें. त्याप्रमाणें १९१७ सालच्या प्रारंभीं गांधीजी कलकत्त्याहून निघून थेट पाटण्याला आले. पाटण्याला राजेंद्रबाबूंशिवाय महात्मा गांधी कोणीकडे उतरणार? महात्माजी थेट राजेंद्रबाबूंच्या घरीं गेले. पण बाबूजी घरीं नव्हते. तरी- म. गांधीजींची त्यांच्या घरीं सोय करण्यांत आली. दुसरे दिवशीं राजेंद्रबाबू

आलें. पहिल्याप्रथम शेतकऱ्यांच्या स्थितीची चौकशी करावयाची असल्यामुळें महात्माजींनीं चंपारण्याच्या अंतर्भागांत प्रवेश करण्याचें ठरवून ते मोतीहारीला निघाले. त्यांच्या बरोबर बिहारी पुढारीहि होते.

महात्मा गांधींनीं चौकशीला सुरुवात केली. जनतेनें त्यांच्यावर आपल्या कृपेचा व प्रेमाचा वर्षाव करून त्यांचें कार्य अगदीं सुलभ केलें. उलट सरकारनें त्यांच्या कामांत पदोपदीं व्यत्यय आणून त्यांना अटक करण्याचीहि तयारी दाखविली. पण गांधीजींचें हें कार्य म्हणजे 'सत्य व अहिंसा यांचा महान् प्रयोग' असल्यामुळें अखेर सरकारला गांधीजी-पुढें नमावें लागून चौकशी कमिटी नेमावी लागली. चौकशी कमिटीनें शेतकऱ्यांच्या सर्व तक्रारी रास्त ठरविल्या आणि निळीच्या मळेवाल्यांनीं गैरवाजवी रीतीनें घेतलेल्या पैशापैकीं अमुक इतका भाग परत करावा व तीन कठियांचा कायदा रद्द करण्यांत यावा अशी शिफारस केली. ह्या शिफारशीप्रमाणें बिहार सरकाला वागणें भाग पडलें व सरकारनें तत्संबंधीं कायदा करून या शिफारशींचा संपूर्ण अंमल केला.

अशा प्रकारें शंभर वर्षांपासून चालत आलेला तीन कठियांचा कायदा मोडून पडला व त्याबरोबर निळीच्या कारखानदारांचें राज्य लयाला गेलें. जो रयतवर्ग सदाचा दबलेला होता त्याला स्वतःच्या शक्तीची जाणीव झाली. महात्मा गांधींनीं चंपारण्यांत शिक्षणाचें व आरोग्याचें विधायक कार्य सुरू केल्यामुळें तर चंम्पारण्याचें अभूतपूर्व रूपांतर झालें. महात्माजींच्या या समाजसेवेच्या कार्यक्रमामुळें त्यांनीं केवळ बिहारमध्यें नव्हे, तर सबंध हिंदुस्थानांत लोकसेवेचें चैतन्यमय वातावरण निर्माण केलें.

महात्मा गांधींच्या चंपारण्यांतील कार्यांत बाबू व्रजकिशोरप्रसाद व बाबू राजेंद्रप्रसाद यांनीं जी कामगिरी केली तिचा प्रामुख्यानें उल्लेख केला पाहिजे. समाजसेवा, समाजसुधारणा व समाजसंघटना या विधायक कार्यक्रमाचे धडे राजेंद्रबाबूंनीं महात्माजींपासून घेतले. राजेंद्रबाबूंची या

कार्यांत केवढी मदत झाली, यासंबंधीं महात्माजींनीं आपल्या 'आत्मकथेंत' पुढील उद्गार काढले आहेत : "व्रजकिशोरबाबू व राजेंद्रबाबू हीं तर एक अद्वितीय जोडी होती. त्यांच्याखेरीज मला एकहि पाऊल पुढें टाकतां येऊं नये, इतकें त्यांनीं आपल्या प्रेमानें मला अपंग बनवून टाकलें होतें."

महात्मा गांधींची व राजेंद्रबाबूप्रभृति यांच्या सहकाऱ्यांची चंपारण्यांत कशा प्रकारची राहणी होती, यासंबंधीं गांधीजी, आत्मकथेंत' लिहितात: "आरंभकाळची आमची राहणी विचित्र होती, व मला तर तो रोजच्या रोज विनोदाचा विषय होऊन बसला होता. वकीलमंडळींपैकीं प्रत्येकाबरोबर आचारी नोकर असायचे; प्रत्येकाचा स्वयंपाक स्वतंत्र व्हावयाचा. रात्रींचे बारा बारा वाजतांहि जेवीत असावयाचे. हे महाशय राहात आपापल्या खर्चानेंच; तरी पण मला या राहणीचा उपद्रवच वाटे. माझ्यामध्यें व माझ्या सोबत्यांमध्यें स्नेहगांठ इतकी मजबूत बांधली गेली होती कीं, आमच्यामध्यें गैरसमज होण्याचा संभव नव्हता. ते माझे वाग्बाण प्रेमानें सहन करीत. शेवटीं असें ठरलें कीं नोकरांना रजा द्यावी, सर्वांनीं एकत्र जेवावें व जेवणांत नियमियपणा पाळावा. सर्वच जण शाकाहारी नव्हते; दोन भोजनगृहें चालवावयाचीं तर खर्च वाढणार; त्यासाठीं निर्मांस भोजन तयार करून एकत्र भोजनगृह चालवावयाचें असा ठराव झाला. भोजनसुद्धां साधें ठेवण्याबद्दल कटाक्ष होता. त्यामुळें खर्चाची पुष्कळ बचत झाली, काम करण्याची शक्ति वाढली व वेळहि वांचला."

'चम्पारण्यांतील सत्याग्रह' या नांवाचें सुमारें तीनशें पानांचें एक पुस्तक राजेंद्रबाबूंनीं १९१८ सालीं हिंदींत लिहिलें आहे. या पुस्तकांत चम्पारण्याचा व चम्पारण्यांतील कार्याचा सांगोपांग इतिहास दिला असून ज्याला चम्पारण्यासंबंधीं माहिती हवी असेल त्यानें हें पुस्तक वाचल्याखेरीज राहूं नये.

## शिक्षणकार्य

राजेंद्रबाबूंचें राष्ट्रकार्य इतकें सर्वांगीण आहे कीं, त्यांत केवळ राजकारणाचाच समावेश होतो असें नाहीं, तर त्यांतच राष्ट्रीय शिक्षण, विद्यार्थिसंघटन, साहित्यसेवा, ग्रामोद्धार, खादीकार्य वगैरेंनाहि महत्त्वाचें स्थान आहे. बिहारमध्यें राष्ट्रीय विद्यापीठ स्थापन करण्यांत राजेंद्रबाबूंनीं जितके परिश्रम घेतले, तितकेंच किंवा त्याहून अधिक त्यांनीं पाटणा युनिव्हर्सिटीच्या बाबतींत घेतले. १९१३ सालीं जेव्हां पाटणा युनिव्हर्सिटी स्थापन झाली तेव्हां तिची घटना कोणालाच पसंत पडली नाहीं. बिहारच्या पूर्वसंस्कृतीला व एकंदर बिहारी मनोरचनेला अनुकूल असा शिक्षणक्रम आंखण्यांत आला पाहिजे, अशा प्रकारची चळवळ करण्यांत राजेंद्रबाबूंनीं पुढाकार घेतला. सरकारनें या विरोधाकडे लक्ष न देतां आपलें काम तसेंच चालविलें, पण राजेंद्रबाबू स्वस्थ बसले नाहींत. त्यांनीं बिहारप्रांतीय राजकीय असोसिएशनतर्फे जोराची चळवळ आरंभिली. कौन्सिलांताहि त्यांनीं खटपट चालविली. राजेंद्रबाबूंच्या या सर्व चळवळींचा असा सुपरिणाम झाला कीं अखेर १९१७ सालीं राजेंद्रबाबूंच्या सर्व दुरुस्त्या मान्य करण्यांत येऊन युनिव्हर्सिटीच्या सुधारणेचा कायदा पसार झाला. राजेंद्रबाबूंच्या या पुढाकारामुळें युनिव्हर्सिटींत त्यांना मोठे मानाचें स्थान प्राप्त झालें. ते सेनेटचे व सिंडिकेटचे सभासद तर झालेच, शिवाय ज्या निरनिराळ्या कमिट्या वेळोवेळीं नेमण्यांत आल्या, त्यांचे सल्लागार म्हणून दर वेळीं त्यांचीच निवडणूक होत असे. राजेंद्रबाबूंचें युनिव्हर्सिटींतील सर्वांत महत्त्वाचें कार्य कोणतें असेल तर शिक्षणाच्या माध्यमासंबंधींचें होय. युनिव्हर्सिटींत देशी भाषांना माध्यमाचें स्थान मिळालें पाहिजे, असा त्यांचा पहिल्यापासून आग्रह होता. त्यांच्या परिश्रमामुळें अखेर त्यांची माध्यमाची सूचना मंजूर झाली व युनिव्हर्सिटींत देशी भाषांचें राज्य सुरू झालें.

अनुक्रमांक
विभाग

असहकारितेच्या ऐन अमदानींत राजेंद्रबाबूंनीं राष्ट्रीय विद्यापीठ स्थापन केलें. पण त्यापूर्वीं चार वर्षे राष्ट्रीय शिक्षणसंस्था काढण्याचा त्यांचा विचार चालला होता. देशसेवा, स्वार्थत्याग, राष्ट्रीयत्व इत्यादि गुणांचा ज्या संस्थेंत आविष्कार होईल अशी शिक्षणसंस्था स्थापन करण्याचा त्यांचा मानस होता व वकिली सोडून अशा संस्थेला आजन्म वाहून घेण्याचाहि त्यांचा निश्चय झाला होता. १९४७ सालीं त्यांनीं संस्थेची सुरुवात म्हणून एक कॉलेज काढण्याचें ठरविलें व संस्थेसाठीं फंड जमविण्यास सुरुवात केली. राजेंद्रबाबूंची ही कल्पना पुष्कळांना पटली व त्यांच्या संस्थेंत स्वार्थत्याग करून अध्यापक होण्यासहि कित्येकांनीं मान्यता दिली. याच सुमारास महात्मा गांधींचें व त्यांचें बोलणें झालें. गांधीजींना त्यांचा विचार पटला, पण ह्या संस्थेचा सरकारशीं कोणत्याहि प्रकारचा संबंध ठेवूं नये, असा त्यांनीं सल्ला दिला. सरकारशीं संबंध ठेवल्यास आपल्या इच्छेप्रमाणें संस्थेचें धोरण आखतां येणार नाहीं व संस्थेच्या प्रगतीला अडथळा येईल, हें महात्माजींचें म्हणणें त्या वेळीं राजेंद्रबाबूंना तितकेंसें पटलें नाहीं व राजेंद्रबाबूंनीं डॉ. र. पु. परांजपे वगैरेंच्या गांठी घेऊन संस्थेला सुरुवात करण्याचें ठरविलें. पण मध्यंतरीं देशांतील खळबळीच्या वातावरणामुळें तो विषय तितकाच राहिला व राजेंद्रबाबूंची कॉलेजची कल्पना त्या वातावरणांत विरून गेली.

पुढें १९२१ सालीं असहकारितेच्या कार्यक्रमांत सरकारी शिक्षणसंस्थांवर बहिष्कार घालण्याचें व राष्ट्रीय विद्यालय स्थापन करण्याचें कलम समाविष्ट झाल्यामुळें राजेंद्रबाबूंचें राष्ट्रीय विद्यापीठ काढण्याकडे विशेष जोरानें लक्ष वेधलें. राजेंद्रबाबूंना असहकारितेचा सर्वव्यापी ठराव मान्य असल्यामुळें त्यांनीं तावडतोब वकिली सोडली व राष्ट्रीय विद्यापीठ स्थापन करण्याचा निश्चय केला. महात्मा गांधीचें पूर्वींचें म्हणणें त्यांना आतां पटलें व राष्ट्रीय शिक्षण हेंच खरें शिक्षण होय, असा

विचार करून ता. ६ जानेवारी १९२१ रोजीं त्यांनीं पाटणा येथें बिहार राष्ट्रीय विद्यापीठ स्थापन केलें. विद्यापीठाचा उद्‌घाटनसमारंभ महात्मा गांधींच्या हस्तें ता. ६ फेब्रुवारी रोजीं मोठ्या उत्साहानें साजरा करण्यांत आला. विद्यापीठाला ताबडतोब मोठमोठ्या देणग्या मिळाल्या व समारंभाच्या वेळीं महात्माजींच्या हस्तें ६० हजार रुपये मिळाले. पाटणा युनिव्हर्सिटींतल्या निरनिराळ्या कॉलेजांतील विद्यार्थी या राष्ट्रीय विद्यापीठांत दाखल झाले. विद्यापीठाला हां हां म्हणतां मोठें स्वरूप प्राप्त झालें. राष्ट्रीय महाविद्यालयाबरोबर विद्यापीठानें अनेक उद्योग सुरू केले. एक कारखाना काढला, एक छापखाना घेतला व 'मदरलंड' नांवाचें वृत्तपत्रहि चालू केलें. कॉलेजला मोठमोठे विद्वान् व नामांकित प्रोफेसर मिळाल्यामुळें पाटण्याच्या कॉलेजांत हें कॉलेज सर्वश्रेष्ठ ठरलें. राजेंद्रबाबू पहिल्याप्रथमच विद्यापीठाचे रजिस्ट्रार होते. पुढें कांहीं दिवस व्हाईस चॅन्सेलर झाल्यावर चॅन्सेलर म्हणून त्यांची निवड करण्यांत आली. पाटणा युनिव्हर्सिटीप्रमाणें विद्यापीठाला निरनिराळीं कॉलेजें जोडण्यांत येऊन त्या युनिव्हर्सिटीपेक्षांहि येथील शिक्षण अधिक उच्च दर्जाचें करण्यांत आलें. या विद्यापीठाचें स्वरूप अस्सल राष्ट्रीय असल्यामुळें बिहारी तरुणांच्या हृदयांत स्वातंत्र्याची ज्योत प्रज्वलित करण्याच्या कामीं त्या शिक्षणाचा केवढा मोठा उपयोग झाला, तें परवांच्या सत्याग्रहयुद्धाच्या वेळीं दिसून आलेंच आहे.

या विद्यापीठानें उच्च शिक्षण देणारीं नुसतीं राष्ट्रीय कॉलेजें काढलीं नाहींत, तर हजारों प्राथमिक शाळा व हायस्कुलें स्थापन करण्यांत विद्यापीठानें पुढाकार घेतला. शिक्षणाचीं पाळेंमुळें जर देशांत अत्यंत खोलवर रुजवावयाचीं असतील, तर प्रथम प्राथमिक शाळा काढणें आवश्यक आहे. या विचारानें बिहार विद्यापीठानें ठिकठिकाणीं शेंकडों शाळा स्थापन केल्या. बिहार प्रांतांत असें एकहि निमशहरी खेडेगांव उरलें नाहीं कीं जेथें राष्ट्रीय शाळा स्थापन झाली नाहीं. १९२२ सालीं

राष्ट्रीय हायस्कुलांची संख्या ४१ च्या वर गेलेली होती व त्यांत ४५००० विद्यार्थी शिकत होते. तसेंच ६०० प्राथमिक शाळांत सुमारें २०००० विद्यार्थी शिक्षण घेत होते. हळूहळू विद्यार्थ्यांची संख्या वाढतच गेली, पण १९३२ च्या चळवळींत कांहीं संस्था बेकायदा ठरल्यामुळें कित्येक शाळा बंद पडल्या. तथापि राजेंद्रबाबूंच्या राष्ट्रीय विद्यापीठानें बिहार प्रांतांत राष्ट्रीय शिक्षणाबाबत जी प्रचंड चळवळ केली, तिचें फळ बिहार प्रांताला आज मिळत आहे व यापुढेंहि मिळत राहील यांत शंका नाहीं.

## साहित्य-सेवा

हिंदी वाङ्मयाच्या जगांत राजेंद्रबाबूंना जो लौकिक मिळाला आहे तो त्यांच्या राजकीय क्षेत्रांतील कामगिरीमुळें मिळालेला नाहीं. हिंदी भाषेची जी त्यांनीं सेवा केली आहे त्यामुळेंच हिंदी साहित्यसेवकांत त्यांचें नांव चिरस्थायी झालें आहे. राष्ट्रभाषा या नात्यानें महात्मा गांधींनीं हिंदी भाषेचा जो पुरस्कार व प्रचार केला त्याला हातभार लावण्यांत ज्यांनीं विशेष परिश्रम घेतले त्यांत राजेंद्रबाबूंची गणना केली पाहिजे. बिहार प्रांतांत व दक्षिण हिंदुस्थानांत हिंदीचा जो प्रसार झाला त्याचें श्रेय राजेंद्रबाबूंच्या प्रचारास देणें योग्य होईल. राजेंद्रबाबू कलकत्त्याला शिकत असतां त्यांचा तेथील साहित्यिकांशीं व हिंदी साहित्यपरिषदेशीं बराच संबंध आला आणि तेव्हांपासून ते हिंदी साहित्यपरिषदेंत भाग घेऊं लागले. अखिल भारतीय हिंदी साहित्यसंमेलनाच्या कार्यकारी मंडळांत त्यांचा १९१२ सालापासूनच प्रवेश झाला आहे व आजहि ते तेथें आहेत. कलकत्त्याला १९१२ सालीं जें तिसरें हिंदी साहित्य-संमेलन भरलें, त्या संमेलनाचे ते मुख्य चिटणीस होते. त्याचप्रमाणें १९२० सालीं पाटणा येथें भरलेल्या दहाव्या साहित्यसंमेलनाचे वेळीं ते मुख्य कार्यकर्ते होते. १९२६ सालीं पाटणा येथें जें बिहारप्रांतीय

साहित्यसंमेलन भरलें, त्या संमेलनाच्या स्वागताध्यक्षाचा मान त्यांनाच मिळाला होता. राजेंद्रबावूंनीं याशिवाय तीन वेळां हिंदी साहित्यसंमेलनाचें अध्यक्षपद विभूषित केलें आहे. १९२३ सालचें कोकोनाडा येथील हिंदी साहित्यसंमेलन, १९२६ सालचें दरभंगा येथील बिहार-प्रांतीय हिंदी साहित्यसंमेलन, १९२७ सालीं गुरुकुल कांगडी येथें भरलेलें संयुक्तप्रांतीय साहित्यसंमेलन व १९३६ सालीं नागपूरला भरलेलें अ.भा. हिंदी साहित्यसंमेलन या संमेलनांच्या अध्यक्षपदाचा बहुमान त्यांच्याचकडे आला होता.

राजेंद्रबाबूंनीं फारसें ग्रंथलेखन केलें नाहीं, तथापि त्यांनीं आतांपर्यंत अनेक हिंदी व इंग्रजी लेख लिहिले आहेत. 'चम्पारण्यमें महात्मा गांधी' 'मेरे युरोपके अनुभव' हीं त्यांचीं दोन प्रसिद्ध हिंदी पुस्तकें असून खादीशास्त्रावर त्यांनीं Economics of Khadi या नांवाचें एक उत्कृष्ट पुस्तक लिहिलें आहे. खादीसंबंधीं सर्वांगीण माहितीपूर्ण व अधिकारयुक्त असें हें एकच पुस्तक आहे. १९२८ सालीं मद्रासच्या गणेशन् कंपनीच्या विनंतीवरून त्यांनीं आपल्या चम्पारण्यावरील पुस्तकाचें इंग्रजी भाषांतर केलें. तें Satyagraha in Champaran या नांवानें प्रसिद्ध आहे. तसेंच ह्या गणेशन् कंपनीनें महात्माजींच्या 'यंग इंडिया'तील निवडक लेखांचें जे दोन भाग प्रसिद्ध केले आहेत, त्या प्रत्येक भागाला राजेंद्रबाबूंची विस्तृत व वाचनीय प्रस्तावना आहे. पहिल्या भागाच्या उपोद्घातांत राजेंद्रबावूंनीं असहकारितेच्या चळवळीचा संक्षिप्त इतिहास निवेदन केला आहे. सुसंगत व मार्मिक इतिहास या दृष्टीनें या प्रस्तावनेला विशेष महत्त्व आहे हें सांगणें नकोच. १९४२ च्या तुरुंगवासांत त्यांनीं लिहिलेली 'आत्मकथा' व 'Divided India' हीं पुस्तकें प्रसिद्धच आहेत.

वर्तमानपत्रांच्याहि बाबतींत राजेंद्रबाबूंनीं बरीच स्पृहणीय कामगिरी केलेली आहे. पाटण्याचें सुप्रसिद्ध इंग्रजी दैनिक 'सर्चलाइट' या

पत्राच्या संस्थापकांत राजेंद्रबाबूंची गणना आहे. तें बाबूंचेंच झालें आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. Patana Law Weekly या साप्ताहिकांतहि त्यांचा प्रमुख भाग होता; पण तें लवकरच बंद पडलें. ६ एप्रिल १९२० रोजीं त्यांनीं 'देश' नांवाचें एक हिंदी साप्ताहिक सुरू केलें. हें पत्र आपल्या गुणांनीं थोडक्या काळांत प्रसिद्धीस आलें व त्याला हजारों वर्गणीदार मिळाले. पहिल्याप्रथम कांहीं काळ राजेंद्रबाबू त्याचे मुख्य संपादक होते, पण पुढें कार्यव्यापृतत्वामुळें त्यांना संपादकाचें स्थान सोडावें लागलें. बिहारमध्यें नांव घेण्याजोगीं जर कोणतीं वृत्तपत्रें असतील तर 'सर्चलाइट' व 'देश' एवढीं दोनच होत. १९३२ च्या चळवळीपासून ऑर्डिनन्समुळें 'देश' पत्र बंद पडलें.

## विद्यार्थ्यांची संघटना

विद्यार्थी हे राष्ट्राचे आधारस्तंभ असून विद्यार्थ्यांना आदर्श नागरिकांचें शिक्षण दिल्याखेरीज त्यांचा राष्ट्राला उपयोग होणार नाहीं, असा विचार करून राजेंद्रबाबूंनीं आपल्या विद्यार्थि-दशेंतच विद्यार्थ्यांच्या संघटनेला सुरुवात केली. राजेंद्रबाबूंचा संघटनेवर सर्वांत जास्त विश्वास असून कोणतीहि सार्वजनिक गोष्ट संघटनेशिवाय साध्य होणार नाहीं, असें त्यांचें निश्चित मत आहे. अलीकडे पं. जवाहरलाल नेहरूंच्या पुरस्कारानें देशांत जागोजागीं युवकसंघ निर्माण झाले; पण त्यापूर्वीं सुमारें वीस वर्षें राजेंद्रबाबूंनीं तरुण विद्यार्थ्यांची संघटना आरंभिली होती. १९०६ सालीं बिहारी विद्यार्थ्यांचा एक संघ स्थापन करून त्या संघामार्फत राजेंद्रबाबूंनीं सार्वजनिक काम करण्याला प्रारंभ केला होता. आत्मोन्नति हें या संघाचें मुख्य ध्येय असून विद्यार्थ्यांचा सांस्कृतिक उत्कर्ष साधणें हें संघाचें प्रमुख कार्य होतें. राजेंद्रबाबूंनीं या बाबतींत जो पुढाकार घेतला होता, त्याबद्दल 'इंडियन मिरर', 'इंडियन स्पेक्टेटर' वगैरे वृत्तपत्रांनीं राजेंद्रबाबूंचें अभिनंदन करून राजेंद्र-

बाबूंच्या कार्याचा आदेश इतर प्रांतांनीं आपल्यापुढें ठेवावा अशी शिफारस केली होती. त्याच सुमारास राजेंद्रबाबूंनीं बिहारी विद्यार्थ्यांचें एक संमेलन घडवून आणून तरुण वर्गांत मोठी जागृति केली होती. कलकत्याला कॉलेजमध्यें असतांना राजेंद्रबाबूंनीं कलकत्त्यांतील बिहारी विद्यार्थ्यांना एकत्र करून एक बिहारी क्लब स्थापन केला होता. या क्लबातर्फे लायक बिहारी विद्यार्थ्यांना हर प्रकारचें साहाय्य देण्यांत येत असे. या संघातर्फे दर वर्षी कलकत्ता येथें बिहार विद्यार्थीसंमेलन भरविण्यांत येऊन तरुण विद्यार्थ्यांनीं राष्ट्रासाठीं काय केलें पाहिजे यासंबंधीं त्यांना संदेश देण्यांत येत असे. या संमेलनाला देशांतील प्रमुख पुढाऱ्यांची सहानुभूति मिळत असल्यामुळें कलकत्याला या संघाची चांगलीच प्रसिद्धि झाली होती. बिहार विद्यार्थिसंमेलनाच्या निरनिराळ्या अधिवेशनप्रसंगीं देशांतील प्रसिद्ध पुढाऱ्यांची अध्यक्षस्थानीं योजना करण्यांत आली होती. महात्मा गांधी, सरोजिनी नायडू, ॲनी बेझंट, प्रफुल्लचंद्र रॉय, हसन इमाम, व्रजकिशोर प्रसाद, सरलादेवी चौधराणी वगैरेंनीं या संमेलनाचें अध्यक्षपद स्वीकारलें आहे. राजेंद्रबाबूंच्या ह्या बिहारी विद्यार्थ्यांच्या संघटनेचा एवढा परिणाम झाला कीं १९२० सालीं पाटणा येथें भरलेल्या संमेलनांत असहकारितेचा ठराव सर्वानुमतें मंजूर करण्यांत येऊन विद्यार्थ्यांनीं शाळाकॉलेजांवर बहिष्कार पुकारला. राजेंद्रबाबूंच्या पुरस्कारामुळेंच हजारों विद्यार्थी राजकीय चळवळींत पडले व राजेंद्रबाबूंचे अनुयायी व सहकारी बनले. राजेंद्रबाबूंनीं राष्ट्रीय विद्यापीठ स्थापन करतांच हजारों विद्यार्थ्यांनीं राष्ट्रीय विद्यापीठांत जीं नांवें नोंदविलीं त्याचें कारण केवळ राजेंद्रबाबूंचें नेतृत्व. आजकाल बिहारी विद्यार्थ्यांत जी सांस्कृतिक व राजकीय जागृति झाली आहे, त्याचें सर्व श्रेय राजेंद्रबाबूंसच दिलें पाहिजे.

# १ : सेवाव्रत

राजेंद्रबाबूंचें चरित्र पाहिलें तर त्यांत सेवेशिवाय दुसरें कांहींच आढळणार नाहीं. दीनदुःखितांची सेवा करावी, अनाथअपंगांच्या मदतीला जावें व हरप्रकारें दुःखीकष्टी जीवांच्या उपयोगीं पडावें हें राजेंद्रबाबूंचें जीवनकार्य आहे, असें म्हटल्यास चालेल. राजेंद्रबाबूंचें हृदय इतकें कोमल व सहानुभूतिपूर्ण आहे कीं, त्यांना साधु म्हणणेंच योग्य होईल. जणूं काय अनाथांची सेवा करण्यासाठींच त्यांनीं जन्म घेतला आहे, असें त्यांचें सेवाव्रत पाहून वाटूं लागतें. त्यांची एकंदर मनोवृत्ति पाहिली तर त्यांना 'दीनवत्सल' किंवा 'दीनबंधु' ही पदवी देणें भाग पडेल. राजेंद्रबाबूंच्या चरित्राचें सार त्यांच्या 'दीनबंधुत्वांत' आहे.

लोकसेवा हेंच त्यांच्या आयुष्याचें ध्येय आहे. ते आज इतकीं वर्षे जें विधायक कार्य करीत आहेत त्याची फारच थोड्यांना माहिती असेल. सेवाव्रत चालवितां यावें या हेतूनेंच केवळ ते राजकारणांत पडले आहेत. कॉंग्रेसचें विधायक कार्य ही लोकसेवाच आहे, हें जाणून त्यांनीं आपलें सर्वस्व विधायक कार्यांत वेंचलें आहे. कॉंग्रेसकार्याशिवाय त्यांचें सेवेचें कार्य मोठें आहे. कॉंग्रेसचें कार्य ही एक प्रकारची लोक-

बाबूंच्या कार्याचा आदेश इतर प्रांतांनीं आपल्यापुढें ठेवावा अशी शिफारस केली होती. त्याच सुमारास राजेंद्रबाबूंनीं बिहारी विद्यार्थ्यांचें एक संमेलन घडवून आणून तरुण वर्गात मोठी जागृति केली होती. कलकत्याला कॉलेजमध्यें असतांना राजेंद्रबाबूंनीं कलकत्त्यांतील बिहारी विद्यार्थ्यांना एकत्र करून एक बिहारी क्लब स्थापन केला होता. या क्लबातर्फे लायक बिहारी विद्यार्थ्यांना हर प्रकारचें साहाय्य देण्यांत येत असे. या संघातर्फे दर वर्षी कलकत्ता येथें बिहार विद्यार्थीसंमेलन भरविण्यांत येऊन तरुण विद्यार्थ्यांनीं राष्ट्रासाठीं काय केलें पाहिजे यासंबंधीं त्यांना संदेश देण्यांत येत असे. या संमेलनाला देशांतील प्रमुख पुढाऱ्यांची सहानुभूति मिळत असल्यामुळें कलकत्याला या संघाची चांगलीच प्रसिद्धि झाली होती. बिहार विद्यार्थिसंमेलनाच्या निरनिराळ्या अधिवेशनप्रसंगीं देशांतील प्रसिद्ध पुढाऱ्यांची अध्यक्षस्थानीं योजना करण्यांत आली होती. महात्मा गांधी, सरोजिनी नायडू, ॲनी बेझंट, प्रफुल्लचंद्र रॉय, हसन इमाम, ब्रजकिशोर प्रसाद, सरलादेवी चौधराणी वगैरेंनीं या संमेलनाचें अध्यक्षपद स्वीकारलें आहे. राजेंद्रबाबूंच्या ह्या बिहारी विद्यार्थ्यांच्या संघटनेचा एवढा परिणाम झाला कीं १९२० सालीं पाटणा येथें भरलेल्या संमेलनांत असहकारितेचा ठराव सर्वानुमतें मंजूर करण्यांत येऊन विद्यार्थ्यांनीं शाळाकॉलेजांवर बहिष्कार पुकारला. राजेंद्रबाबूंच्या पुरस्कारामुळेंच हजारों विद्यार्थी राजकीय चळवळींत पडले व राजेंद्रबाबूंचे अनुयायी व सहकारी बनले. राजेंद्रबाबूंनीं राष्ट्रीय विद्यापीठ स्थापन करतांच हजारों विद्यार्थ्यांनीं राष्ट्रीय विद्यापीठांत जीं नांवें नोंदविलीं त्याचें कारण केवळ राजेंद्रबाबूंचें नेतृत्व. आजकाल बिहारी विद्यार्थ्यांत जी सांस्कृतिक व राजकीय जागृति झाली आहे, त्याचें सर्व श्रेय राजेंद्रबाबूंसच दिलें पाहिजे.

# १ : सेवाव्रत

राजेंद्रबाबूंचें चरित्र पाहिलें तर त्यांत सेवेशिवाय दुसरें कांहींच आढळणार नाहीं. दीनदुःखितांची सेवा करावी, अनाथअपंगांच्या मदतीला जावें व हरप्रकारें दुःखीकष्टी जीवांच्या उपयोगीं पडावें हें राजेंद्रबाबूंचें जीवनकार्य आहे, असें म्हटल्यास चालेल. राजेंद्रबाबूंचें हृदय इतकें कोमल व सहानुभूतिपूर्ण आहे कीं, त्यांना साधु म्हणणेंच योग्य होईल. जणूं काय अनाथांची सेवा करण्यासाठींच त्यांनीं जन्म घेतला आहे, असें त्यांचें सेवाव्रत पाहून वाटूं लागतें. त्यांची एकंदर मनोवृत्ति पाहिली तर त्यांना 'दीनवत्सल' किंवा 'दीनबंधु' ही पदवी देणें भाग पडेल. राजेंद्रबाबूंच्या चरित्राचें सार त्यांच्या 'दीनबंधुत्वांत' आहे.

लोकसेवा हेंच त्यांच्या आयुष्याचें ध्येय आहे. ते आज इतकीं वर्षें जें विधायक कार्य करीत आहेत त्याची फारच थोड्यांना माहिती असेल. सेवाव्रत चालवितां यावें या हेतूनेंच केवळ ते राजकारणांत पडले आहेत. कॉंग्रेसचें विधायक कार्य ही लोकसेवाच आहे, हें जाणून त्यांनीं आपलें सर्वस्व विधायक कार्यांत वेंचलें आहे. कॉंग्रेसकार्याशिवाय त्यांचें सेवेचें कार्य मोठें आहे. कॉंग्रेसचें कार्य ही एक प्रकारची लोक-

बाबूंच्या कार्याचा आदेश इतर प्रांतांनीं आपल्यापुढें ठेवावा अशी शिफारस केली होती. त्याच सुमारास राजेंद्रबाबूंनीं बिहारी विद्यार्थ्यांचें एक संमेलन घडवून आणून तरुण वर्गांत मोठी जागृति केली होती. कलकत्याला कॉलेजमध्यें असतांना राजेंद्रबाबूंनीं कलकत्त्यांतील बिहारी विद्यार्थ्यांना एकत्र करून एक बिहारी क्लब स्थापन केला होता. या क्लबातर्फे लायक बिहारी विद्यार्थ्यांना हर प्रकारचें साहाय्य देण्यांत येत असे. या संघातर्फे दर वर्षी कलकत्ता येथें बिहार विद्यार्थीसंमेलन भरविण्यांत येऊन तरुण विद्यार्थ्यांनीं राष्ट्रासाठीं काय केलें पाहिजे यासंबंधीं त्यांना संदेश देण्यांत येत असे. या संमेलनाला देशांतील प्रमुख पुढाऱ्यांची सहानुभूति मिळत असल्यामुळें कलकत्याला या संघाची चांगलीच प्रसिद्धि झाली होती. बिहार विद्यार्थिसंमेलनाच्या निरनिराळ्या अधिवेशनप्रसंगीं देशांतील प्रसिद्ध पुढाऱ्यांची अध्यक्षस्थानीं योजना करण्यांत आली होती. महात्मा गांधी, सरोजिनी नायडू, ॲनी बेझंट, प्रफुल्लचंद्र रॉय, हसन इमाम, व्रजकिशोर प्रसाद, सरलादेवी चौधराणी वगैरेंनीं या संमेलनाचें अध्यक्षपद स्वीकारलें आहे. राजेंद्रबाबूंच्या ह्या बिहारी विद्यार्थ्यांच्या संघटनेचा एवढा परिणाम झाला कीं १९२० सालीं पाटणा येथें भरलेल्या संमेलनांत असहकारितेचा ठराव सर्वानुमतें मंजूर करण्यांत येऊन विद्यार्थ्यांनीं शाळाकॉलेजांवर बहिष्कार पुकारला. राजेंद्रबाबूंच्या पुरस्कारामुळेंच हजारों विद्यार्थी राजकीय चळवळींत पडले व राजेंद्रबाबूंचे अनुयायी व सहकारी बनले. राजेंद्रबाबूंनीं राष्ट्रीय विद्यापीठ स्थापन करतांच हजारों विद्यार्थ्यांनीं राष्ट्रीय विद्यापीठांत जीं नांवें नोंदविलीं त्याचें कारण केवळ राजेंद्रबाबूंचें नेतृत्व. आजकाल बिहारी विद्यार्थ्यांत जी सांस्कृतिक व राजकीय जागृति झाली आहे, त्याचें सर्व श्रेय राजेंद्रबाबूंसच दिलें पाहिजे.

# ९ : सेवाव्रत

राजेंद्रबाबूंचें चरित्र पाहिलें तर त्यांत सेवेशिवाय दुसरें कांहींच आढळणार नाहीं. दीनदुःखितांची सेवा करावी, अनाथअपंगांच्या मदतीला जावें व हरप्रकारें दुःखीकष्टी जीवांच्या उपयोगीं पडावें हें राजेंद्रबाबूंचें जीवनकार्य आहे, असें म्हटल्यास चालेल. राजेंद्रबाबूंचें हृदय इतकें कोमल व सहानुभूतिपूर्ण आहे कीं, त्यांना साधु म्हणणेंच योग्य होईल. जणूं काय अनाथांची सेवा करण्यासाठींच त्यांनीं जन्म घेतला आहे, असें त्यांचें सेवाव्रत पाहून वाटूं लागतें. त्यांची एकंदर मनोवृत्ति पाहिली तर त्यांना 'दीनवत्सल' किंवा 'दीनबंधु' ही पदवी देणें भाग पडेल. राजेंद्रबाबूंच्या चरित्राचें सार त्यांच्या 'दीनबंधुत्वांत' आहे.

लोकसेवा हेंच त्यांच्या आयुष्याचें ध्येय आहे. ते आज इतकीं वर्षे जें विधायक कार्य करीत आहेत त्याची फारच थोड्यांना माहिती असेल. सेवाव्रत चालवितां यावें या हेतूनेंच केवळ ते राजकारणांत पडले आहेत. कॉंग्रेसचें विधायक कार्य ही लोकसेवाच आहे, हें जाणून त्यांनीं आपलें सर्वस्व विधायक कार्यांत वेंचलें आहे. कॉंग्रेसकार्याशिवाय त्यांचें सेवेचें कार्य मोठें आहे. कॉंग्रेसचें कार्य ही एक प्रकारची लोक-

सेवाच आहे, हें खरें असलें तरी देशांत कुठेंहि दैवी आपत्ति ओढवो ते तिकडे धांवून गेल्याशिवाय राहात नाहींत. त्यांच्या सेवाव्रताची थोडीशी माहिती या प्रकरणीं देण्याचें योजिलें आहे.

## महापूर–दुष्काळ

१९२३ सालीं बिहार प्रांतांत दामोदर नदीला जेव्हां भयंकर पूर आला व वर्धमान इत्यादि अनेक गांवें वाहून गेलीं, तेव्हां त्या प्रसंगीं आपद्ग्रस्तांना मदत करण्यासाठीं राजेंद्रबाबू धांवून आले. जलप्रलयाच्या संकटांत सांपडलेल्यांना साहाय्य करण्यासाठीं कलकत्त्यांत फंड काढण्यांत आला. राजेंद्रबाबू अर्थात् तेथें होतेच. त्याच सुमारास पाटणा जिल्ह्यांत पूना नदीला महापूर येऊन बिहारचा एक सबंध जिल्हा पुरांत सांपडला. हें ऐकतांच राजेंद्रबाबूंनीं आपली वकिली तात्पुरती थांबवून ताबडतोब पाटण्याला प्रयाण केलें. बाबूजी त्या वेळीं कलकत्त्याला वकिली करीत होते. ते आपल्याबरोबर कांहीं विद्यार्थी स्वयंसेवक घेऊन पाटण्याला आले व जलप्रलयांत सांपडलेल्यांची सेवा करण्यासाठीं तिकडे निघून गेले. ज्यांना ज्यांना अन्न–वस्त्र–औषधें वगैरेंची जरूरी होती, त्यांची प्रथम योग्य ती सोय लावण्यांत आली. या कामीं त्यांना बाबू अनुग्रह नारायणसिंह, कै. बाबू शंभुकरण वगैरेंची अतिशय मदत झाली. हे लोक दिवसभर नावेंत बसून संकटग्रस्तांना साहाय्य करीत व रात्र झाली कीं किनाऱ्यावर येऊन एखाद्या आडोशाच्या जागीं अगर स्टेशनच्या प्लॅटफॉर्मवर येऊन पडत. कलकत्ता हायकोर्टांतील एका नामांकित वकिलानें आपला दर्जा गुंडाळून ठेवून संकटग्रस्तांची सेवा करण्यास जातीनें पुढें व्हावें, ही गोष्ट १९२३ सालीं मोठी अपूर्वच होती. जनतेला या गोष्टीचें विशेष आश्चर्य वाटणें साहजिकच होतें. राजेंद्रबाबू कलकत्त्याहून पाटण्याला जेव्हां वकिली करावयास आले तेव्हांहि एकदां त्यांनीं बालिया जिल्ह्यांतील जलप्रलयग्रस्तांची सेवा केली होती. बंगाल-

प्रमाणें बिहार प्रांतांतहि नेहमीं जलप्रलय होत असल्यामुळें बहुतेक दरवर्षीं एखाद्या जिल्ह्याला हानि पोंचली नाहीं असें सहसा होत नाहीं. त्यामुळें सेवाव्रतधारी राजेंद्रबाबूंना छपरा, आरा, दरभंगा इत्यादि अनेक ठिकाणीं आपद्ग्रस्तांचा समाचार घ्यावा लागला. त्याचप्रमाणें १९२३ सालीं गंगानदीला महापूर आला. तो इतका प्रचंड होता कीं, शहाबाद, पाटणा, सारण, मुंगेर इत्यादि जिल्ह्यांतल्या लोकांवर भयंकर संकट ओढवलें. शेंकडोंशें लोकांचीं घरेंदारें वाहून गेलीं. कोणाला राहावयाला जागा उरली नाहीं कीं मूठभर धान्य राहिलें नाहीं. शेतकऱ्यांची तर सर्वांत कठीण अवस्था झाली. शेतकऱ्यांजवळ बींबियाणेंहि उरलें नाहीं. ह्या आपत्तींत राजेंद्रबाबू धांवून आले व त्यांनीं मुंबई, गुजराथ, संयुक्त प्रांत इत्यादि ठिकाणांहून पुरेसें द्रव्यसाहाय्य मिळविलें व अनाथांना मदत पोहोंचविली. १९३१ सालीं चंपारण्यांत दुष्काळ पडला. आपत्ति दिसली कीं राजेंद्रबाबू तेथें धांवत यावयाचे, हें ठरल्यासारखें असल्यामुळें ते ताबडतोब चम्पारण्यांत येऊन दाखल झाले, व त्यांनीं बाहेरून मदत ज़मवून त्यांच्या संकटाचा अंशतः परिहार केला.

## बिहार भूकंप

राजेंद्रबाबूंच्या सेवाव्रताची खरी कसोटी भूकंपाच्या वेळीं दिसून आली. १५ जानेवारी १९३४ रोजीं बिहारमध्यें फक्त दीड मिनिट भूकंपाचा जो हादरा बसला, त्यानें जिकडेतिकडे भयंकर हाहाःकार उडाला. बिहारवर आलेल्या आजपर्यंतच्या संकटांत इतकें भीषण संकट आलें नव्हतें. या भूकंपानें जो प्रळय केला व जो अनर्थ मांडला त्याचें निवारण सहजीं होणें शक्य नव्हतें. त्यासाठीं सबंध देशांतून मदत मिळविणें अवश्य होतें. जागजागीं साहाय्यक समित्या स्थापन करून स्वयंसेवकांची सेना आपद्ग्रस्तांच्या साहाय्यासाठीं पाठविणें जरूर होतें. त्या दीड मिनिट धरणीकंपानें बिहारची जी दुर्दशा झाली ती कल्पने-

लाहि अगम्य होती. पण अशा भयंकर आपत्तीच्या वेळीं सेवाव्रतधारी दीनबंधु राजेंद्रप्रसाद हजारीबाग तुरुंगांत रुग्णशय्येवर खितपत पडले होते. सुमारें पांच महिने ते हॉस्पिटलमध्यें होते व सरकारी डॉक्टरांकडून त्यांच्या औषधोपचारांची तजवीज होत होती तरी त्यांची प्रकृति दिवसेंदिवस अधिकाधिकच बिघडत चालली होती. अखेर सरकारनें त्यांची मुक्तता करण्याचें ठरविलें व भूकंपाच्या तिसऱ्या दिवशीं ता. १७ जानेवारी रोजीं त्यांना तुरुंगांतून सोडण्यांत आलें. तुरुंगांतून बाहेर येतांक्षणींच ह्या दीनवत्सलानें आपला मोर्चा भूकंपग्रस्तांकडे वळविला व त्यांच्या क्षेमसमाचाराची चौकशी करण्यास प्रारंभ केला. प्रकृति बिघडल्यामुळें ते तुरुंगांतून बाहेर आले होते व कांहीं दिवस तरी त्यांनीं हॉस्पिटलमध्यें पडून चांगली विश्रांति घ्यावयास हवी होती. पण त्यांनीं पुरता एक दिवसहि जाऊं दिला नाहीं. लगेंच ते कार्याला लागले. त्यांनीं भूकंपाची एकंदर कल्पना करून घेऊन ता. २० रोजीं भूकंपनिवारण समिति स्थापन केली. त्यांनीं आपल्या शरीरप्रकृतीकडे न पाहतां अविश्रान्तपणें कार्य करावयास सुरुवात केली. पहांटे चार वाजल्यापासून तों जवळजवळ मध्यरात्र होईपर्यंत ते एकसारखे कामांत व्यग्र असत. त्यांनीं ठिकठिकाणीं फिरून भूकंपाची एकदां संपूर्ण पाहणी केली व भूकंपाची करुण कहाणी देशाला अधिकृत स्वरूपांत निवेदन केली. त्याबरोबर देशांत सर्वत्र खळबळ उडाली व बिहारच्या मदतीसाठीं द्रव्याचा वर्षाव होऊं लागला. बाबू राजेंद्रप्रसाद यांनीं भूकंपासंबंधीं जें पहिलें पत्रक काढलें तें पुढीलप्रमाणें आहे :

## जाहीर पत्रक

“ ता. १५ जानेवारी रोजीं दुपारीं या प्रांतावर जो अनर्थ कोसळला त्यामुळें भयंकर वित्तहानि व प्राणहानि झाली आहे. संपूर्ण आणि खरी माहिती अद्यापि मिळालेली नाहीं. परंतु जी कांहीं मिळाली आहे

तिच्यावरून झालेल्या अनर्थाची कल्पना येते. हजारों लोक नाश पावले आहेत आणि शेंकडों लोक निराश्रित झाले आहेत, असें म्हटलें असतां अतिशयोक्ति होणार नाहीं. हे निराश्रित लोक उघड्या मैदानावर थंडीनें कुडकुडत कसा तरी काल कंठीत आहेत. पाटणा, गया आणि सारण या शहरांनीं या आपत्तीचें उग्र स्वरूप पाहिलें आहेच, तथापि मुझफरपूर, दरभंगा, चम्पारण्य इत्यादि ठिकाणीं तर या आपत्तीचें उग्रतर स्वरूप दृश्यमान होत आहे.

"अर्थात् अशा आपद्ग्रस्तांना साहाय्याची आवश्यकता आहे, हें सांगणें नकोच. या लोकांचें दुःख कमी करण्यासाठीं कांहीं संस्था आपापल्या परीनें प्रयत्न करीत आहेत. आपद्ग्रस्तांना सुखसोयी पुरविण्यासाठीं एक सभा भरून बिहार सेंट्रल रिलीफ कमिटीची स्थापना झाली आहे. तथापि द्रव्यसाहाय्य, मनुष्यसाहाय्य आणि सामुग्री याशिवाय कमिटीला आपलें काम करतां येणार नाहीं. तावडतोबीच्या गरजा म्हणजे अशा कीं मातीच्या ढिगाऱ्यांतून प्रेतें उकरून काढणें, निराश्रितांसाठीं झोपड्या उभारणें, अन्न, कपडे आणि घोंगड्या पुरविणें, आणि औषधपाण्याची तजवीज करणें. या कामासाठींच प्रथमतः आम्हांस द्रव्यसाहाय्याबरोबर अन्नसामुग्रीची व औषधादिकांची जरूरी आहे.

"कमिटीतर्फे मी विनंतीपत्रक काढून जी मागणी केली आहे, ती देशाच्या सर्व भागांकडून पुरविली जाईल, अशी मला आशा आहे. कोणत्याहि प्रकारचा विलंब घातुक आहे. साहाय्य देण्यास विलंब करणें म्हणजे साहाय्य न देण्यासारखेंच आहे.

"आतांपर्यंत जी मदत झाली आहे आणि जी सहानुभूति दर्शविली गेली आहे, त्याबद्दल माझ्या देशबांधवांचे मी आभार मानतों.

"सर्व प्रकारचें साहाय्य किंवा देणग्या श्रीयुत आर. एस्. पंडित कमिटीचे ट्रेझरर, बँक ऑफ बिहार लिमिटेड, पाटणा, या पत्त्यावर पाठविणें. देणग्यांची पोंच तावडतोब देण्यांत येईल."

# भूकंपनिवारक कमिटी

निराश्रितांना जनतेतर्फे साहाय्य करणारी बिहार सेंट्रल रिलीफ कमिटी ही प्रमुख साहाय्यक संस्था भूकंपानंतर तावडतोब निर्माण झाली. भूकंप झाल्यावर पांच दिवसांनीं म्हणजे ता. २० जानेवारी रोजीं बाबू राजेंद्रप्रसाद यांच्या अध्यक्षतेखालीं एक सभा भरून तिच्यांत ह्या कमिटीची स्थापना झाली. त्या वेळीं बिहार प्रांताच्या बाहेरचे पुढारी तिच्यांत नव्हते, पण आपत्तीचें रौद्र स्वरूप जों जों दृग्गोचर होऊं लागलें, तों तों ह्या कमिटींत सर्व प्रांतांचे प्रतिनिधि असण्याची व ती अधिक प्रातिनिधिक करण्याची आवश्यकता भासूं लागली. फेब्रुवारीच्या आरंभीं पं. जवाहरलाल नेहरू यांच्या सूचनेवरून ५००० रुपये किंवा त्याहून अधिक रक्कम देणाऱ्या संस्थांचा एकेक प्रतिनिधि घेण्याचा कमिटीनें ठराव केला. या ठरावाप्रमाणें निरनिराळ्या प्रांतांतील २७ नवे सभासद कमिटीवर घेण्यांत आले. याखेरीज देशांतील सर्व पक्षांतील आणखी वजनदार पुढारी कमिटीवर नेमण्यांत आले. अखेरीस कार्यकारी मंडळांत १२७ सभासदांची भरती झाली.

२८ मार्च रोजीं पाटणा येथें महात्मा गांधींच्या अध्यक्षतेखालीं या कमिटीची सभा भरून महत्त्वाचे निर्णय करण्यांत आले. ही कमिटी सरकारांत नोंदण्याचें ठरून तिचे उद्देश निश्चित करण्यांत आले व पंधरा मंडळींचें एक सुटसुटीत कार्यकारी मंडळ निवडण्यांत आलें. बाबू राजेंद्रप्रसाद यांची अर्थातच अध्यक्ष म्हणून निवड झाली व बाबू अनुग्रह नारायणसिंह, मौ. हफीज व बाबू बलदेवसहाय यांना सेक्रेटरी नेमण्यांत आलें. सभासदांत जमनालाल बजाज, जे. सी. कुमारअप्पा, आचार्य कृपलानी, बाबू व्रजकिशोरप्रसाद, डॉ. सय्यद महमूद इत्यादिकांचीं नांवें मुक्रर करण्यांत आलीं. या सभेंत सर्वांत महत्त्वाचा ठराव कमिटीच्या धोरणासंबंधानें झाला. तो म्हणजे सरकारशीं आदरपूर्वक

अनुक्रमांक ९१:८ ९१:८ ९० ३११

सहकार्य करण्याचा. हा ठराव खुद्द महात्मा गांधींनीं मांडला व तो एकमतानें मंजूर झाला.

## एक मुलाखत

बिहारच्या भूकंपाचें स्वरूप किती रौद्र व भयानक होतें याची कल्पना तेथें प्रत्यक्ष गेल्याशिवाय होणें शक्य नसल्यामुळें निरनिराळ्या वर्तमानपत्रांनीं आपापले खास प्रतिनिधि पाठवून तेथील 'चक्षुर्वै सत्यं' माहिती आणविली. मुंबईच्या 'लोकमान्य' पत्रानेंहि आपला खास प्रतिनिधि धाडला होता. त्यानें बिहारच्या परिस्थितीचें नुसतें निरीक्षण केलें नाहीं, तर बिहारचे प्राण बाबू राजेंद्रप्रसादजी यांची ता. १–२–३४ रोजीं मुलाखतहि घेतली. ही मुलाखत लोकमान्यांच्या खास बिहार धरणीकंप अंकांत प्रसिद्ध झाली आहे. ती पुढीलप्रमाणें आहे :

"बाबू राजेंद्रप्रसाद हें बिहारचें परम दैवत आहे. त्यांच्याइतका सर्वमान्य पुढारी त्या प्रांतांत आज दुसरा नाहीं. जगन्नाथपुरी येथें भरणाऱ्या कॉंग्रेसच्या अधिवेशनासाठीं त्यांचीच निवड करून राष्ट्रानें त्यांचेवरील आपला विश्वास प्रकट केला आहे. कायदेभंगाच्या चळवळी-मुळें हें अधिवेशन होऊं शकलें नाहीं ही गोष्ट निराळी. असो.

"धरणीकंपाच्या कहरानें एकंदर नुकसान झालें तरी किती यासंबंधीं माहिती सरकार आपल्या अधिकाऱ्यांमार्फत प्रसिद्ध करतें. व्हाइसरॉयांना प्रांतिक गव्हर्नरकडून जाणाऱ्या रिपोर्टाला जितकी किंमत तितकीच, किंबहुना थोडी अधिक, बहुजनसमाज लोकपक्षीय पुढाऱ्यांच्या रिपोर्टाला देणार. बिहारमधील हलाखीचें अधिकृत वर्णन बाबू राजेंद्र-प्रसाद याखेरीज कोण करूं शकेल? तेव्हां त्यांना भेटून मीं कांहीं प्रश्न विचारले. त्यांचा सारांश येथें मुद्दामच देत आहें. बिहार प्रांताचें नुकसान किती झालें, मदत कशी, केव्हां व कुठें पाठवावी वगैरे खुलासा मुद्दामच करून घेतला आहे.

" बाबूजींचा रोजचा प्रघात असा दिसतो कीं, छावणींत सकाळीं येतांच प्रथम नवीन पाहुणे मंडळींची भेट घ्यावयाची, त्यांना कुशल प्रश्न विचारावयाचे, त्यांची सर्व प्रकारची व्यवस्था झाली आहे किंवा नाहीं याचीच चौकशी करावयाची, आणि येथें येण्याचा त्यांचा उद्देश विचारावयाचा. माझी व बाबूजींची प्रथम दृष्टभेट अशाच प्रकारानें झाली. सहा फूट उंचीची काळीसांवळी कृश मूर्ति, अंगांत लांब काळा गरम कोट, डोक्याला काळी टोपी व गळ्याभोंवतीं एक साधा गळपट्टा आणि पायांत पायमोजे व बूट अशी ही बिहारी राजेंद्राची मूर्ति पाहून ही कोणी अत्यंत थोर व्यक्ति आहे, असें परिचिताशिवाय फारच थोड्यांना सांगतां येईल. बाबू राजेंद्रप्रसाद म्हणजे सगळ्या बिहार प्रांताचें परम दैवत आहे. त्यांच्या रूपानें बिहार प्रांताची पुण्याई, बिहार प्रांताचें भाग्य उदयाला आलें असें सर्व जनतेला वाटत असतें. बिहारवर दुःखाचा डोंगर कोसळायला आणि बिहारच्या अधिदैवताची तुरुंगांतून मुक्तता होण्याला एकच गांठ पडली, हें बिहारी जनतेचें मोठें भाग्य होय. कांहीं लोक असेंहि म्हणतात कीं, सरकारला देखील बाबू राजेंद्रप्रसाद यांच्या मदतीची आवश्यकता भासल्यामुळें मुदत भरण्यापूर्वीच त्यांची अकस्मात् मुक्तता करण्यांत आली. सर्व बिहार प्रांतावर वजन असणारा आणि बाहेरच्या प्रांतांतहि आदर असणारा बाबू राजेंद्रप्रसाद यांच्यासारखा दुसरा पुढारी या प्रांतांत नाहीं. सर्व प्रांतांप्रमाणें बिहार प्रांतांतहि पक्षभेद आहेत. पण बाबू राजेंद्रप्रसाद ही अशी एकच व्यक्ती आहे कीं, जिच्या-बद्दल प्रत्येक पक्षांतील माणसाला आदर वाटतो. त्यांच्या हाताखालीं काम करावयाला कोणालाहि कमीपणा वाटत नाहीं, उलट मोठेपणाच वाटतो. प्रकृतीच्या अस्वास्थ्यामुळें बाबूजींची तुरुंगांतून मुक्तता झाली खरी, पण बाहेर आल्यावर विश्रांतीचा एक क्षणहि त्यांना लाभला नाहीं. तुरुंगाच्या बाहेर पाऊल टाकतांच त्यांच्या कानावर चोहोंकडून आक्रोश येऊं लागला. मग बाबूजींना विश्रांति कोठली, झोंप कोठली, अन्न कोठलें

आणि औषधपाणी तरी कोठलें? पहाटे चार वाजल्यापासून रात्रीं दहा अकरा वाजेपर्यंत बाबूजी रिलीफ कमिटीच्या कामामध्यें गुंतलेले असतात.

कमिटीच्या कामांत असे दंग असतां बापूजी एकदम माझ्याशीं बोलतील अशी माझी अपेक्षा नव्हती. तरी खुशालीचे प्रश्न विचारून त्यांच्यावर पडलेल्या बोजाचा मीं निर्देश केला. प्रकृति बरी नाहीं या सबबीवर मुदत भरण्यापूर्वीं त्यांची सुटका झाली, पण तुरुंगांतून बाहेर पडल्यापासून एक क्षणाचीहि फुरसत त्यांना मिळाली नाहीं. पहाटे-पासून रात्रींपर्यंत ते सारखे याच कामांत गढलेले पाहून मी त्यांना 'या परिश्रमाचा ताण पडत नाहीं काय' म्हणून विचारलें. तेव्हां बाबूजी म्हणाले—'छे, ताण कसला? कामापुढें मी आजारी आहें याची जाणीवच होत नाहीं. माझी प्रकृति चांगली सुधारत आहे.

मी—आपद्ग्रस्त बिहारला मदत करण्यासाठीं आपण जनतेला विनंती केली, तिला मनाप्रमाणें मान मिळाला काय?

बाबूजी—बिहार संकटांत सांपडला असतां सगळा देश त्याच्या मदतीला धांवून आला, हें सांगण्यास मला आनंद वाटतो. चहूंकडून आमचेवर मदतीचा वर्षाव होत आहे. पण आमची आपत्ति इतकी प्रचंड आहे कीं एवढी मनःपूर्वक आलेली भरपूर मदतदेखील आम्हांला अपुरी वाटते! आणखी मिळेल तेवढी मदत पाहिजे आहे.

मी—आपल्याला रोख पैशांची मदत पाहिजे कीं वस्तुरूपानें? मुंबईतल्या एका कमिटीकडून आपलेकडे यापूर्वींच एक हजार रुपये आलेले आहेत. बाकी रक्कम वस्तूंच्या रूपानें पाठवावी असें कांहींचें म्हणणें आहे. तथापि आपण सूचना कराल त्याप्रमाणें कमिटी वागणार आहे.

बाबूजी—आम्हांला वस्तूंपेक्षां पैशाच्या रूपानें मदत मिळेल तितकी चांगली. पैशाचा जरूरीप्रमाणें वाटेल तेव्हां वाटेल तसा उपयोग करतां येतो. इकडे तिकडे मदत पाठविणेंहि सुलभ जातें. वस्तूंच्या रूपानें

मदम मागावितांना रेल्वेचा खर्च निष्कारण होतो. दुसरें असें कीं आमच्याकडे असलेल्या एका केंद्रांतून दुसऱ्या केंद्राकडे सामान पाठवितांना त्रास पडतो व पुनः खर्चहि येतो. तथापि कांहीं दात्यांची वस्तुरूपानें मदत करण्याकडेच प्रवृत्ति असते. अर्थात् त्यांनीं कांहीं मदत केली तरी ती आम्ही स्वीकारतों. अशा दात्यांना माझी अशी विनंती कीं, त्यांनीं आम्हांला शक्यतों पन्हाळी पत्रे पुरवावे. आसऱ्याकरितां त्यांची आम्हांला अत्यंत आवश्यकता आहे. इकडे ते फार महाग पडतात.

मी—आपद्ग्रस्तांना साहाय्य करणाऱ्या संस्था पुष्कळ निघाल्या आहेत. या संस्थांत परस्परसहकार्य किंवा एकसूत्रीपणा नसल्यामुळें शक्तीचा आणि द्रव्याचा अपव्यय होण्याचा संभव असतो, कित्येकांना अनेक संस्थांकडून अनेक वेळां मदत मिळते, तर कित्येकांना कांहींच मदत मिळत नाहीं, अशी शक्यता आहे ना ?

बाबूजी—तुम्ही म्हणतां ती गोष्ट अगदीं खरी आहे. असें होऊं नये म्हणून आमचा शक्य तेवढा प्रयत्न चालू आहे. पण त्यांत पूर्णत्वानें यश येईलच असें नाहीं. कारण अनेक संघटना निरनिराळ्या दिशेनें काम करीत आहेत. कांहींचें सहकार्य होऊं शकतें, पण सर्वांचें होईल असें नाहीं.

मी—सर्व संस्थांचें जाऊं दे, पण निदान व्हाइसरॉयांच्या कमिटीचें च आपल्या कमिटीचें सहकार्यानें काम चालू आहे काय ?

बाबूजी—सहकार्य आहे म्हटलें तर आहे, नाहीं म्हटलें तर नाहीं. आम्हांला लागेल तें साहाय्य अधिकारी करतात ही गोष्ट खरी; पण दोन्ही कमिट्यांनीं एकत्र बसून संगनमतानें कार्य करावयास पाहिजे; तसें तें होत नाहीं, ही गोष्ट खोटी नाहीं. त्यामुळें कार्यांत दुबारपणा येईल असें वाटतें.

मी—दुबारपणा एक वेळ खपेल; पण विरोध तर कोठें येणार नाहीं ना ? सरकारची वृत्ति कॉंग्रेसविषयीं साशंक असण्याचा संभव आहे.

मागें गुजराथमध्यें जलप्रलय झाला असतांना सरदार वल्लभभाई पटेल आणि सरकार यांनीं एकत्र काम केलें, पण जनतेला सरकार न दिसतां फक्त सरदार वल्लभभाई पटेल व त्यांची काँग्रेसच दिसली व त्यांच्या-विषयींच तिच्या मनांत कृतज्ञताबुद्धि राहिली. गुजराथ हा काँग्रेसच्या चळवळीचा बालेकिल्ला होण्याचें कारण हेंच असें मुंबईचीं टाइम्ससारखीं पत्रें म्हणूं लागलीं. कायदेभंगाची पहिली चळवळ सुरू झाली, तेव्हां वरील सहकार्याच्या चुकीबद्दल या पत्रांनीं सरकारला दोष दिला होता. ही टीका लक्षांत घेऊन सरकार तुमच्या कमिटीशीं सहकार्य करण्याचें शक्य तेवढें टाळील काय ?

बाबूजी—सरकारच्या मनांतील विचार कोणीं सांगावे ? वल्लभभाईंना चळवळीपूर्वीं सरकारनें मदत केली होती, तर ही मदत चळवळींच्या नंतर करावयाची आहे, असा दोहोंमध्यें कदाचित् फरक करतां येईल.

मी—बिहारप्रमाणें नेपाळमध्येंहि धरणीकंपानें अनर्थ केला आहे, पण सर्व मदत बिहारकडेच येत आहे, नेपाळचें कोणी नांवहि घेत नाहीं, हें आश्चर्य नव्हे काय ? आपली कमिटी तरी कांहीं मदत नेपाळ-कडे पाठविणार असेलच ?

बाबूजी—नाहीं, नेपाळ अद्यापि आमच्या डोळ्यांसमोर नाहीं. याचें कारण एकतर तिकडील विस्तृत हकीकत अद्यापि बाहेर यावी तेवढी आलेली नाहीं. दुसरें असें कीं, तिकडे कोणत्या प्रकारची मदत पाहिजे याबद्दल नेपाळच्या कोणी जबाबदार व्यक्तीनें किंवा संस्थेनें अद्यापि मागणी केलेली नाहीं, मग समजावयाचें कसें ? तथापि माझा समज असा आहे कीं, आपली व्यवस्था पाहण्यास नेपाळ पूर्ण समर्थ आहे. कारण तें स्वतंत्र राष्ट्र आहे.

मी—जपानसारख्या स्वतंत्र व अव्वल दर्जाच्या संपन्न राष्ट्राला देखील धरणीकंपाचे वेळीं मागें हिंदुस्थाननें मदत केली, मग गरीब

नेपाळ तर काय आपला शेजारी, नव्हे अगदीं आपल्यापैकींच एक. मग हिंदी लोकांनीं तिकडे विशेष आपुलकीच्या भावनेनें पाहावयास नको?

बाबूजी—अगदीं बरोबर. तिकडली तशी माहिती बाहेर येतांच हिंदी लोक मदतीचा अवश्य विचार करतील.

मी—हल्लीं आपण मदत म्हणून फक्त कपडे व धान्य यांचीच खैरात करीत आहां. पडलेलीं घरें बांधण्याकरितां देखील आपण साहाय्य करणार आहां काय?

बाबूजी—तूर्त अन्न आणि वस्त्र यांचीच विशेष जरूरी असल्यामुळें आमचें तिकडे लक्ष आहे. तात्पुरत्या घरांकरितां तर मी पन्हाळी पत्र्यांची मागणी केलेली आहे.

मी—आपणाला उद्ध्वस्त झालेल्या मालमत्तेचा आणि शेतीच्या नुकसानीचाहि विचार करावा लागेल, नाहीं?

बाबूजी—होय तर. पैकीं घरांखालीं नष्ट झालेली विविध प्रकारची मालमत्ता भरून देणें आम्हांला कसें शक्य आहे? शेतीकडे मात्र आमचें लक्ष आहे. या कामीं सरकारला पुष्कळ मदत करतां येण्यासारखी आहे. ऊस पिकविणाऱ्यांसाठीं मी सरकारला विनंती केली आहेच.

मी—हो, आपल्या विनंतीला अनुसरून म्हणा कीं स्वयंस्फूर्तीनें म्हणा, सरकारनें दोन लाख रुपयांचे बैलाकडून चालवितां येणारे अडीच हजार चरक खरेदी करण्याचें ठरविलें आहे, असें मीं वाचलें. पण एवढी मदत पुरेशी आहे?

बाबूजी—चार लाख रुपयांचे निदान पांच हजार चरक लागतील असा माझा अंदाज होता कारण एक लाख एकर जमिनींतील उसाचा हा प्रश्न आहे. इतका ऊस गाळणाऱ्या गिरण्या धरणीकंपानें निकामी झाल्या असल्यानें चरक आणूनच हा ऊस गाळला पाहिजे. एक लाख एकरांचा आंकडा खुद्द गव्हर्नरांच्या भाषणांतला असल्यामुळें तो चूक

असण्याचा संभव नाहीं. पण सरकारनें मदतीचा विचार करतांना ५० हजार एकर जमीन गृहीत धरलेली आहे.

मी—म्हणजे सरकारनें केलेली योजना अपुरी आहे, असेंच आपलें म्हणणें ना?

बाबूजी—सरकारी अंदाजाप्रमाणेंच ती अपुरी ठरते. तथापि सरकारनें केले याचाहि उपयोग पुष्कळ होण्यासारखा आहे. याच मदतीला जोड देण्याचा आम्ही प्रयत्न करूं.

मी—म्हणजे काय?

बाबूजी—आम्ही कमिटीतर्फे चरक खरेदी करून शेतकऱ्यांना पुरविणार आहों.

मी—एकंदरींत परिस्थितीला अनुसरून पुरेशी उपाययोजना सरकार करीत आहे असें आपण म्हणूं शकाल काय?

बाबूजी— सरकारची योजना अद्यापि पुरेशी माझ्यासमोर नसल्यामुळें मला त्यासंबंधीं निश्चित कांहीं सांगतां येणार नाहीं, तथापि मदतीचा सरकार मनःपूर्वक विचार करीत आहे एवढें मी खात्रीनें म्हणूं शकेन.

मी—अलाहाबादच्या 'लीडर' पत्रानें संपादकीय स्फुट लिहून महात्मा गांधींना विनंति केली, ती आपल्या वाचनांत आली आहे काय? कलकत्याच्या 'फॉवर्ड' पत्रानें या विनंतीला पाठिंबा दिलेला आहे. मुंबईकडील कांहीं पत्रांतून अशाच सूचना मांडण्यात आलेल्या आहेत.

बाबूजी—तुम्ही काय म्हणतां?

मी—'लीडरनें' महात्माजींना पहिली विनंती अशी केली आहे कीं, त्यांनीं हरिजनांकरितां जमविलेल्या निधीचा कांहीं भाग बिहारच्या साहाय्यार्थ द्यावा. आपणांला ही सूचना पसंत आहे काय?

बाबूजी—नाहीं, असें करावें असें मला वाटत नाहीं. ज्या कार्याकरितां पैसा जमविला, त्याच कार्याकरितां तो खर्च करणें उचित आहे.

**मी**—मग महात्माजींनीं निदान दुसऱ्या विनंतीचा तरी विचार करावा. लीडरची दुसरी सूचना अशी कीं, महात्माजींनीं हरिजनकार्यार्थ आपला दौरा तात्पुरता थांबवून आज बिहारकरितां मदत मागत फिरावें. बिहारचें काम संपलें कीं पुनः हरिजनार्थ दौरा सुरू करावा. महात्माजींनी ही विनंति मान्य केल्यास त्यांचें आपणास बहुमोल साहाय्य होईल, असें आपणाला नाहीं वाटत ?

**बाबूजी**—खरोखरच मोठें साहाय्य होईल; पण मला वाटतें हा प्रश्न महात्माजींनीं स्वतःच सोडविण्यासारखा आहे. आम्हीं काय सांगावें ?

**मी**—मदत्त वाटण्याचें काम किती दिवस चालेल असा आपला अंदाज आहे ?

**बाबूजी**—आज तें कांहीं नक्की सांगतां येणार नाहीं. तथापि झालेली नुकसानी पाहतां कदाचित् हें कार्य कित्येक महिने देखील चालेल.

इतकें झाल्यावर धरणीकंपानें उद्ध्वस्त झालेला नेपाळपर्यंतचा प्रदेश पाहात जाण्याचा माझा विचार मी त्यांना कळविल्यावर बाबूजींनीं आनंद प्रदर्शित केला; पण लागलींच दुःखित चेहरा करून ते म्हणाले, "तुमची येथें फारच गैरसोय होत असेल नाहीं ? तुम्ही इतक्या दूर यावें आणि आम्हांला तुम्हांला राहण्याला चांगलें घर देखील देतां येऊं नये ? पण काय करावें ? आज एवढ्या शहरांत सुरक्षित असें घरच राहिलेलें नाहीं ?"

मीं म्हटलें, "बाबूजी, आमची काळजी करण्याचें आपल्याला मुळींच कारण नाहीं. सर्व व्यवस्था चांगली आहे. आपल्यावरील प्रसंग आम्हीं काय जाणत नाहीं ?"

## भूकंप फंड

राजेंद्रबाबूंच्या हांकेसरशीं सर्व देशाचे डोळे बिहारकडे वळले व संकटग्रस्तांच्या मदतीसाठीं ठिकठिकाणीं निधि जमविण्यास प्रारंभ

झाला. महात्मा गांधी, रवींद्रनाथ टागोर, सुभाषचंद्र बोस, सी. एफ्. अँड्रूज इत्यादिकांच्या सह्यांनीं देशांत व परदेशांत द्रव्यसाहाय्यासाठीं विनंती करण्यांत आली. व्हाईसरायांनीं आपला फंड उभारला. व्हाइसरॉयांचा फंड सरकारीच फंड असल्यामुळें सरकारी अधिकारी, संस्थानिक, जहागिरदार, इनामदार, सरकारच्या कृपेसाठीं धडपड करणारे मोठमोठे व्यापारी वगैरेंकडून व्हाइसरॉयकडे देणग्यांचा वर्षाव होऊं लागला. थोडक्याच अवधींत व्हाइसरॉय–निधींत सुमारें साठ लाख रुपये जमा झाले. या फंडाकडे खुद्द सरकारकडून फारच थोडी रक्कम पोहोंचली. राजेंद्रबाबूंच्याकडे जी मदत आली, ती अगदीं सर्वसामान्य जनतेकडून आली. रोजीं दोन आणे मिळविणाऱ्या हमालापासून प्रत्येकाकडून राजेंद्रबाबूंच्या फंडांत पैसे जमा झाले. राजेंद्रबाबूंच्या कार्याचें महत्त्व जाणून देशांतल्या सर्वसाधारण जनतेकडून त्यांना अपेक्षेबाहेर पाठिंबा मिळाला. आणि मोठमोठ्या धनिकांची व संस्थानिकांची मदत नसतांहि राजेंद्रबाबूंच्या बिहार फंडांत २५ लक्ष रुपये जमा झाले. हा भूकंप फंड म्हणजे राजेंद्रबाबूंच्या कर्तृत्वाचें श्रेष्ठ गमकच होय, यांत शंका नाहीं.

* * *

# १० : राष्ट्रपति

२६ जानेवारी १९५० हा दिवस हिंदी राष्ट्राच्या इतिहासांत १५ ऑगस्ट १९४७ प्रमाणें जसा सुवर्णाक्षरांनीं लिहिला जाईल त्याप्रमाणें तो दिवस म्हणजे बाबू राजेंद्रप्रसाद यांच्या जीवनमंदिराचा सोन्याचा कळस होय, यांत यत्किंचितहि शंका नाहीं. आपल्या आयुष्याचीं ३२ वर्षें निष्काम देशसेवेप्रीत्यर्थ ज्यांनीं अहर्निश खर्च केली त्यांच्या सेवावृत्तीचें फळ त्यांना मिळावें हें केव्हांहि योग्यच आहे. १९२० सालापासून महात्मा गांधींच्या प्रभावळींत जें प्रमुख पंचायतन होतें त्यांपैकीं प्रत्येक-जण महत्पदास चढला आहे व प्रत्येकाचें जीवन यशस्वी, समृद्ध व धन्य झालें आहे. पं. जवाहरलाल नेहरू स्वतंत्र भारताचे पहिले पंत-प्रधान झाले, सरदार पटेल व मौलाना आझाद यांच्याकडे प्रमुख मंत्रिपदें आलीं, राजगोपालाचारी यांना पहिले गव्हर्नर जनरल होण्याचा मान मिळाला आणि डॉ. राजेंद्रप्रसाद यांना इतिहासांत चिरंजीव होण्याजोगें प्रजासत्ताक भारताचें अध्यक्षपद प्राप्त झालें. जॉर्ज वॉशिंग्टनप्रमाणें, स्वतंत्र, सार्वभौम, प्रजासत्ताक भारताचे पहिले अध्यक्ष होण्याचा अभूत-पूर्व बहुमान डॉ. राजेंद्रप्रसाद यांना मिळाला आहे व या घटनेपासूनच भारतीय इतिहासाचें नवें पान उघडलें जात आहे.

९ डिसेंबर १९४६ पासून सुरू झालेल्या हिंदी घटना परिषदेनें तीन वर्षांच्या परिश्रमानंतर ता. २६ नोव्हेंबर १९४९ रोजीं भारताची राज्यघटना मंजूर केली. या घटनेनुसार पहिले राष्ट्राध्यक्ष निवडण्याची तारीख २४ जानेवारी १९५० ही ठरविण्यांत आली व त्या दिवशीं घटना परिषदेनें पहिले राष्ट्रपति म्हणून डॉ. राजेंद्रप्रसाद यांची एकमतानें व एकमुखानें निवड केली. राजेंद्रबाबूंचें नांव पं. नेहरूंनीं सुचविलें होतें व त्याला सरदार पटेलांनीं अनुमोदन दिलें होतें. डॉ. राजेंद्रप्रसाद राष्ट्रपति म्हणून निवडून आल्याचें जाहीर होतांच अभिनंदनपर भाषणें करण्याची जणूं अहमहमिकाच सुरू झाली. प्रारंभीं पं. नेहरू व पटेल यांनीं राष्ट्रपतींचें आदरपूर्वक अभिनंदन केलें व आपल्या राजनिष्ठेचें व व सहकार्याचें त्यांना अभिवचन दिलें. ही निवड म्हणजे एका पक्षाची नसून सबंध राष्ट्राची आहे, राष्ट्राचें भवितव्य आपल्या हातीं यावें अशी परमेश्वराची योजना दिसते, असे उद्गार निरनिराळ्या वक्त्यांनीं काढले. हीं भाषणें चालू असतां राजेंद्रबाबू मध्येंच म्हणाले, 'अशा प्रकारचीं स्तुतिपर भाषणें ऐकतांना मी भांबावून जातों व मला महाभारतांतल्या एका प्रसंगाची आठवण होते. सूर्यास्तापूर्वी असुक एक गोष्ट करीन अगर अग्निकाष्ठ भक्षण करीन अशी अर्जुनानें एकदां शपथ घेतली. दुर्दैवानें अर्जुनाला संकल्पित कार्य पार पाडतां आलें नाहीं म्हणून तो प्रतिज्ञे-प्रमाणें आत्मघात करावयास प्रवृत्त झाला. हें ऐकून भगवान् श्रीकृष्ण त्याच्याकडे आले व त्याला म्हणाले, 'तूं स्वतःची स्तुति ऐकलीस किंवा आत्मस्तुति केलीस तर तें आत्महत्या करण्यासारखेंच आहे. या मार्गाचा अवलंब करून आपली प्रतिज्ञा पार पाड. * या प्रसंगांतील वृत्तीनेंच मी अनेक वेळां असलीं स्तुतिपर भाषणें ऐकत आलों आहें.'

---

* प्रब्रूहि पार्थ स्वगुणानिहात्मन ।–
स्ततो हतात्मा भवसीति निश्चयः ॥—कर्णपर्व ७८।४०

यानंतर अनेकांचीं भाषणें झालीं व अखेर समारोपादाखल राजेंद्रबाबूंनीं पुढील भाषण केलें : "अनेक वर्षांच्या अविश्रान्त लढ्यानंतर आपण एक पायरी चढून वर आलों आहों. आतां प्रत्यक्ष कार्याचा दुसरा टप्पा गांठावयाचा आहे. आपण सौजन्यानें माझ्यावर मोठी जबाबदारी टाकली आहे. कोणाचीहि निवड झाल्यावर अभिनंदन करण्याची प्रथा मला पसंत नाहीं. निवृत्त होतांनाच त्याच्या कार्याचें अभिनंदन करावें असें माझें मत आहे. मी आपलीं अधिकारसूत्रें खालीं ठेवल्यावरच माझ्यावरील आपल्या विश्वासाची कसोटी लागणार आहे. पं. नेहरू, सरदार पटेल प्रभृति राष्ट्रीय पुढाऱ्यांसमवेत मीं गेलीं २५ वर्षें काम केलें असून त्यांचा माझ्यावर किती विश्वास आहे याची मला जाणीव आहे. याशिवाय सभागृहाचे इतर सभासद आणि देशांतील बहुसंख्य लोक यांचा सद्भाव माझ्या पाठीशीं आहे याविषयीं मला खात्री असल्यामुळें, माझ्यावर टाकण्यांत आलेली जबाबदारी मी समाधानकारक रीतीनें पार पाडूं शकेन असा मला विश्वास वाटतो."

यानंतर राजेंद्रबाबूंनीं घटनेच्या इंग्रजी व हिंदी प्रतीवर सही केली. त्यांच्या पाटोपाठ पंतप्रधान नेहरू, राष्ट्राध्यक्ष पट्टाभि प्रभृति २७१ सभासदांनीं सह्या केल्या. कांहीं सभासदांनीं आपल्या स्वतःच्या प्रतीवर राष्ट्रपतींची सही घेतली. याच बैठकींत 'जनगणमन' हें राष्ट्रगीत ठरल्याचें त्यांनीं जाहीर केलें आणि पुढील वाक्यांतच 'वंदे मातरम्'-लाहि तितकाच मान दिला जाईल अशी घोषणा केली. अशा प्रकारें सकाळीं ११ वाजून ९ मिनिटांनीं सुरू झालेली घटना परिषदेची ही शेवटची ऐतिहासिक बैठक १ वाजून २० मिनिटांनीं समाप्त झाली.

घटना समितीनें मंजूर केलेली राज्यघटना ता. २६ जानेवारी रोजीं अंमलांत यावयाची असल्यामुळें व त्या दिवशीं प्रजासत्ताक भारताचे पहिले राष्ट्रपति अधिकारारूढ व्हावयाचे असल्यामुळें हा दिवस हिंदी राष्ट्राच्या इतिहासांत १५ ऑगस्टपेक्षांहि अधिक संस्मरणीय होऊन

राहील यांत शंका नाहीं. या अभूतपूर्व दिनाचा सोहळा सर्वंध देशभर मोठ्या उत्साहानें व आनंदातिशयानें साजरा झाला. मग तो राजधानीच्या शहरीं, खुद्द दिल्लींत, केवढ्या बादशाही दिमाखांत व दरबारी इतमामांत साजरा झाला असेल हें सांगावयास नकोच. गुरुवार ता. २६ जानेवारी १९५० माघ शुद्ध अष्टमी १८७१ या दिवशीं भारत संपूर्णपणें स्वतंत्र व प्रजासत्ताक झाला.

या दिवशीं दिल्लींत सकाळपासून संध्याकाळपर्यंत अनेक महत्त्वाचे कार्यक्रम व्हावयाचे होते. प्रजासत्ताकाची घोषणा, राष्ट्रपतींचा शपथ-विधि, राष्ट्रपतींची मिरवणूक व सैन्याची सलामी, उद्यानोपाहार समारंभ इत्यादि समारंभांत राजेंद्रबाबूंचा महत्त्वाचा भाग असल्यामुळें पहाटे-पासूनच त्यांचे कार्यक्रम सुरू झाले. आदल्या दिवशीं दक्षिण भारत वैदिक संस्थेच्या चाळीस सभासदांनीं मांगल्याचें प्रतीक म्हणून त्यांना 'पूर्ण कुंभ' समर्पण केला. हे वैदिक ब्राह्मण अनेक तीर्थांनीं भरलेला रौप्यकलश घेऊन राजेंद्रबाबूंच्या निवासस्थानीं गेले. त्यांनीं वेदमंत्र म्हणून शुभाशीर्वादपूर्वक तो कलश राजेंद्रबाबूंच्या हातीं दिला. त्या कलशावर आंब्याचा टहाळा व हळदकुंकवानें माखलेला असोली नारळ ठेवण्यांत आला होता. राष्ट्रपतींनीं वंदनपूर्वक या मांगल्याचा स्वीकार केला. १५ ऑगस्ट १९४७ रोजीं जेव्हां पं. नेहरू अधिकार—स्वीकार करावयास निघाले होते तेव्हां दक्षिणेकडील तंजावर मठाच्या संन्याशांनीं त्यांना सुवर्ण राजदंड अर्पण केला होता. त्यांनीं तंजावरहून, शिजविलेला भात विमानांतून आणविला होता व होमहवन करून त्यांना त्याचा प्रसाद दिला होता.

गुरुवारीं सकाळीं बरोबर ७॥ वाजतां राजेंद्रबाबू सहकुटुंब राज-घाटावर म. गांधींच्या स्मृतिसमाधीचें दर्शन घेण्यासाठीं गेले. तेथें १५ मिनिटें उभे राहून त्यांनीं मनोमन प्रार्थना केली. त्या वेळीं त्यांच्याबरोबर सरदार पटेलांशिवाय कोणीहि नव्हतें. घरीं आल्यावर राष्ट्रपतींनीं आपल्या

पत्नीसमवेत देवदेवतांचें यथासांग पूजार्चन केलें व इष्ट देवतांचा आशीर्वाद घेतला. राजेंद्रप्रसाद हे सनातनी व धार्मिक वृत्तीचे असल्यामुळें पूजाप्रार्थना केल्याशिवाय त्यांचा दिनक्रम सुरू होत नाहीं.

त्या दिवशीं सकाळीं झिमझिम पाऊस पडत होता व या राजेंद्राला अभिषेक करण्यासाठींच कीं काय वरुणराजानें मेघसिंचन चालविलें होतें. त्या दिवशींचा मुख्य कार्यक्रम गव्हर्मेंट हाउसच्या दरबार हॉलमध्यें व्हावयाचा होता व त्यासाठीं रस्त्यावर हजारों लोक दुतर्फा उभे होते. राजेंद्रबाबूंचें आगमन होण्यापूर्वी परराष्ट्रीय वकिलांनीं व इतर निमंत्रितांनीं दरबार हॉल गच्च भरून गेला होता. पंतप्रधान नेहरू आधींच येऊन बसले होते. बरोबर १० वाजून १२ मिनिटांनीं जयवाद्यें वाजूं लागलीं व तुताऱ्यांच्या ललकाऱ्यांत आपल्या शरीररक्षकांसह राजेंद्रबाबूंनीं सभागृहांत प्रवेश केला. त्यांच्याबरोबर गव्हर्नर जनरल राजाजी होते. काळा अचकन, पांढरी चुणीदार सुरवार व गांधी टोपी असा राष्ट्रपतींचा वेष होता. हे दोघे राष्ट्रप्रमुख स्थानापन्न होतांच सैन्यानें सलामी दिली व बँडवर राष्ट्रगीत वाजूं लागलें. प्रारंभीं शेवटचे गव्हर्नर जनरल श्री. चक्रवर्ती राजगोपालाचारी यांनीं भारतीय प्रजासत्ताकाचा जाहीरनामा वाचून दाखविला व डॉ. राजेंद्रप्रसाद हे अध्यक्षपदीं निवडून आल्याचा घटना समितीकडून आलेला संदेश निवेदन केला. नंतर सिंहासनावरून खालीं उतरून त्यांनीं राजेंद्रबाबूंशीं हस्तांदोलन करून त्यांना सिंहासनावर नेऊन बसविलें.

डॉ. राजेंद्रप्रसाद राष्ट्रपति या नात्यानें सिंहासनावर विराजमान झाल्यावर श्री. राजगोपालाचारी यांनीं शुभेच्छादर्शक भाषण केलें. त्यानंतर मुख्य व महत्त्वाच्या कार्यक्रमाला प्रारंभ झाला. भारताच्या सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश श्री. हरिलाल कानिया हे पुढें आले व त्यांच्यापुढें उभे राहून राष्ट्रपतींनीं ईश्वराला साक्ष ठेवून हिंदींत राष्ट्रनिष्ठेची पुढीलप्रमाणें शपथ घेतली :

*"मी राजेंद्रप्रसाद, ईश्वरसाक्ष अशी शपथ घेतों कीं, भारताच्या राष्ट्रपतीचीं कर्तव्यें सचोटीनें पार पाडीन. राज्यघटना व कायदा यांचें जतन, संरक्षण व समर्थन करीन. भारतीय जनतेच्या कल्याणासाठीं व सेवेसाठीं मी स्वतःला वाहून घेईन."*

हा शपथविधि संपतांच राष्ट्रपतींना ३१ तोफांची सलामी देण्यांत आली. अशा प्रकारें हिंदुस्थान प्रजासत्ताक झालें व त्याच्या पाहिल्या अध्यक्षानें अधिकारसूत्रें हातीं घेतलीं.

शपथाविधिनंतर केलेल्या भाषणांत डॉ. राजेंद्रप्रसाद यांनीं ईश्वराला धन्यवाद देऊन महात्मा गांधींना व स्वातंत्र्ययुद्धांत कामीं आलेल्या असंख्य देशभक्तांना श्रद्धांजलिःअर्पण केली. काश्मीरपासून कन्याकुमारी-पर्यंत व काठेवाड–कच्छपासून कोकोनाडा–कामरूपपर्यंत आपल्या इतिहासांत आज प्रथमतःच एकछत्री राज्य प्रस्थापित होत आहे असें त्यांनीं सांगितलें. ते पुढें म्हणाले, "सर्व नागरिकांना न्याय, समता व स्वातंत्र्य प्राप्त करून देणें हें आपल्या प्रजासत्ताकाचें उद्दिष्ट आहे. अज्ञान, दारिद्र्य व रोगराई यांचा नाश करणें हा आमचा कार्यक्रम राहील. राजकीय स्वातंत्र्याप्रमाणेंच आर्थिक व सामाजिक स्वातंत्र्य निकडीचें आहे. आमचें कोणाशींहि जुनें वैर नाहीं. आंतरराष्ट्रीय राज-कारणांत आमचें धोरण सर्व देशांशीं मैत्री हेंच राहील." त्यानंतर पंतप्रधान, न्यायमूर्ति इत्यादिकांचा शपथविधि राष्ट्रपतींच्या पुढें पार पडला.

दुपारीं राष्ट्रपतींची प्रचंड मिरवणूक निघावयाची होती. गव्हमेंट हाउसपासून आयर्विन स्टेडियमपर्यंत पांच मैलांचा राजमार्ग कमींत कमी दहा लक्ष लोकांनीं फुलून गेला होता. २॥ वाजतां निघालेली दरबारी मिरवणूक स्टेडियमवर ४ वाजतां पोचली. सहा लाल ऑस्ट्रेलियन घोड्यांच्या रथांतून राष्ट्रपतींची ही मिरवणूक निघाली होती. उघड्या रथांत मागील बाजूस एकटे राष्ट्रपति विराजमान झाले होते व त्यांच्या समोर त्यांचे दोन शरीररक्षक आपल्या रंगीबेरंगी पोषाखांत बसले होते.

राष्ट्रपतींची गाडी जात असतां सबंध पांच मैलांचा टापू जयघोषानें दुमदुमत होता व त्यांच्या दर्शनासाठीं लोकांनीं पोलिसांची साखळीहि तोडून टाकली. स्टेडियमवर राष्ट्रपतींना हिंदी लष्करानें सलामी दिली. असलें भव्य व प्रचंड दृश्य खरोखर अभूतपूर्व होतें. ज्यांना हा सोहळा पाहावयास मिळाला ते धन्य होत.

३१ जानेवारी १९५० रोजीं राष्ट्रपति राजेंद्रप्रसाद यांचें भारत पार्लमेंटच्या सभागृहांत पहिलें जाहीर भाषण झालें. या प्रसंगींहि त्यांची दरबारी थाटाची मिरवणूक निघाली होती. राष्ट्रपतींचें हें पहिलें भाषण हिंदी राष्ट्राच्या भावी धोरणाचें स्थूल दिग्दर्शन करणारें असल्यामुळें त्यांचें महत्त्व विशेष आहे.

डॉ. राजेंद्रबाबूंच्या जीवनचरित्रांतील हे भव्योदात्त प्रसंग म्हणजे राष्ट्राचा त्यांच्यावर केवढा निर्भय विश्वास आहे याचें गमक होय. त्यांच्या हातून उत्तरोत्तर अशीच राष्ट्रसेवा होत जावो व त्यांना दीर्घायुष्य प्राप्त होवो.

# ११ : राजेंद्रबाबूंचे उद्‌बोधक विचार

मुंगेर येथें भरलेल्या बिहारी विद्यार्थ्यांच्या संमेलनांत राजेंद्रबाबूंनीं आपल्या अध्यक्षीय भाषणांत पुढील उद्गार काढले :

" आपल्या पूर्वकालीन संस्कृतीप्रमाणें पाहिलें तर आपल्या विद्यार्थि-वर्गाचें जीवन हल्लींपेक्षां अगदीं साधें व गरिबीचें असावयास पाहिजे. साधी राहणी व उच्च विचारसरणी ही आपल्या संस्कृतीची शिकवण आहे व आपल्या शिक्षणाचें हेंच ध्येय आहे. हल्लींच्या 'शाळांचे संसार सुरू होण्यापूर्वीं कित्येक वर्षें पाठशाळेंतील विद्यार्थी वटवृक्षांच्या छायेंत बसून आपल्या गुरुजनांकडून पाठ घेत असत. त्या वेळीं विद्यार्थ्यांना शिक्षण देण्याला येवढी साधनसामुग्री पुरेशी होई. माझ्या म्हणण्याचा असा अर्थ नाहीं कीं पूर्वींचीच साधीसुधी पद्धत आतां पुन्हा सुरू करावी. त्या गोष्टीची शक्यताहि नाहीं. पण आपण आपल्या शाळेंतून जें विलासी वातावरण सुरू केलें आहे तें त्वरित बंद करणें आवश्यक आहे. शाळा–कॉलेजांत असतांना मोठमोठ्या राजभुवनांत राहावयाचें व सुखोपभोगांत जीवन घालवावयाचें आणि शिक्षणक्रम संपला कीं परत आपल्या कंगाल झोपडींत राहावयाला यायचें. अशा पद्धतीनें जीवन सुखी होईल कीं दुःखी होईल ?...सध्यांच्या शाळेचा शिक्षणक्रम

मूळाक्षरें शिकण्यापासून मॅट्रिक होईतों किमान १२ वर्षांचा आहे व पुढें कॉलेजांतील ४ वर्षें मिळून १६ वर्षें पदवी संपादन करावयाला लागतात. हिंदी लोकांचें दरिद्री जीवन व त्यांचें अत्यंत कमी आयुर्मान या गोष्टीचा विचार केला तर आपलीं मुलें मिळवतीं होईपर्यंत त्यांना इतकीं वर्षें शाळा–कॉलेजांत काढावयाला लागावीं, हें कोणा पालकांना पसंत पडेल? हिंदुस्थानांतलें युनिव्हर्सिटीचें शिक्षण म्हणजे वास्तविक पाहतां उपजीविकेचें साधन आहे. युरोपांतल्या युनिव्हार्सिट्यांचें शिक्षण याहून अगदीं भिन्न आहे. तिकडे शिक्षणाचें ध्येय अत्यन्त उच्च असून तेथें संशोधनकार्याला प्रोत्साहन दिलें जातें. पोट भरण्याचें साधन हेंच हिंदी शिक्षणाचें ध्येय आहे. पाश्चात्य देशांतील उच्च शिक्षणक्रम आपल्याकडेहि सुरू करतां येणें अशक्य नाहीं हें मी तुम्हांस सांगूं इच्छितों. मात्र हिंदी मातापित्यांनीं तें मनावर घेतलें पाहिजे. आपल्या ३५ वर्षांच्या अल्प आयुर्मर्यादेंत केवळ शिक्षणाला २० वर्षें खर्च करणें उत्तरोत्तर कठीण होत जाणार आहे, याचा अवश्य विचार केला पाहिजे." [ १९२१ ]

*　　*　　*　　*

## अखंड कीं खंडित हिंदुस्थान?

"खरी गोष्ट अशी आहे कीं, हिंदुस्थानांतील जनतेपुढें दोन पर्याय आहेत. त्यांतून त्यांनीं कोणत्या तरी एकाची निवड करावी. देशाचे खंड पाडून त्याचे विभाग बनवावेत व जनतेची विभागणी करून स्वतंत्र राष्ट्रें स्थापावींत हा एक पर्याय; देशाचें अखंडत्व अबाधित राखून येथें वसलेल्या छोट्यांतल्या छोट्या गटासकट सर्व गटांच्या नैतिक, बौद्धिक व ऐहिक संवर्धनाची तरतूद करावी व त्या संवर्धनाच्या आड येणारे राजकीय, सामाजिक, आर्थिक आदिकरून सर्व प्रकारचे अडथळे दूर करावेत, हा दुसरा पर्याय. या दोहोंपैकीं एकाचा स्वीकार येथील लोकांना

करावा लागणार आहे. मग ते मुसलमान असोत, हिंदु असोत या इतर कोणी असोत; आणि ही निवड दक्षतेनें, उलटसुलट विचारप्रवाह नीट तपासून व समजून घेऊन त्यांना करावी लागणार आहे. दुसऱ्या पक्षाला नामोहरम करण्याच्या हेतूला येथें सवड नाहीं. या प्रश्नाचें महत्त्व अत्यंत मोठें आहे आणि केवळ या देशांतील रहिवाशांच्याच दृष्टीनें नव्हे, तर जागतिक व्यवहाराच्या व इतर देशांत राहणाऱ्या कोट्यवधि लोकांच्या हिताच्या दृष्टीनेंहि त्याला अतोनात महत्त्व आहे, हें नाकबूल करतां येणार नाहीं. जो जो प्रश्न उपस्थित होईल त्याचा शांत डोक्यानें आपण विचार केला पाहिजे. त्यापेक्षांहि महत्त्वाची गोष्ट म्हणजे बुद्धीची सचोटी राखून व सर्वांना न्याय मिळावा हा हेतु मनांत धरून आपण हरएक प्रश्नाचा विचार करावयास हवा आहे. न्यायबुद्धि व सचोटी मनांत असेल तर सर्वांना संमत होईल असा निर्णय घेणें अशक्य होणार नाहीं. गतकालांत केलेले तडजोडीचे प्रयत्न फसले आहेत हें सांगून कांहीं उपयोग नाहीं. त्यामुळें फक्त आपली दुर्बलता व आत्मविश्वासाचा आपल्या ठिकाणीं असलेला अभाव उघड होईल.

परंतु तडजोडीसंबंधींची चर्चा सफल व्हावी, किंबहुना ती शक्य व्हावी असें वाटत असेल तर निर्वाणीचे खलिते जाहीर करण्याचें आपण बंद केलें पाहिजे. चर्चेच्या आधीं शर्ती घालण्याचें व त्या मान्य झाल्या तरच चर्चा सुरू होईल अशी भाषा करण्याचें आपण सोडून दिलें पाहिजे. विचारविनिमय, मतपरिवर्तन, देवाण-घेवाण हेच मार्ग आपणांला उपलब्ध आहेत. आणि हेच खरे सभ्यतेचे मार्ग आहेत. सभ्य समजण्यांत येणाऱ्या राष्ट्रांकडून याव्यतिरिक्त अशा मार्गांचें अनुसरण फार भयंकर प्रमाणावर चालू असल्याचें दृश्य आज आपण डोळ्यांनीं पाहात असलों, तरी त्या मार्गांचें अनुकरण करण्याचा विचारहि आपण मनांत आणतां नये.

तडजोड म्हणून देशाच्या फाळणीची जी योजना पुढें मांडण्यांत येत आहे, ती निःसंशय निराशेच्या पोटींच जन्माला आलेली आहे. अल्प-संख्याकांचा प्रश्न या योजनेमुळें जरी अधिक बिकट होणार नाहीं असें मानलें, तरी तो तिच्या योगानें सुटतहि नाहीं. मला तर अशी भीति वाटते कीं तो प्रश्न या योजनेमुळें अधिकच बिकट बनेल ! अत्यंत कटु अशी परंपरा तिच्यामुळें निर्माण होईल ! ही योजना सक्तीनें अंमलांत आणल्यास एक पक्ष आनंदानें बेभान बनेल, तर दुसरा पक्ष मनांत कष्टी होऊन असंतोषानें कुढत राहील; आणि अशाच भावनांतून गृहकल-हाच्या व आंतरराष्ट्रीय युद्धाच्या ज्वाळा भडकत असतात. या भावनांना क्षुद्र लेखण्याची चूक आपण न करावी हें बरें. हजार वर्षांच्या सह-जीवनामुळें व सहकार्यामुळें जो स्नेहभाव संचित झालेला आहे व ज्याच्या बळावर आपणाला अजूनहि उभय पक्षांना समाधानकारक अशी तडजोड घडवून आणणें शक्य होईल. त्यांचें महत्त्व कमी लेखण्याचा प्रमादहि आपण टाळणें उचित होईल.

पण—आणि या ‘ पणा ’ कडे दुर्लक्ष करून चालणार नाहीं—हा सर्व युक्तिवाद निष्फळ ठरला आणि देशाची फाळणी अपरिहार्य झाली तर मागून उद्भवणाऱ्या वादळांना तोंड देण्याचीहि तयारी आपण ठेवा-वयास हवी. फाळणी केली कीं मग सारें सुरळीत चालू होईल, अशा भ्रमांत आपण राहूं नये. ”

—उपसंहाराचें प्रकरण

[ द्विखंड भारत : १९४२ ]

* * * *

## स्वातंत्र्याचा अपूर्व लढा

“ स्वातंत्र्याची किंमत दिल्याखेरीज स्वातंत्र्य कधींहि प्राप्त होत नाहीं. आपण स्वातंत्र्यासाठीं झटलों ही अभिमानाची गोष्ट असली, तरी अद्यापि आपण त्यासाठीं पुरेशी किंमत द्यायला तयार झालों नाहीं हें

उघड आहे. आपल्या पुढील कार्य प्रचंड आणि उज्ज्वल आहे. अढळ श्रद्धा, कमालीचा स्वार्थत्याग आणि चिकाटी हीं व्यक्त केल्याखेरीज अशीं कार्यें साध्य होत नसतात. पण काळ आणि जागतिक विचार-प्रवाह आपल्या बाजूचा आहे हें लक्षांत ठेवा. आधुनिक यंत्रसामर्थ्याच्या जोरावर अधिष्ठित झालेल्या सरकारबरोबर निःशस्त्र आणि अनत्याचारी साधनांनीं आपण चालविलेल्या या सत्याग्रहाच्या महायुद्धांत ईश्वर आपल्या पाठीशीं आहे हें विसरूं नका. आतां आपण परत फिरण्याचा प्रश्नच उरत नाहीं. स्वातंत्र्य हेंच आपलें ध्येय आहे व तें आपल्या दृष्टी-समोर अगदीं स्पष्ट दिसत आहे....आपल्या चळवळीची तीच नैसर्गिक फलप्राप्ति होय. स्वातंत्र्य याचा अर्थ इतरांपासून तुटक राहणें असा नव्हे. अनत्याचार हेंच आपलें साधन असल्यामुळें तुटकपणा आपणांस शक्यच नाहीं. स्वातंत्र्य याचा अर्थ समाजांतील एका वर्गाकडून दुसऱ्या वर्गाची होणारी पिळणूक असा आहे. या स्वातंत्र्यांत एका राष्ट्रानें दुसऱ्या राष्ट्राशीं परस्परांच्या फायद्यासाठीं सलोख्यानें व स्वतंत्र रीतीनें संबंध ठेवणें या गोष्टींचा समावेश होऊं शकतो. हें असें स्वातंत्र्य कोणालाहि बाधक होत नाहीं. पिळणूक करणारीं राष्ट्रें हीं जुलमापेक्षां मैत्रीवर अधिक भरंवसा ठेवतील तर त्यांनाहि तें अधिक जाचक वाटणार नाहीं. अनत्याचाराचा दृश्य आणि व्यक्त अर्थ सद्बुद्धि असाच आहे, असा अनत्याचार हाच स्वातंत्र्याच्या चळवळीला दंडक होय....

जागतिक लोकमताची अनुकूलता आपणांस अधिकाधिक दिसून येऊं लागली असून तें लोकमत आतां दिवसेंदिवस दुर्दम्य होऊं लागलें आहे. भीतीवर उभारलेली साशंक वृत्ति नाहींशी होऊन हिंदुस्थानच्या सलोख्याच्या विश्वासावर अवलंबून राहण्याची बुद्धि जागृत होत आहे. हिंदुस्थानचा इतर राष्ट्रावर डोळा नाहीं. आम्हांला परकीयांपासून आमचें संरक्षण करण्यासाठीं मोठ्या लष्कराचीहि जरूरी नाहीं. जगाच्या सलो-ख्यानें आमचें संरक्षण होऊं शकेल. या दृष्टीनें हिंदुस्थानचें राजकीय

स्वातंत्र्य, हें ब्रिटिशांच्या मनांत सध्यांची अनैसर्गिक परिस्थिति कायम ठेवावयाची इच्छा नसल्यास, त्यांनाहि मान्य झालें पाहिजे. आमचे मार्ग स्फटिकासारखे निर्मल आहेत. जिवंत अनत्याचारी सामुदायिक चळवळ ही आमची कार्यक्षमपद्धति आहे. तिच्यांत आम्ही एकदां पराभव पावलों तरी पुन्हा दुसऱ्यांदा प्रयत्न करूं व केव्हांतरी अखेर विजयी होऊंच होऊं. आपलीं साधनें अपूर्व आहेत आणि म्हणून या लढ्याकडे अत्यंत उत्कंठेनें जगाचे डोळे लागले आहेत. आपण आपल्या ध्येयावर अढळ श्रद्धा ठेवूं या, म्हणजे सत्याग्रहाच्या लढ्यांत आपणांला जरी तात्पुरती हार खावी लागली तरी आपला पराभव कधींच होणार नाहीं. सत्याग्रहाचा लढा हा एक प्रचंड विजयच आहे."

—अध्यक्षीय भाषण

[ मुंबई कॉंग्रेस : १९३४ ]

* * * *

## भारताचें अंतिम ध्येय

"ही घटना–परिषद अत्यंत आणीबाणीच्या वेळीं भरत आहे. यापूर्वी जगांत ज्या ज्या घटना–परिषदा भरल्या त्यांच्यापुढें असेच अडचणींचे प्रसंग उभे राहिले होते हें आपणां सर्वांना माहीत आहे. त्यांना अंतर्गत मतभेदाच्या प्रश्नावर झगडावें लागलें होतें. यांपैकीं पुष्कळशा घटना–परिषदा, मारामाऱ्या व रक्तपात यांच्या पार्श्वभूमीवर भरल्या, इतकेंच नव्हे तर परिषदेचें कामकाज चालू असतां लढे आणि भांडणें सुरू होतीं. इतके असंख्य अडथळे आले तरी त्या परिषदांनीं आपलें काम नेटानें पुरें केलें. त्याचें कारण असें कीं, त्या परिषदांचे सभासद धैर्य, औदार्य, सहिष्णुवृत्ति, परस्परांबद्दल आत्मीयता, सहकार्य इत्यादि गुणांनीं युक्त होते व आपल्या देशासाठीं घटना तयार करण्याचा त्यांनीं संघटित होऊन चंग बांधला होता. अखेर त्यांच्या परिश्रमाला फळ आलें आणि

त्यांनीं बनविलेल्या घटना जनतेनें संमत केल्या. आज सुद्धां त्या देशांतील जनतेला या घटना म्हणजे मोठाच बहुमोल ठेवा वाटतो. आपली ही घटना–परिषद अनेक अडथळ्यांतूनहि निर्विघ्नपणें कां पार पडूं नये हें मला समजत नाहीं. आपण जर प्रांजल असलों व परस्परांच्या मतांचा योग्य तो मान राखला तर आपल्याला अशी दृष्टि प्राप्त होईल कीं, आपण एकमेकांचे विचार योग्य तऱ्हेनें समजावून घेऊं शकूं. तसेंच मुळापर्यंत जाऊन परस्परांच्या अडचणी काय आहेत याचाहि आपल्याला उलगडा करून घेतां येईल. मग आपलें काम अतिशय सुयंत्रितपणें चालेल. कोणालाहि असें वाटणार नाहीं कीं, आपल्या मताचा अव्हेर केला आहे किंवा आपलें मत जुमानण्यांत आलें नाहीं.ही आत्मप्रत्ययाची मनोवृत्ति जर आपल्या अंगीं बाणली तर कितीहि अडथळे व पेचप्रसंग आले तरी आपण आपलें कार्य यशस्वीपणें सिद्धीस नेऊं असा मला दृढ विश्वास वाटतो.

ही घटना–परिषद अस्तित्वांत येतांना तिच्यावर अनेक बंधनें व नियंत्रणें घातलीं गेलीं आहेत हें आपण लक्षांत ठेवलें पाहिजे. पण त्याचबरोबर हेंहि विसरून चालणार नाहीं कीं, ही घटना–परिषद सार्वभौम संस्था आहे आणि आपलें कामकाज कसें चालवावें हें ठरविण्यास ती पूर्णपणें समर्थ आहे. तिच्या दैनंदिन कारभारांत बाहेरच्या कोणालाहि हात घालण्याचा अधिकार नाहीं. माझा असा समज आहे कीं, परिषदेच्या जन्माबरोबरच जीं बंधनें तिच्याभोंवतीं गुरफटलेलीं आहेत तीं बंधनें तोडून टाकण्याचें सामर्थ्य तिच्या अंगीं आहे. या बंधनांतून तिला मुक्त करण्याचें आपण प्रयत्न केले पाहिजेत आणि प्रांत, वंश, धर्म, स्त्री किंवा पुरुष असा कोणताहि भेद न करतां सर्व हिंदवासीयांच्या हक्कांचें योग्य संरक्षण होईल अशी हमी देणारी राज्यघटना बनविण्याच्या उद्योगास आपण लागलें पाहिजे. आपण जर योग्य दिशेनें असा प्रयत्न केला आणि त्यांत यशस्वी झालों तर जगाच्या इतिहासांत अद्वितीय व अद्‌भुतपूर्व ठरेल अशा प्रकारचें चिरस्थायी कार्य केलें असें सिद्ध होईल.

स्वातंत्र्य, हें ब्रिटिशांच्या मनांत सध्यांची अनैसर्गिक परिस्थिति कायम ठेवाव्याची इच्छा नसल्यास, त्यांनाहि मान्य झालें पाहिजे. आमचे मार्ग स्फटिकासारखे निर्मल आहेत. जिवंत अनत्याचारी सामुदायिक चळवळ ही आमची कार्यक्षमपद्धति आहे. तिच्यांत आम्ही एकदां पराभव पावलों तरी पुन्हा दुसऱ्यांदा प्रयत्न करूं व केव्हांतरी अखेर विजयी होऊंच होऊं. आपलीं साधनें अपूर्व आहेत आणि म्हणून या लढ्याकडे अत्यंत उत्कंठेनें जगाचे डोळे लागले आहेत. आपण आपल्या ध्येयावर अढळ श्रद्धा ठेवूं या, म्हणजे सत्याग्रहाच्या लढ्यांत आपणांला जरी तात्पुरती हार खावी लागली तरी आपला पराभव कधींच होणार नाहीं. सत्याग्रहाचा लढा हा एक प्रचंड विजयच आहे."

—अध्यक्षीय भाषण

[ मुंबई कॉंग्रेस : १९३४ ]

* * * *

## भारताचें अंतिम ध्येय

"ही घटना–परिषद अत्यंत आणीबाणीच्या वेळीं भरत आहे. यापूर्वी जगांत ज्या ज्या घटना–परिषदा भरल्या त्यांच्यापुढें असेच अडचणींचे प्रसंग उभे राहिले होते हें आपणां सर्वांना माहीत आहे. त्यांना अंतर्गत मतभेदाच्या प्रश्नावर झगडावें लागलें होतें. यांपैकीं पुष्कळशा घटना–परिषदा, मारामाऱ्या व रक्तपात यांच्या पार्श्वभूमीवर भरल्या, इतकेंच नव्हे तर परिषदेचें कामकाज चालू असतां लढे आणि भांडणें सुरू होतीं. इतके असंख्य अडथळे आले तरी त्या परिषदांनीं आपलें काम नेटानें पुरें केलें. त्याचें कारण असें कीं, त्या परिषदांचे सभासद धैर्य, औदार्य, सहिष्णुवृत्ति, परस्परांबद्दल आत्मीयता, सहकार्य इत्यादि गुणांनीं युक्त होते व आपल्या देशासाठीं घटना तयार करण्याचा त्यांनीं संघटित होऊन चंग बांधला होता. अखेर त्यांच्या परिश्रमाला फळ आलें आणि

त्यांनीं बनविलेल्या घटना जनतेनें संमत केल्या. आज सुद्धां त्या देशांतील जनतेला या घटना म्हणजे मोठाच बहुमोल ठेवा वाटतो. आपली ही घटना–परिषद अनेक अडथळ्यांतूनहि निर्विघ्नपणें कां पार पडूं नये हें मला समजत नाहीं. आपण जर प्रांजल असलों व परस्परांच्या मतांचा योग्य तो मान राखला तर आपल्याला अशी दृष्टि प्राप्त होईल कीं, आपण एकमेकांचे विचार योग्य तऱ्हेनें समजावून घेऊं शकूं. तसेंच मुळापर्यंत जाऊन परस्परांच्या अडचणी काय आहेत याचाहि आपल्याला उलगडा करून घेतां येईल. मग आपलें काम अतिशय सुयंत्रितपणें चालेल. कोणालाहि असें वाटणार नाहीं कीं, आपल्या मताचा अव्हेर केला आहे किंवा आपलें मत जुमानण्यांत आलें नाहीं.ही आत्मप्रत्ययाची मनोवृत्ति जर आपल्या अंगीं बाणली तर कितीहि अडथळे व पेचप्रसंग आले तरी आपण आपलें कार्य यशस्वीपणें सिद्धीस नेऊं असा मला दृढ विश्वास वाटतो.

ही घटना–परिषद अस्तित्वांत येतांना तिच्यावर अनेक बंधनें व नियंत्रणें घातलीं गेलीं आहेत हें आपण लक्षांत ठेवलें पाहिजे. पण त्याचबरोबर हेंहि विसरून चालणार नाहीं कीं, ही घटना–परिषद सार्वभौम संस्था आहे आणि आपलें कामकाज कसें चालवावें हें ठरविण्यास ती पूर्णपणें समर्थ आहे. तिच्या दैनंदिन कारभारांत बाहेरच्या कोणालाहि हात घालण्याचा अधिकार नाहीं. माझा असा समज आहे कीं, परिषदेच्या जन्माबरोबरच जीं बंधनें तिच्याभोंवतीं गुरफटलेलीं आहेत तीं बंधनें तोडून टाकण्याचें सामर्थ्य तिच्या अंगीं आहे. या बंधनांतून तिला मुक्त करण्याचें आपण प्रयत्न केले पाहिजेत आणि प्रांत, वंश, धर्म, स्त्री किंवा पुरुष असा कोणताहि भेद न करतां सर्व हिंदवासीयांच्या हक्कांचें योग्य संरक्षण होईल अशी हमी देणारी राज्यघटना बनविण्याच्या उद्योगास आपण लागलें पाहिजे. आपण जर योग्य दिशेनें असा प्रयत्न केला आणि त्यांत यशस्वी झालों तर जगाच्या इतिहासांत अद्वितीय व अद्‌भुतपूर्व ठरेल अशा प्रकारचें चिरस्थायी कार्य केलें असें सिद्ध होईल.

आपण या सभागृहांत जमलेल्या सदस्यांनीं एक क्षणभरहि विसरतां कामा नये कीं, या सभागृहांतील पुष्कळशा जागा अजून रिकाम्या आहेत. आपले मुस्लिम लीगवाले प्रतिनिधि बंधु आज आपल्यांत नाहींत आणि त्यांच्या अनुपस्थितीमुळें आपली जबाबदारी अधिक वाढली आहे. प्रत्येक पाऊल टाकतांना आपल्याला या गोष्टीचा विचार करावा लागेल कीं, हे प्रतिनिधि जर येथें हजर असते तर त्यांनीं काय केलें असतें? या सर्व गोष्टी डोळ्यांपुढें ठेवून आपण आपलें कार्य चालविलें पाहिजे. आपण अशी आशा करूं या कीं, ते लवकरच या ठिकाणीं येऊन आपल्या जागा घेतील आणि स्वतंत्र हिंदुस्थानची राज्यघटना बनविण्याच्या कामीं आपल्याशीं सहकार्य करतील. स्वातंत्र्यासाठीं आपण जी आघाडी उघडली आहे त्यांत ते सामील होतील अशी आपण अपेक्षा करूं. पण दुर्दैवानें या जागा तशाच मोकळ्या राहिल्या तर आपणांला अशी घटना बनवावी लागेल कीं तिच्याविषयीं कोणाकडूनहि कसल्याहि तक्रारीला जागा राहतां कामा नये.

आपण पुष्कळ काळपर्यंत स्वातंत्र्यासाठीं लढत आहों. ही घटना-परिषद तीन जबरदस्त कारणांमुळें अस्तित्वांत आली. एक आपल्या देशभक्तांचा निस्सीम त्याग. कित्येक स्त्रीपुरुषांनीं आपले प्राण अर्पण केले, अत्यंत हालअपेष्टा व कष्ट सोसले आणि एकसारखा अखंड लढा चालविला. दोन,—ब्रिटिश राष्ट्राचा इतिहास, ब्रिटिशांचा स्वार्थ आणि औदार्य. तीन,—सध्यांची जागतिक परिस्थिति आणि जगांत धुमाकूळ घालणाऱ्या विविध शक्तींचा प्रभाव. या सर्व गोष्टींचें एकत्रीकरण झाल्या-मुळेंच आपली ही घटना-समिति अस्तित्वात येऊं शकली. आपलें काम चालू असतांनाहि त्या शक्ति आपला प्रभाव दाखवीत राहतीलच अशी एक शक्यता आहे कीं, यापैकीं कांहीं शक्ति आपणाला बाजूला ओढ-तील आणि कांहीं दुसऱ्या बाजूला ओढतील. मला मात्र असा दृढविश्वास वाटतो कीं अखेर विजय आपलाच आहे. माझी परमेश्वराजवळ अशी

प्रार्थना आहे कीं, त्यानें आम्हांला दिव्य दृष्टि द्यावी म्हणजे आम्हांला एकमेकांचीं मनें कळूं शकतील आणि आम्ही संघटित होऊन आपला देश स्वतंत्र करण्याच्या मार्गाला लागूं.

आपल्याला जर कशाची जरूरी असेल तर स्वातंत्र्याची आहे आणि कोणी तरी म्हटल्याप्रमाणें स्वतंत्र होण्याच्या स्वातंत्र्यापेक्षां जगांत दुसरी कोणतीहि मौल्यवान गोष्ट नाहीं. या घटना-समितीच्या द्वारें आपण स्वातंत्र्य संपादन करूं अशी आशा आणि प्रार्थना करूं या."

अध्यक्षीय भाषण
[ घटनापरिषद: १९४६ ]

## १२ : बाबूजींचें विविध दर्शन

" राजेंद्रबाबू हे माझ्या सहकाऱ्यांपैकीं एक उत्कृष्ट सहकारी आहेत. त्यांनीं मला केव्हांहि बोलवावें, मी त्यांच्या सेवेस तयार आहें. हरिजन-कार्याप्रमाणेंच बिहारचें कार्य सर्वांचेंच आहे. पण परमेश्वरी सूत्राप्रमाणें मी हरिजनकार्याला जुंपलों गेलों व बिहारच्या संकटनिवारणाचें कार्य राजेंद्रबाबूंकडे आलें. "

— महात्मा गांधी ( मार्च १९३४ ).

" दुःखनिवारक समितीचें व त्याचप्रमाणें बिहार कॉंग्रेस समितीचें नेतृत्व बाबू राजेंद्रप्रसाद यांच्याकडे बिनविरोध देण्यांत आलें होतें. राजेंद्रबाबू अगदीं अस्सल बिहारी शेतकऱ्याप्रमाणें दिसतात. प्रथमदर्शनीं त्यांची मनावर छाप पडत नाहीं. पण त्यांच्या डोळ्यांत व्यक्त होणारी त्यांची तीव्र बुद्धिमत्ता आणि ऋजुता व चेहऱ्यावर दिसून येणारी तळमळ ध्यानांत आली कीं पाहणाराची कल्पना पालटूं लागते. त्यांच्या मुद्रेचा अथवा डोळ्यांचा माणसाला कधीं विसर पडणें शक्य नाहीं. कारण मूर्तिमंत सचोटीची ज्योत तेथें तेवत आहे. शेतकऱ्याप्रमाणेंच त्यांची दृष्टि जरा संकुचित आहे. आधुनिक जगाच्या मानानें ते जरासे भाबडेहि वाटतील. पण त्यांची दांडगी कर्तृत्वशक्ति, अविकृत सरलता,

त्यांचा उत्साह व स्वातंत्र्यासाठीं त्यांना लागलेला ध्यास या गुणांमुळें केवळ बिहारमध्येंच नव्हे तर अखिल हिंदुस्थानांत आज त्यांच्याविषयीं प्रेमाची भावना आढळून येते. मला वाटतें कीं राजेंद्रबाबूंचें पुढारीपण बिहारमध्यें जितकें सर्वमान्य आहे तितकें कोणाहि पुढाऱ्याचें हिंदुस्थानांतील कोणत्याहि दुसऱ्या प्रांतांत नसेल. गांधीजींचा संदेश देखील त्यांच्याप्रमाणें फारच थोड्यांनीं आत्मसात् केला असेल."

— पं. जवाहरलाल नेहरू
(आत्मचरित्र)

"डॉ. राजेंद्रप्रसाद हे बिहार प्रांतांतले आहेत. त्यांच्या अंगीं बौद्ध विहारांचा सत्त्वांश रोमरोमांत भिनलेला आहे. हा सत्त्वांश म्हणजे मार्दवानें, विनयानें मिळविलेली अजिंक्यता. महाभारतांत पुढील श्लोक आहे :

मृदुना दारुणं हन्ति मृदुना हन्ति अदारुणम् ।
नासाध्यं मृदुना किंचित् तस्मात् तीक्ष्णतरं हि मृदु ॥

कोमलतेंत, मार्दवतेंत केवढें सामर्थ्य भरलेलें आहे याची कल्पना वरील सुभाषितावरून येईल. डॉ. राजेंद्रप्रसाद म्हणजे मृदुतेचा, कोमलतेचा मूर्तिमंत अवतारच आहेत असें म्हणण्यास हरकत नाहीं. ते सौजन्यमूर्ति आहेत. तितिक्षा व धैर्य त्यांच्या अंगीं बाणलेलें आहे. राजेंद्रप्रसाद हे हिंदमातेचे, कॉंग्रेसचे मोठे कष्टाळू सेवक आहेत. ते राष्ट्राच्या ध्येयाचे मूर्तिमंत प्रतीक होत."

— डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन्
(रशियांतील हिंदी वकील)

"वर्किंग कमिटी हा कॉंग्रेसचा गाभा आहे. अधिकारपरत्वें वर्किंग कमिटीच्या सभासदांत कोणी ज्येष्ठ कनिष्ठ नाहीं, पण तिघेजण सर्वांत वरिष्ठ आहेत. या तिघांपैकीं प्रत्येकजण आपापल्या विभागाचा राजकीय

# १२ : बाबूजींचें विविध दर्शन

" राजेंद्रबाबू हे माझ्या सहकाऱ्यांपैकीं एक उत्कृष्ट सहकारी आहेत. त्यांनीं मला केव्हांहि बोलवावें, मी त्यांच्या सेवेस तयार आहें. हरिजन-कार्याप्रमाणेंच बिहारचें कार्य सर्वांचेंच आहे. पण परमेश्वरी सूत्राप्रमाणें मी हरिजनकार्याला जुंपलों गेलों व बिहारच्या संकटनिवारणाचें कार्य राजेंद्रबाबूंकडे आलें."

— महात्मा गांधी ( मार्च १९३४ ).

" दुःखनिवारक समितीचें व त्याचप्रमाणें बिहार कॉंग्रेस समितीचें नेतृत्व बाबू राजेंद्रप्रसाद यांच्याकडे बिनविरोध देण्यांत आलें होतें. राजेंद्रबाबू अगदीं अस्सल बिहारी शेतकऱ्याप्रमाणें दिसतात. प्रथमदर्शनीं त्यांची मनावर छाप पडत नाहीं. पण त्यांच्या डोळ्यांत व्यक्त होणारी त्यांची तीव्र बुद्धिमत्ता आणि ऋजुता व चेहऱ्यावर दिसून येणारी तळमळ ध्यानांत आली कीं पाहणाराची कल्पना पालटूं लागते. त्यांच्या मुद्रेचा अथवा डोळ्यांचा माणसाला कधीं विसर पडणें शक्य नाहीं. कारण मूर्तिमंत सचोटीची ज्योत तेथें तेवत आहे. शेतकऱ्याप्रमाणेंच त्यांची दृष्टि जरा संकुचित आहे. आधुनिक जगाच्या मानानें ते जरासे भाबडेहि वाटतील. पण त्यांची दांडगी कर्तृत्वशक्ति, अविकृत सरलता,

त्यांचा उत्साह व स्वातंत्र्यासाठीं त्यांना लागलेला ध्यास या गुणांमुळें केवळ बिहारमध्येंच नव्हे तर अखिल हिंदुस्थानांत आज त्यांच्याविषयीं प्रेमाची भावना आढळून येते. मला वाटतें कीं राजेंद्रबाबूंचें पुढारीपण बिहारमध्यें जितकें सर्वमान्य आहे तितकें कोणाहि पुढाऱ्याचें हिंदुस्थानांतील कोणत्याहि दुसऱ्या प्रांतांत नसेल. गांधीजींचा संदेश देखील त्यांच्याप्रमाणें फारच थोड्यांनीं आत्मसात् केला असेल."

— पं. जवाहरलाल नेहरू
(आत्मचरित्र)

"डॉ. राजेंद्रप्रसाद हे बिहार प्रांतांतले आहेत. त्यांच्या अंगीं बौद्ध विहारांचा सत्त्वांश रोमरोमांत भिनलेला आहे. हा सत्त्वांश म्हणजे मार्दवानें, विनयानें मिळविलेली अजिंक्यता. महाभारतांत पुढील श्लोक आहे :

मृदुना दारुणं हन्ति मृदुना हन्ति अदारुणम् ।
नासाध्यं मृदुना किंचित् तस्मात् तीक्ष्णतरं हि मृदु ॥

कोमलतेंत, मार्दवतेंत केवढें सामर्थ्य भरलेलें आहे याची कल्पना वरील सुभाषितावरून येईल. डॉ. राजेंद्रप्रसाद म्हणजे मृदुतेचा, कोमलतेचा मूर्तिमंत अवतारच आहेत असें म्हणण्यास हरकत नाहीं. ते सौजन्यमूर्ति आहेत. तितिक्षा व धैर्य त्यांच्या अंगीं बाणलेलें आहे. राजेंद्रप्रसाद हे हिंदमातेचे, काँग्रेसचे मोठे कष्टाळू सेवक आहेत. ते राष्ट्राच्या ध्येयाचे मूर्तिमंत प्रतीक होत."

— डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन्
(रशियांतील हिंदी वकील)

"वर्किंग कमिटी हा काँग्रेसचा गाभा आहे. अधिकारपरत्वें वर्किंग कमिटीच्या सभासदांत कोणी ज्येष्ठ कनिष्ठ नाहीं, पण तिघेजण सर्वांत वरिष्ठ आहेत. या तिघांपैकीं प्रत्येकजण आपापल्या विभागाचा राजकीय

संघटक व एका दृष्टीनें सर्वाधिकारी आहे. या वरिष्ठ त्रयींत सरदार वल्लभभाई पटेल (मुंबई, मद्रास, सिंध, मध्यप्रांत), मौलाना अबुल कलाम आझाद (बंगाल, पंजाब, सरहद्द, संयुक्तप्रांत) व बाबू राजेंद्रप्रसाद (बिहार, आसाम, ओरिसा) यांची गणना होते....जर सरदार वल्लभभाई पटेल कॉंग्रेस त्रिमूर्तींपैकीं रुद्रदेवता व मौलाना आझाद कॉंग्रेसची बुद्धिदेवता म्हटली तर बाबू राजेंद्रप्रसाद हा तिचा अंतरात्मा आहे. या गृहस्थाच्या अंगीं फार मोठें व्यक्तिमत्त्व आहे. त्यांनीं वकिलींत अलोट पैसा मिळविला. पण १९२० सालीं म. गांधींच्या असहकारितेच्या चळवळींत पडण्यासाठीं जेव्हां त्यांनीं वकिली सोडली त्या वेळीं त्यांच्या बँकबुकांत फक्त १५ रुपये शिल्लक होते. आपलें सर्वस्व अनाथ विद्यार्थ्यांना देऊन टाकून ते निष्कांचन बनले. गांधींच्या जिव्हाळयाच्या मित्रांपैकीं ते एक आहेत व गांधीजी सोडले तर बहुतकरून राजेंद्रबाबू हेच जनतेचे सर्वांत आवडते पुढारी आहेत. ते सात्त्विक व आकर्षक आहेत आणि अजातशत्रु आहेत. प्रसाद हे अगदीं साधेसुधे आहेत. खेडवळ शेतकऱ्याप्रमाणें ते दिसतात. एकदां ते तुरुंगांत असतांना ब्रिटिश अधिकाऱ्यांचें एक शिष्टमंडळ त्यांच्या कोठडीवरून चाललें असतां, एक इंग्रज गृहस्थ त्यांच्याकडे बोट दाखवून म्हणाला, 'हा गुन्हेगार जातीपैकीं खास दिसतो.' प्रसाद मनांतल्या मनांत हसले व आपल्याला सात भाषा येतात हें सांगण्याचाहि विचार त्यांच्या मनांत आला नाहीं. जर ते गांधींना मिळाले नसते तर ब्रिटिश हिंदुस्थानांतील सर्वांत श्रेष्ठ मानसन्मान त्यांच्या वांट्यास आला असता. ते सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश अगर एखाद्या प्रांताचे गव्हर्नरहि झाले असते."

—जॉन गंथर

[इन्साइड एशिया, १९४२]

"मी राजेंद्रबाबूंना उत्तम तऱ्हेनें ओळखतों. ज्या लोकांना तुरुंगांत किंवा दुःखसंकटाच्या ठिकाणीं एकत्र राहण्याचा प्रसंग येतो, त्यांना परस्परांची चांगली ओळख होण्याची संधि मिळते. बाबू राजेंद्रप्रसाद यांच्याबरोबर पुष्कळ काळपर्यंत तुरुंगांत राहण्यास मिळालें याचा मला अभिमान वाटतो. त्यांच्या बारीकसारीक संवयी मला ठाऊक झाल्या आहेत. त्यांच्या अंगीं सर्वांत मोठा गुण कोणता असेल तर त्यांचें मन जातीयतेपासून पूर्णपणें अलिप्त आहे हा होय."

—खान अब्दुल गफारखान

"कांहीं दिवसांपूर्वीं राजेंद्रप्रसाद यांच्याबद्दल थोडक्यांत पुष्कळ सांगण्यास मला विनंती करण्यांत आली होती. म्हणजे महाभारताचें एका सुभाषितांत रूपांतर करावयाचें होतें. त्या वेळीं मीं असें सांगितलें कीं, जर कोणी मला सोन्याची लेखणी मधांत बुडवून आणून दिली तर मी हें काम करूं शकेन. कारण राजेंद्रबाबूंच्या गुणांचें वर्णन करावयाला जगांतली सर्व शाईसुद्धां पुरी पडणार नाहीं. गेलीं कित्येक वर्षें राजेंद्रबाबूंबरोबर एकत्र काम करण्याची मला बहुमोल संधि मिळाली आहे. त्यांना मी जसें पुढारी मानतें तसें मित्र, सहकारी व बंधूहि मानतें. मात्र ते मला धाकट्या भावासारखे आहेत. कारण माझ्यापेक्षां ते पांच सहा वर्षांनीं लहान आहेत. राजेंद्रप्रसाद हे हिन्दी राष्ट्राच्या भवितव्याचे प्रतीक आहेत, असें मला निश्चित वाटतें."

— कै. श्रीमती सरोजिनी नायडू

"आपल्या प्रजासत्ताकाचे पहिले अध्यक्ष म्हणून डॉ. राजेंद्रप्रसाद यांची झालेली निवड ही कांहीं आश्चर्याची गोष्ट नव्हे. 'राष्ट्रपति' ही पदवीहि त्यांना नवीन नाहीं. अनेक राष्ट्रीय संस्था व सभा यांचें प्रमुख या नात्यानें त्यांच्याकडे पाहण्याची आपल्याला संवय झालेली आहे. ते कित्येकदां काँग्रेसचे अध्यक्ष झाले आहेत. तसेंच घटना-परिषदेच्या

अध्यक्षस्थानींहि ते होते. खरी गोष्ट अशी आहे कीं राष्ट्राला ज्या वेळीं सर्वसामान्य अशा व्यक्तीची निवड करण्याचा प्रसंग येई त्या वेळीं बहुतेक नेहमीं त्यांचीच निवड केली जात असे. यावरून त्यांच्यावर जनतेचा किती विश्वास आहे हें दिसून येतें. त्यांच्या महनीय गुणांची प्रशंसा करून मी त्यांना संकटांत घालीत नाहीं किंवा वाचकांवर बोजाहि टाकीत नाहीं. पहिले अध्यक्ष या नात्यानें श्री. राजेंद्रबाबूंच्या हस्तें नवीन प्रजासत्ताकाला प्रारंभ झाला हा शुभयोगच होय."

— किशोरलाल मश्रूवाला

(हरिजन, ५–२–५०).

❋ ❋ ❋

आ. दि.
ग्रंथालय

# राजेंद्रबाबूंचा जीवनपट

३ डिसेंबर १८८४—बिहार प्रांतांत जीरादेई येथें श्रीवास्तव कायस्थ घराण्यांत जन्म.

मार्च १९०२—प्रवेश परीक्षा–कलकत्ता विद्यापीठांत पहिला नंबर.

मार्च १९०६—बी. ए. पहिल्या वर्गांत पहिले.

मार्च १९०७—बॅरिस्टरीसाठीं विलायतेची तयारी; पण अखेर बेत रहित.

जुलै १९०८—मुझफरपूरच्या भूमिहार ब्राह्मण कॉलेजांत इंग्रजीचे प्राध्यापक.

जुलै १९०९—कलकत्याला सिटी कॉलेजांत अर्थशास्त्राचे प्राध्यापक.

एप्रिल १९१०—ना. गोखले यांजकडून भारत-सेवक समाजांत येण्यासाठीं निमंत्रण–वडील बंधूंच्या इच्छेसाठीं नकार.

ऑगस्ट १९११—कलकत्ता हायकोर्टांत वकिलीला प्रारंभ.

मार्च १९१५—एल्‌एल्. एम्.–पहिल्या वर्गांत पहिले आले.

एप्रिल १९१६—पाटणा हायकोर्टांत वकिलीला सुरुवात.

१९१६—बिहार प्रॉव्हिन्शियल असोसिएशनचे सेक्रेटरी,–पाटणा युनिव्हर्सिटींत सेनेटचे व सिंडिकेटचे सभासद.

जानेवारी १९१७—महात्मा गांधींची भेट व त्यांच्यासह चंपारण्यांत दौरा.

१९१७–१९१८—चंपारण्यांतील कार्य.

ऑगस्ट १९२०—कॉंग्रेसच्या ठरावाप्रमाणें वकिली सोडली.

१९२०—कॉंग्रेसच्या वर्किंग कमिटीचे सभासद.

—‘ मदरलंड ’ व ‘ देश ’ हीं वृत्तपत्रें सुरू केलीं.

६ जानेवारी १९२१—बिहार विद्यापीठाची स्थापना.

१९२१—गया कॉंग्रेसच्या स्वागतमंडळाचे सरचिटणीस.

१९२२—कॉंग्रेसचे मुख्य चिटणीस.

१९२३—हिंदी साहित्यसंमेलनाचे अध्यक्ष, कोकोनाडा.

१९२४—पाटणा म्युनिसिपालिटीचे अध्यक्ष.

१९२७—संयुक्त प्रांतीय साहित्यसंमेलनाध्यक्ष, गुरुकुल कांगडी.

१९२८—शेतकऱ्यांच्या सेवेसाठीं ब्रह्मदेशांत प्रयाण.

मार्च १९२८—एका जमीनदाराच्या खटल्यांतील अपील दाखल करण्यासाठीं इंग्लंडला प्रयाण. – प्रीव्ही कौन्सिलांतील अपीलाचें काम संपल्यावर युरोपची सफर. ऑस्ट्रियांत कम्युनिस्टांकडून मारहाण.

१९३०—जगन्नाथपुरी कॉंग्रेसचे नियोजित अध्यक्ष.

५ जुलै १९३०—सत्याग्रहाच्या चळवळींत ६ महिन्यांची कैद.

१९३० ते १९३१—कॉंग्रेसचे हंगामी अध्यक्ष.

४ जानेवारी १९३२—कायदेभंगाच्या चळवळींत सहा महिन्यांची शिक्षा.

[illegible] जानेवारी १९३३—१५ महिने तुरुंगवासाची सजा.

२० जानेवारी १९३४—बिहार भूकंप निवारण– २८ लक्ष रुपये जमविले.

२१ ऑक्टोबर १९३४—मुंबईस भरलेल्या ४८ व्या कॉंग्रेसचे अध्यक्ष.

मे १९३६—हिंदी साहित्य संमेलनाध्यक्ष, नागपूर.

१९३७—कॉंग्रेस पार्लमेंटरी बोर्डाचे सभासद, सरहद्द प्रांतांत दौरा.

१९३९—सुभाषबाबूंच्या राजीनाम्यामुळें कॉंग्रेसचे अध्यक्ष म्हणून निवड.

फेब्रुवारी १९३०—रामगड कॉंग्रेसचे स्वागताध्यक्ष.

९ ऑगस्ट १९४२ ते १५ जुलै १९४५—बांकीपूर तुरुंगांत स्थानबद्ध. या काळांतच त्यांनीं 'द्विखंड भारत' व 'आत्मकथा' हीं पुस्तकें लिहिलीं.

२ सप्टेंबर १९४६—मध्यवर्ती सरकारच्या हंगामी मंत्रिमंडळांत शेतकी व अन्न या खात्याचे सदस्य म्हणून नेमणूक.

१२ डिसेंबर १९४६—हिंदी घटनापरिषदेचे अध्यक्ष.

१५ ऑगस्ट १९४७—स्वतंत्र हिंदुस्थानचे अन्नमंत्री.

फेब्रुवारी १९४८—म. गांधी स्मारकनिधीचे अध्यक्ष.

२६ नोंव्हेंबर १९४९—घटनापरिषदेंत हिंदी राज्यघटना मंजूर. अध्यक्ष या नात्यानें तिच्यावर सहीचें शिक्कामोर्तब.

२४ जानेवारी १९५०—घटनापरिषदेच्या शेवटल्या बैठकींत प्रजासत्ताक भारताचे पहिले अध्यक्ष म्हणून बिनविरोध निवड.

२६ जानेवारी १९५०—स्वतंत्र सार्वभौम प्रजासत्ताक भारताचे पहिले राष्ट्रपति म्हणून डॉ. राजेंद्रबाबूंचा दिल्ली येथें गव्हर्मेंट हाऊसवर शपथविधि.

३१ जानेवारी १९५०—राष्ट्रपतींचें पार्लमेंटपुढें पहिलें जाहीर भाषण.

* * *

IRBK-0105762
IRBK-0105762